वाद-विवेचन-माला



साम्राज्यशाही

भाई नारायण गणेश गोरे,

किंमत ८ आणे

वाद-विवेचन-माला

वाद-विवेचन-माला : : : पुष्प ३ रें

साम्राज्यशाही

लेखक
नारायण गणेश गोरे

प्रथमावृत्ति,
५-७-१९३९.

किंमत ८ आणे.

प्रस्तावना

'साम्राज्यशाही' ह्या विषयावर मराठींत हें पहिलेंच पुस्तक असेल. रशिया वगळला तर ह्या ना त्या साम्राज्यशाहीचा हात पोंचला नाहीं असा भूमिभाग पृथ्वीच्या पाठीवर सांपडणें कठीण आहे; मग तो हात प्रत्यक्ष पोंचलेला असो अथवा कर्जाऊ रकमेच्या वा अन्य रूपानें अप्रत्यक्षपणें पोंचलेला असो.

म्हणून साम्राज्यशाहीचें विवेचन करावयाचें म्हणजे चालू जमान्यांतील सर्व देशांच्या राजकीय आणि आर्थिक संबंधांचें विवेचन करावयास हवें, तरच तें सांगोपांग होईल. पण ती गोष्ट पुस्तकाच्या मर्यादेमुळें या वेळीं शक्य नाहीं. विषयप्रवेश एवढेंच ह्या पुस्तकाचें उद्दिष्ट आहे.

ह्या विषयावर इंग्रजींत बरीच ग्रंथरचना झालेली आहे. पुस्तक लिहितांना मला उपयोगी पडलेल्या ग्रंथांचीं व ग्रंथकारांचीं नांवें संदर्भानुसार दिलेलीं असल्यामुळें साधन-ग्रंथांची निराळी पुस्ती जोडली नाहीं.

साम्राज्यशाहीच्या स्वरूपाची कामचलाऊ कल्पना येण्यासाठीं चालू राजकीय घडामोडी सूक्ष्मपणें पाहत गेलें तर तिच्या कारस्थानाचे बरेच धागेदोरे हातीं लागतील. ह्या विषयाच्या विशेष ज्ञानासाठीं चांगले नकाशे आस्थापूर्वक अभ्यासण्याची फार आवश्यकता आहे. राडो यांचें Atlas of To-day and To-morrow हें पुस्तक साम्राज्यशाहीच्या अभ्यासाचे दृष्टीनें अमूल्य आहे, त्याचा मला अतिशय उपयोग झाला.

ह्या छोटेखानी पुस्तकांत बरेच मुद्दे सांगावयाचे राहिले आहेत याची मला जाणीव आहे. साम्राज्यशाहीमुळें जित आणि जेत्या राष्ट्रांतलि लोकांच्या मनोवृत्तीवर काय परिणाम घडून येतात (उदा० मजूरवर्गांतच एक शिष्ट मजूरवर्ग तयार होतो, वसाहतीवर हुकमत चालवणारा वर्ग फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचा चहाता बनतो, इत्यादि) हा, किंवा ठेकेदारी पद्धतीमुळें उत्पादन अधिकाधिक सामुदायिक होत जाऊन उत्पादन--साधनांवरील मालकी हक्क व उत्पादनपद्धति यांत अत्यंत तीव्र विरोध येतो हा मुद्दा पुस्तकांत चर्चिलेला नाहीं; पण त्याला इलाज नव्हता.

ह्या पुस्तकाचा अपुरेपणा लक्षांत घेऊन कोणी अभ्यासकानें विस्तृत ग्रंथ-रचना केली तर मराठी वाचकांवर उपकार होतील.

कांहीं साधन-ग्रंथ वांचण्याची परवानगी दिल्याबद्दल केसरी-मराठा ग्रंथालयाचे व्यवस्थापक श्री. काळे यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

६२३।१७ सदाशिव पेठ, पुणें.

नारायण गणेश गोरे

अनुक्रमणिका

सा म्रा ज्य शा ही

साम्राज्यशाही

विषयप्रवेश : : १

अन्योन्यस्याऽवलिम्पन्ति सारमेया यथामिषम्
राजानो भरतश्रेष्ठ भोक्तुकामा वसुंधराम्
न चापि तृप्तिः कामानां विद्यतेऽद्यापि कस्यचित् ।* —महाभारत

१८६२ सालचा रुपया घ्या आणि १८८२ सालचा रुपया घ्या. पहिल्यावर 'व्हिक्टोरिया राणी' असे शब्द असतील तर दुसऱ्यावर 'व्हिक्टोरिया सम्राज्ञी' असे शब्द आढळतील. सम्राज्ञी म्हणजे साम्राज्याची मालकीण. इंग्रजी राण्या आणि राजे यांच्या ज्या पदव्या आहेत त्यांत Empress अथवा Emperor of India म्हणजे हिंदुस्थानची सम्राज्ञी अथवा सम्राट् ही एक खास पदवी समाविष्ट करण्यांत आली आहे. हें साम्राज्य म्हणजे काय? साम्राज्यशाही म्हणजे काय? पूर्वीचीं साम्राज्यें आणि हलींचीं साम्राज्यें ह्यांत फरक कोणता? अशोकाचें साम्राज्य, ऑगस्टस सीझरचें साम्राज्य वगैरे शब्दप्रयोग आपण ऐकलेले आहेत. साम्राज्याचा एक कोणी तरी

* कुत्रीं ज्याप्रमाणें एकमेकांचें भक्ष्य ओरबाडून घेतात त्याप्रमाणेंच, हे भरतश्रेष्ठा, लोभी असे हे राजे पृथ्वीला ओरबाडीत आहेत. तथापि आतांपर्यंत कोणाचीहि तृप्ति म्हणून झालेली नाहीं.

राजा, सम्राट्, अथवा मालक असला पाहिजे अशी कल्पना त्यांत दिसून येते. सध्यां इंग्रजी, जपानी आणि इटालियन साम्राज्यांतच काय त्या सम्राट्पदावर बसलेल्या व्यक्ति आढळून येतात. पण फ्रेंच व अमेरिकन लोकसत्ताक राष्ट्रेंसुद्धां साम्राज्यवादी राष्ट्रें समजलीं जात असून तेथें सम्राट् समजली जाणारी एखादी व्यक्ति असत नाहीं. आणि इंग्लंडमध्यें तरी खरी सत्ता कोणाकडे आहे? मंत्रिमंडळाकडे, पार्लमेंटकडे, पार्लमेंट निवडून देणाऱ्या मतदारांकडे, कीं आणखी कोणाकडे? साम्राज्यें वाढलीं कशीं? एवढीं साम्राज्यें चालवून फायदा तरी काय? साम्राज्यें हीं हिंदुस्थानांतील संस्थानिकांकडे झुलणाऱ्या स्वारीच्या हत्तीप्रमाणें देखाव्यासाठींच आहेत काय?

सध्यांच्या जगांत साम्राज्यशाही या शब्दाला एक विशेष अर्थ प्राप्त झालेला आहे. साम्राज्यशाही असा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या मनांत विशिष्ट अशा आर्थिक, राजकीय व सामाजिक संबंधांचें एक चित्र उभें रहावयास हवें. सुमारें १८०० सालापासून किंबहुना यांत्रिक युगाच्या आरंभापासून "साम्राज्य" या शब्दांत नवीन अर्थाच्या छटा दाखल होऊं लागल्या. तत्पूर्वी साम्राज्य अथवा सम्राट् हे शब्द माहीत नव्हते असें नव्हे. संस्कृत वाङ्मयांत अनेक सम्राटांचे म्हणजे साम्राज्यांच्या अधिपतींचे उल्लेख सापडतात. आपल्या सेनेच्या आणि स्वतःच्या बाहुबलाच्या जोरावर आपलें राज्य वाढवीत वाढवीत अनेक राजांना आपले अंकित करावे व आपण सार्वभौम राजा बनावें अशी मनीषा धारण करून अजरामर झालेल्या राजांच्या नांवांनीं पुराण-वाङ्मय भरलेलें आहे. अश्वमेधाचा घोडा सोडून त्या वेळीं माहिती असलेल्या हिंदुस्थानांतील सर्व राष्ट्रें किंवा राज्यें पादाक्रांत केलेल्या राम-युधिष्ठिरादि पुरुषांच्या कथा आपणा सर्वांच्या परिचयाच्या आहेतच. चंद्रगुप्त मौर्य, अशोक,

अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर, सीझर, चेंगीझखान, अकबर इत्यादींचा इतिहासहि आपण वाचलेला आहे. हे सर्व सम्राट् फार मोठ्या साम्राज्यांचे मालक होते.

तथापि आतांच सांगितलेलीं भारतीय, ग्रीक, रोमन अथवा मोगल साम्राज्यें व हल्लींचीं इंग्रजी, फ्रेंच, जपानी अथवा अमेरिकन साम्राज्यें यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. अशोकाचें साम्राज्य आसामपासून काबूलपर्यंत पसरलेलें होतें असें इतिहास जाणणारे सांगतात, आणि शिकंदरानें भूमध्यसमुद्राच्या उत्तर टोकापासून अटकेपर्यंतचा मुलूख आपल्या छत्राखालीं ओढला होता असेंहि आपण इतिहासांत वाचतों. पण त्यांच्या स्वामित्वाचा अर्थ काय हें आपण पाहिलें पाहिजे.

त्या काळीं पाऊसकाळ संपला कीं एखादा अशोकासारखा अथवा शिकंदरासारखा महापराक्रमी राजा आपलें सैन्य घेऊन निघे आणि नदीचा प्रचंड लोंढा रस्त्यांतील झाडझाडोरा वा दगडधोंडा आपल्या वेगानें उखडून टाकून झपाट्यानें धावत सुटावा त्याप्रमाणें, आपल्या स्वारीच्या मार्गातील राजेरजवाड्यांना झोडपीत आणि नमवीत पुन्हा पाऊसकाळाच्या सुरुवातीपर्यंत आपल्या राजधानींत येऊन दाखल होई. पावसाळी नदीच्या प्रवाहानें दोन्ही तीरांवरची माती धुपवून न्यावी तसेच हे जग जिंकण्यासाठीं निघालेले राजे त्यांच्या झपाट्यांत सापडलेल्या राजांकडून सुंदर उपवर मुली, सुंदर हत्तीघोडे, सुंदर माणिकमोत्यें, उंची वस्त्रें-प्रावरणें लुटून आणीत आणि तीं आपल्या जनानखान्यांतून व जामदारखान्यांतून सांठवीत. वावटळीप्रमाणें ते येत आणि वावटळीप्रमाणें जात. स्वतःचा पराक्रम जगजाहीर करण्यासाठीं आपल्या कारकीर्दींत कधींकाळीं राजसूय यज्ञासारखा यज्ञ त्यांनीं केला, कीं त्या वेळीं प्रत्येक मांडलिक राजानें

आपापल्या राज्यांतील उत्तमोत्तम वस्तूंचा अहेर अथवा करभार घेऊन सामोरें जावें आणि तो युद्धाला उभा राहिला, कीं त्याला थोडी फार फौजफाटयाची मदत करावी म्हणजे झालें. सम्राट् आणि त्यांचे मांडलिक यांचे संबंध त्या काळीं अशा प्रकारें केवळ नाममात्र व जुजबी स्वरूपाचे असत.

अशोकानें काबुलावर आपला झेंडा फडकवला अथवा शिकंदरानें इराण काबीज केलें म्हणून येथील समाजाच्या आर्थिक व्यवहारांत उलटापालट झाली असें घडत नसे. त्या वेळची समाजपद्धति फारच वेगळ्या प्रकारची होती. आधीं राष्ट्रें फार लहान असत. त्यांत मुंबई, कलकत्ता, लंडन, न्यू यॉर्क अशा प्रकारचीं शहरें नसत. राष्ट्राला जीवन प्राप्त करून देणारी वस्ती ग्रामीण लोकांची म्हणजे शेतकऱ्यांचीच समजली जाई. खेड्यांतील समाजरचना रीतिरिवाजांनीं बंदिस्त आणि अर्थरचना बहुतांशीं स्वयंपूर्ण असा प्रकार होता. यंत्रयुगापूर्वी सर्वच खंडांतून शेतकीप्रधान अशी समाजरचना शतकानुशतकें चालत आली असल्याचें आढळून येतें. अशा समाजरचनेच्या राष्ट्रावर तशीच समाजरचना असणाऱ्या राष्ट्राची स्वारी झाली व त्यांतून जय अथवा पराजय पदरांत पडला तरी त्यापासून जेत्या अथवा जित राष्ट्रांतील समाजरचनेंत कांहींच विशेष फरक होत नसे. प्रथम जबरदस्तीनें सोयरिकी होत; त्याच पुढें त्या वेळचीं लवचीक व वाढतीं धर्मशास्त्रें आपल्या कायद्यांत सामावून जातील अशी व्यवस्था करीत; चारदोन खेडीं उध्वस्त झालीं तर एक दोन हंगाम उलटल्यावर तेथें वस्ती होई व रानें पुन्हा हिरवीं होत; धार्मिक चालीरीतींचे फरक सारेंलोटें करून मिटवले जात; आणि जेती व जित मंडळी सहिष्णुतेनें नांदूं लागत. खेडेगांवांची वस्ती स्वभावतः पांगून व फुटकळ असल्यामुळें स्वाऱ्या-लढायांचे धक्के आजूबाजूच्या अथवा

वाटे-अल्याडपल्याडच्या गांवांना काय जाणवत असतील तेवढेच. बाकी सारा व्यवहार यथापूर्व चालू असावयाचा. आणि स्वारीच्या तडाख्यांत समाजजीवनाचा जो भाग जमीनदोस्त होई तो पुन्हा उभा करण्यासहि फारसा खर्च करावा लागत नसे. गाडीची चाक-जोडी, नांगर वगैरे शेतीचीं साधीं अवजारें, संसाराचीं गाडगीं-मडकीं, आणि थंडीवाऱ्यापासून बचाव करण्यासाठीं निवाऱ्याच्या झोपड्या आणि कांबळीं, पासोड्या तयार करण्यास अवधि तो कितीसा लागणार ?

शिवाय जित आणि जेते यांची वस्तु उत्पादन करण्याचीं साधनें सारख्याच तोलाचीं असल्यामुळें जितांच्या अर्थव्यवहाराची राख-रांगोळी करणें जेत्यांस जवळ जवळ अशक्यच होतें. जित राष्ट्रांतील सुतार, लोहार, चांभार, शेतकरी, वाणी इत्यादींच्या हातचीं उत्पादन-साधनें व जेत्यांच्या समाजांतील सुतार, लोहार वगैरेचीं उत्पादन-साधनें यांच्यांत फरक असा नसेच. औरंगजेबानें आसाम प्रांत जिंकणें आणि इंग्रजांनीं आसाम प्रांत जिंकणें यांत फार तफा-वत आहे. औरंगजेबाचा कोणी तरी सुभेदार डाक्काला राहून वर्षा-कांठीं आसामचे राजेरजवाडे अथवा जे कोणी असतील त्यांच्याकडून खंडणीच्या द्वारा जें काय उकळीत असेल तेवढेंच. पण इंग्रजांची रीत अगदीं वेगळी आहे. त्यांनीं तेथील सर्व समाजजीवनांत उलथापालथ करून टाकली. डोंगरावरच्या सर्व जमिनींचें चहाच्या मळ्यांत रूपांतर करून व त्या मळ्यांची मालकी आपल्या भांडवलाच्या जोरावर आपल्या ताब्यांत घेऊन त्यानें तेथील शेतकऱ्याला आपल्या दारचा सेवेकरी अथवा गुलाम बनवून टाकला आहे. इतका जुना दाखला नको असेल तर सध्यां इटलीनें ॲबिसीनियांत काय चालवलें आहे तें पहा. ॲबिसीनियांतील जंगलें साफ होत आहेत व तेथें कपाशीचीं शेतें

उभीं व्हावीं यासाठीं यंत्री नांगरांचे फाळ जमिनींत घुसूं लागले आहेत. डोंगरांचीं पोटें फोडून आगगाड्यांचे रस्ते बनत आहेत. तारायंत्राच्या व विजेच्या तारांचे खांब सर्व देशभर गाडले जात आहेत. लोखंड, कोळसा, तेल वगैरे जिनसांचा वास संशोधकाच्या तीक्ष्ण नाकाला जेथें जेथें येईल तेथें तेथें प्रचंड गिरमिटें भूगर्भात शिरत आहेत, व तेथील दडलेली संपत्ति बळजबरीनें उकरून वर आणीत आहेत. ही सर्व यंत्रसामुग्री समुद्र-किनाऱ्यापासून देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोंचावी म्हणून केवळ रेल्वेच्या रुळांवरच न विसंबतां खडी पसरून पक्क्या सडका बांधल्या जात आहेत. अर्थात् हीं सर्व कामें करण्यासाठीं हुशार शास्त्रज्ञ तर हवेतच पण इटलीजवळ उत्तम पारंगत असे पुष्कळ इंजिनियर असल्यामुळें शास्त्रज्ञ कसे पुरवावे ह्याची विवंचना इटलीला पडण्याचें कारण नाहीं. पंचाईत पडणार ती ढोरकाम करण्यासाठीं मजूर मिळवण्याचे बाबतींत. शेतकऱ्यांना मजूर बनवण्याचें एक शास्त्रच साम्राज्यवाद्यांनीं बनवलेलें आहे. तदनुसार इटलीहि ॲबिसीनियांतील शेतकऱ्यांना गुलाम बनवून आपल्या संस्कृतिप्रसाराच्या कामाला जुंपीत आहे. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, मुसोलिनीनें ॲबिसीनिया जिंकला याचा अर्थ ॲबिसीनियाचें पूर्वींचें निशाण उपटून तेथें फासिस्ट इटलीचें निशाण लावलें असाच केवळ नसून त्यानें ॲबिसीनियांत शतकानुशतकें चालत आलेले शेतीप्रकार, वाहतूकप्रकार, व्यापारप्रकार म्हणजेच अर्थव्यवस्था, आणि त्या अर्थव्यवस्थेच्या अनुरोधानें व आधारानें चालत आलेली समाजव्यवस्था मोडून टाकली इतका त्याच्या या विजयाचा अर्थ आहे.

ही गोष्ट इंग्रजांनीं हिंदुस्थानांत केली अथवा इटलीनें ॲबिसीनियांत केली म्हणून इंग्रज अथवा इटालियन साम्राज्यशाही राक्षसी आहे

असें म्हणण्याचें कारण नाहीं. यांत्रिक युगानंतर भांडवलशाही संस्कृतीच्या आधारानें जीं जीं राष्ट्रें संपन्न आणि समर्थ झालीं व ज्यांनीं ज्यांनीं त्या संपत्तीच्या आणि सामर्थ्याच्या बळावर यंत्रहीन आणि शेतकीप्रधान संस्कृति असलेल्या मागासलेल्या आणि दुबळ्या राष्ट्रांना नामोहरम करून आपल्या साम्राज्यांत सामील करून टाकलें त्या त्या राष्ट्रांनीं सर्वत्र असेंच वर्तन केलेलें आहे असें आपणांस आढळून येईल. आगगाडीचें रूळ, तारायंत्राचे आणि विजेचे खांब, कापड विणण्याचीं यंत्रें हेच साम्राज्यशाहीचे खरे सेनापति, दूत, आणि वकील. ही सामग्री ज्या देशांत पोंचली त्या देशांतील शेतकरीसमाजपद्धति, सरंजामदारी समाजपद्धति अथवा स्वयंपूर्ण अशी बारा बलुत्यांच्या गांवगाड्याची पद्धति जमीनदोस्त झाल्याविना राहणें शक्य नाहीं ही काळ्या दगडावरील रेघ समजावी. इंग्लंडच्या साम्राज्यांतील हिंदुस्थानांत नव्हे तर ईजिप्त, सीलोन, ब्रह्मदेश, आफ्रिका येथें असाच उत्पात झालेला आहे. अमेरिकेनें मेक्सिकोंत हेंच केलें. फ्रान्सनें इंडोचायनांत, बेल्जमनें कांगोमध्यें, हॉलंडनें जावा-सुमात्रा या बेटांत, जपाननें मँच्युकुओंत आणि इटलीनें ॲबिसीनियांत असेच क्रान्तिकारी उलटापालट घडवून आणले आहेत. आणि साम्राज्यें टिकवावयाचीं असतील म्हणजे भांडवलशाही उत्पादन-पद्धति टिकवावयाची असेल तर असें करण्यावांचून गत्यंतरच नाहीं. कारण यंत्रयुगाच्या पूर्वीची समाजपद्धति आणि भांडवलशाही यांचे हितसंबंधच असे परस्परविरोधी आहेत, कीं एकीच्या विनाशावांचून दुसरीचा विकास होऊंच नये. स्वतःच्या राष्ट्रांतील कृषिप्रधान समाजव्यवस्था पूर्णपणें भंगून टाकूनच भांडवलशाही वाढली आहे. अर्थात् तिचें पाऊल आपल्या राष्ट्राची शीव ओलांडून ज़गांत इतर कोणत्याहि प्रदेशांत पडलें तरी स्पर्शमात्रेंकरून यंत्रविहीन समाज-

व्यवस्थेचा मुडदा पाडण्याची तिच्या अंगची जी करामत ती कांहीं नष्ट होत नसते.

यंत्रयुगाच्या पूर्वीं होऊन गेलेले सम्राट् हल्लींच्या सम्राटांपेक्षां कमी द्रव्यलोभी, कमी अधिकारलोलुप, अथवा कमी क्रूर होते असें नव्हे. आपल्या राज्याला प्रदेशांमागून प्रदेश जोडून घेण्यासाठीं त्यांनीं हजारों लढाया केल्या, लाखों माणसांच्या रक्ताचे पाट वाहवले, आणि लूटमार व जाळपोळ किती केली त्याची तर गणतीच नाहीं. पण आधुनिक साम्राज्यवाद्यांचे हातीं असणारी यंत्रसामुग्री त्यांचे हातीं नसल्याकारणानें त्यांच्या लोभक्रौर्यादींना साहजिकच आळा बसत असे.

१८५७ सालीं इंग्रजी सत्ता उखडून टाकण्यासाठीं आपल्या देशांत जेव्हां बंड झालें तेव्हां जनतेंतील असंतोषाला जीं अनेक कारणें घडून आलीं त्यांपैकीं एक कारण असें होतें म्हणतात, कीं जमिनीवर पसरलेले आगगाडीचे रूळ आणि तारायंत्राच्या तारा यांचेकडे पाहून लोकांना असें वाटूं लागलें, कीं हा टोपीकर भूमातेला लोखंडानें आणि तांब्यानें करकचून जखडून टाकणार आहे! ही दंतकथा खरी असो वा खोटी असो, ज्या प्रदेशावर आगगाडीचे रूळ आणि तारायंत्राच्या तारा पसरल्या गेल्या तो प्रदेश साम्राज्यशाहीनें पूर्णपणें अंकित केला असेंच आजचे राज्यशास्त्रज्ञ मानतात. भालेबरच्यांना, बाण आणि गोळ्यांना जी कामगिरी करतां येणार नाहीं ती कामगिरी आगगाड्या, तारायंत्रें, मोटरलॉऱ्या करतात. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश साम्राज्याला जोडून देणारा प्रख्यात साम्राज्यवादी सेसिल ऱ्होड्स म्हणत असे, कीं "बंदुकीच्या गोळ्यांपेक्षां आगगाडीचे रूळच स्वस्त पडतात आणि गोळ्यांच्या मानानें ते जातातहि लांबवर." या नवीन साधनांच्या साहाय्यानें अंकित प्रदेशावर सैन्यांची हाल-चाल कल्पनातीत झपाट्यानें करतां येते. पूर्वीच्या काळच्या 'राघो

भरारी'चें सैन्य घेतलें तरी तें दिवसाकांठीं ६० ते ८० मैलां-पलीकडे मजल मारीत नसे. पण हल्लींचें सैन्य आज मुंबईहून निघालें, कीं दुसऱ्या दिवशीं तांबडें फुटावयाच्या आंत दिल्लीला जाऊन पोंचतें व त्यामुळें लक्षावधि चौरस मैलांचा प्रदेश परसांतल्या वाफ्याप्रमाणें राखणें व तेथील अधिकारी वर्गावर व रयतेवर वचक ठेवणें शक्य होतें. अठराव्या शतकांत साताऱ्यास अगर पुण्यास राहून हिंदुस्थानचें राज्य हाकणारे छत्रपति अगर पेशवे घेतले तर त्यांचे हात माळव्या-बुंदेलखंडापर्यंत कसेबसे तरी पोंचत. तेथील सुभेदारानें पुंडावा केला अथवा शत्रूशीं संगनमत केलें तरी त्याचें पारिपत्य करणें सोपें काम नव्हतें.

शिवाय पूर्वीच्या काळीं जेते आणि जित यांच्या शस्त्रसाधनांतहि फारशी तफावत नव्हती. मोगल आणि मराठे घ्या, किंवा रोमन आणि तत्कालीन ब्रिटिश बेटांतील जनता घ्या, दोन्ही पक्षांतील शस्त्रबळ फारसें विषम असल्याचें आढळत नाहीं. बाण, भाले, तलवारी, ढाली, गदा, परशु असल्याच साधनांनीं दोन्ही बाजू लढत. पण सध्यांचीं प्रबळ राष्ट्रें लढूं लागलीं कीं यंत्रसामुग्रीच्या दृष्टीनें अपूर्ण राष्ट्रांचे हाल काय वर्णावे? शौर्यधैर्यादि गुणांचा पाड विषारी धुरापुढें लागावा कसा? ॲबिसीनिया आणि इटली, चीन आणि जपान यांचेमधील युद्धांत ही गोष्ट स्पष्ट झाली. आपल्याहि देशाला इंग्रजांच्या वरचढ शस्त्रबळापुढें नमावें लागलें. (शस्त्रबळाचे आणि साधनबळाचे हे जे फरक ते त्या त्या देशांत विद्यमान असणाऱ्या उत्पादन-पद्धतीच्या फरकांतून निर्माण झालेले असतात ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.)

यंत्रयुगापूर्वीच्या साम्राज्यशाहीची सूत्रचालना करणारा वर्ग सरदार-सरंजामदारांचा होता. स्वतःचें राज्य राजा वाढवीत जाई

व इतक्या लांबलांबच्या प्रदेशाचें स्वामित्व खुद्द आपल्या हातीं ठेवणें आणि राजधानीच्या शहरांतून सर्व साम्राज्याची व्यवस्था पाहणें अशक्य असल्यामुळें जिंकलेल्या मुलखावर राजुक, नबाब, अथवा सुभेदार नेमावे लागत. त्या त्या प्रांतांपुरते तेच राजे असत. अशी परिस्थिति असल्याकारणानें साम्राज्य वाढवण्यासाठीं राजाइतकेच सरदारहि उत्सुक असत. त्या वेळच्या समाजांत संपत्ति-उत्पादनाचें मुख्य साधन म्हणजे जमीनच होती. " उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट नोकरी " या म्हणीचा तो जमाना होता. तेव्हां आसमुद्र पृथ्वी आपल्या छत्राखालीं आणावी हीच पूर्वीच्या सर्व राजांनीं व सरदारांनीं महत्त्वाकांक्षा धरल्यास नवल काय ? आणि म्हणूनच भींमथडीच्या व गंगथडीच्या घोड्यांना अटकेचें पाणी पाजणारांचे पवाडे आम्हीं गाइले.

पण उत्पादनपद्धति बदलल्याबरोबर समाजव्यवस्था बदलून तरवारीवर तागडीनें मात केली आणि शेती, व्यापार, नोकरी असा क्रम होता तो पालटून व्यापार, नोकरी, शेती असा उरफाटा प्रकार झाला. नव्या युगांत यांत्रिक उत्पादन-साधनांना पहिलें स्थान प्राप्त झालें. बळिराजाची सद्दी संपून व्यापारी म्हणजे भांडवलवाला वर्ग समाजाच्या शिखरावर चढून बसला. शेतकरी समाजाबरोबर सरदारवर्गाचा पाडाव होऊन समाजाच्या धारणा-रक्षणा-चालनाची सूत्रें म्हणजेच शासनाधिकार व्यापारी वर्गाचे हातीं आले. या नव्या भांडवलशाहीचा संचार पूर्वींच्या सरदारशाहीच्या संचाराहून अनेक पटींनीं व्यापक झाला. पूर्वीं घोडा जाईल तेथपर्यंत साम्राज्यें वाढत असलीं तर आतां आगगाडी, तारायंत्र आणि विमानें जातील तेथपावेतों म्हणजेच जगाच्या टोंकापर्यंत साम्राज्याच्या शिवा पसरलेल्या आहेत. भांडवलवाल्याच्या हातीं सध्यां जें अर्थबळ आणि

शस्त्रबळ एकवटलें आहे त्यांच्या पासंगासहि पूर्वींचें अर्थबळ आणि शस्त्रबळ लागणार नाहीं.

इतकेंच नव्हे तर अर्थबळ आणि शस्त्रबळांच्या जोडीला या नवीन साम्राज्यवादी वैश्यांच्या अथवा भांडवलवाल्यांच्या पाठीशीं फार प्रचंड असें भावनाबळहि उभें असल्याचें दिसून येईल. भांडवलशाहीनें सरंजामदारी समाजव्यवस्था नष्ट करून टाकली व त्याचे जागीं नवीन समाजव्यवस्था कायम केली हें सांगितलेंच. त्याच व्यवस्थेंत राष्ट्र या कल्पनेचा उगम झाला. आणि भांडवलशाहीचा जोर वाढतां वाढतां ती इतर प्रदेश जसजसे अंकित करीत चालली तसतशी राष्ट्रीय भावनेचीहि जोमानें वाढ झाली. माझें राष्ट्र हें जेत्यांचें राष्ट्र आहे, तें पराभूत होणें शक्यच नाहीं, आम्हा लोकांना ईश्वरानें जगाचें स्वामित्व देऊं केलेलें आहे, इत्यादि कल्पना रुजूं आणि फोफावूं लागल्या. वाढत्या साम्राज्यापासून राष्ट्रांतील भांडवलवाल्यांना अचाट नफा झाला हें खरें, पण त्याचेच बरोबर दिवाणखान्यांत बसून सवडीच्या वेळीं त्यांना अध्यात्म ऐकवणारे पुराणिक म्हणजे पाद्री, त्यांच्या साम्राज्यांतील संपत्तीची राखण करणारे सैनिक व त्यांच्या कारखान्यांत राबणारे मजूर यांच्याहि पोटांत चार घास अधिक जाऊं लागले. राष्ट्रांतील पांढरपेशांचीं मुलें सनदी नोकर म्हणून अंकित प्रदेशांत अधिकाराचे जागांवर जाऊं लागलीं. अशा तऱ्हेनें सर्व तऱ्हेच्या व पेशांच्या लोकांत साम्राज्यवादाची गोडी, निदान कांहीं काळ तरी, उत्पन्न करून त्यांच्या निष्ठेचें प्रभावी सामर्थ्य आपल्या साम्राज्यलोभाच्या पाठीशीं उभें करणें सोपें झालें. लिओनार्ड वूल्फ नांवाच्या एका प्रसिद्ध ग्रंथकारानें म्हटलें आहे तें अगदीं योग्य आहे, कीं फ्रेंच राज्यक्रांतींतून जन्मास आलेलें कमालीचें संघटित, कार्यतत्पर, राष्ट्राभिमानानें पूरित, आणि शस्त्रास्त्रांनीं सज्ज असें

राष्ट्रयंत्र या भांडवलवाल्यांच्या पाठीशीं तयार असल्याकारणानें यांत्रिक युगांतून निर्माण झालेली ही नवीन संस्कृति पूर्वकालीन संस्कृतीपेक्षां अधिक चढाऊ, जयिष्णु व लोभी अशी बनली.

साहजिकच तिनें सर्व जगाचा नूर बदलून टाकला. तिच्या हल्लयापुढें पूर्वीचीं राष्ट्रें विलयास गेलीं, पूर्वींची समाजव्यवस्था रसातळाला पोंचली, आणि मानवजातींत नवें सामर्थ्य, नवे संबंध, नव्या घडामोडी, नव्या समाजव्यवस्था, नवे प्रश्न, तिच्यामुळें निर्माण झाले.

साम्राज्यांची वाढ : : २

(१) १८०० पासून १८७० पर्यंत

पृथ्वीच्या पाठीवर जेवढी म्हणून भूमि आहे तिच्यापैकीं जवळ जवळ एकचतुर्थांश भूमि आणि जगांतील लोकसंख्येच्या जवळ जवळ एकचतुर्थांश लोक ब्रिटिशांच्या यूनियन जॅकखालीं जीवन कंठीत आहेत. ही लोकसंख्या अंदाजें ५० कोटि भरेल. त्यांत गोरे लोक असें ज्यांना आपण म्हणतों ते ७ कोटि आणि बाकीचे ४३ कोटि "काले आदमी" आहेत. पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांत ब्रिटिश साम्राज्य पसरलेलें आहे. साम्राज्याचा हा पसारा प्लासीच्या लढाई-पासून १९१४ च्या महायुद्धानंतरच्या व्हर्साय येथील तहापर्यंतच्या काळांत म्हणजे अवघ्या १६० वर्षांत झालेला आहे. साम्राज्याचा वृक्ष इतका प्रचंड, दिगंतव्यापी दिसत असला तरी, त्याचें बीज फार

अल्प आहे; आणि तें यंत्रशक्ति आणि पुंजीपति ऊर्फ भांडवलदार यांचे संबंधापासून निर्माण झालेलें आहे.

ईस्ट इंडिया कंपनीनें बंगाल जिंकून घेतला व तेथील राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून त्या वेळचा इंग्लंडचा मुख्य प्रधान पिट यानें १७८४ मध्यें इंडिया ॲक्ट केला; आणि १७८५ सालीं इंग्लंडांत कापसाची गिरणी सुरू झाली. यंत्र आणि साम्राज्य यांच्या ह्या जन्मतिथि लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. यंत्राच्या बळावर वस्तु उत्पादन करण्याचे प्रयोग इंग्लंडांत शें-सवाशें वर्षें चालूच होते. यंत्र म्हणजे थोड्या वेळांत अधिक काम देणारें व न दमतां अगदीं मोडून पडे-पर्यंत चालणारें साधन. जेम्स वॅट यानें वाफेच्या साहाय्यानें चालणारें एंजिन शोधून काढलें हें आपणांपैकीं पुष्कळांस माहिती असेलच. आणि एकदां यंत्राचा शोध लागल्याबरोबर अलीबाबाला चोरां-च्या भांडाराचें दार उघडण्याचा मंत्र माहिती झाल्याप्रमाणें प्रकार झाला! यांत्रिक धोटा, आगगाडी, आगबोट वगैरे शोध त्यानंतर अवघ्या २५-५० वर्षांचे अवधींत लागले, आणि पुस्तकाच्या सुरुवातीस सांगितलेलें यांत्रिक अथवा औद्योगिक क्रांतियुग अवतरलें.

यंत्रशक्ति समाजांत अवतरल्याबरोबर कोणत्या घडामोडी घडून आल्या? कार्ल मार्क्सनें आपल्या कॅपिटल नामक जगप्रसिद्ध ग्रंथांत त्यांचें सविस्तर वर्णन दिलें आहे. त्या ग्रंथांतील उतारे घेऊनच आपण यंत्रानें घडवून आणलेल्या चमत्कारांचा इतिहास वाचूं या. १८५१ सालीं एका साक्षींत एक भांडवलवाला म्हणतो:—

"आधुनिक यांत्रिक शोधाचें वैशिष्ट्य हें आहे कीं, त्यामुळें आपोआप चालणारीं अवजारें (म्हणजेच उत्पादन-साधनें) उत्पन्न होतात. या यंत्रावर मोठ्या माणसांप्रमाणें लहान पोरहि काम करूं शकतें. त्यानें करावयाचें तें इतकेंच, कीं यंत्रानें सुरळीतपणें चालव-

लेल्या कामावर नजर ठेवावयाची. केवळ आपल्या कसबाची शेखी मिरवणाऱ्या कारागिरांना या यंत्रांनीं निकामी केलें आहे. पूर्वीं मी जेथें १५०० माणसें लावीत असे तेथें आतां या शोधामुळें ७५० माणसें पुरतात. यामुळें माझा नफा फारच वाढला आहे." त्याचप्रमाणें दुसरे एक फॅक्टरींचे इन्स्पेक्टर होते ते सांगूं लागलें, कीं "एखाद्या कामास विशेष कौशल्य अगर तत्परता लागत असल्यास तें कुशल कारागिरास द्यावेंच लागतें. पण त्यांतील कौशल्याचा भाग उरकणारें यंत्र निर्माण झालें रे झालें, कीं लगेच या कसबी कारागिरास गचांडी मिळते. मग त्या कामावर लहान मुलालासुद्धां नेमतां येतें. यंत्र हें माणसापेक्षां केव्हांहि अधिक नियमित असल्यानें त्याचे बाबतींत कसर अथवा चुकारपणा यांना सवडच उरत नाहीं."

थोडक्यांत म्हणजे हीं यंत्रें निर्माण झालीं व इंग्लंडांतला कोष्टी, सुतार, लोहार वगैरे छोटे छोटे धंदे करणारा जो वर्ग होता तो सफई बुडाला. आणि तो वर्गच केवळ बुडाला असें नाहीं तर हा हरहुन्नरीवर्ग ज्या शेतीप्रधान समाजव्यवस्थेवर जगत होता ती समाजव्यवस्थाहि ठार झाली. यांत्रिक आणि औद्योगिक क्रांति झाल्यावर काय परिणाम घडून येऊं लागले ते कलमवार मांडावयाचे तर असे मांडतां येतील:—

(१) शेतकीवर आधारलेली समाजपद्धति व आर्थिक व्यवहाराची पद्धति यांचा समूळ नाश झाला.

(२) शेतीवरून उठलेले आणि धंदे बुडाल्यामुळें बेकार झालेले हजारों लोक मजुरांच्या पंक्तीला येऊन बसल्यामुळें, देशांत पूर्वीं नसलेला मजूरवर्ग म्हणून एक नवीनच वर्ग निर्माण झाला. या वर्गाचें वैशिष्ट्य हें, कीं स्वतःच्या अंगच्या ताकदीपलीकडे दुसरें कोणतेंहि पैका मिळवण्याचें साधन त्याचेपाशीं उरलेंच नाहीं

(३) लोकसंख्या झपाट्यानें वाढूं लागली.

(४) अन्नसामग्री आणि कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाला लागणारें कच्चें द्रव्य म्हणजे कापूस, ताग, नीळ, इत्यादि आयात करणें आवश्यक होऊन बसलें.

(५) हजारों मजूर भांडवलदारांच्या दाराशीं राबूं लागल्यानें त्यांच्या श्रमापासून होणाऱ्या फायद्याचा पैसा भांडवलदाराच्या तिजोरींत साठूं लागला आणि भांडवदारांच्या संपत्तीला न भूतो न भविष्यति असा पूर येऊन समाजांतील राज्यव्यवहारासकट सर्व व्यवहाराच्या नाड्या त्यांचे हातीं आल्या.

वर उल्लेख केलेल्या गोष्टी यंत्राचा शोध लागल्याबरोबर एकदम घडून आल्या असें नव्हे; तशाच त्या इंग्लंडांतच तेवढ्या घडून आल्या असेंहि नव्हे. इंग्लंडांत यंत्राचे योगानें मालाच्या पर्वता-सारख्या राशी वाढूं लागल्या तेव्हां त्या मालाला वाट मोकळी करून देणें आवश्यकच झालें. युरोप खंडांत सर्वांत अगोदर यांत्रिक व औद्योगिक क्रांति जर कोठें झाली असेल, तर ती इंग्लंडांत. इंग्लंडच्या मानानें जर्मनी, रशिया, मध्ययुरोप वगैरे देश मागासलेलेच होते. तेथें इंग्रजी माल जाऊं लागला. तसाच, तो हिंदुस्थान, ब्रह्मदेश या देशांतहि घुसूं लागला. हा यंत्रावरचा माल हिंदुस्थानच्या किनाऱ्या-वर उतरल्याबरोबर पूर्वी इंग्लंडांतला विणकरवर्ग जसा त्यानें बुडवला होता तसाच आपल्या देशांतील विणकरवर्गहि त्यानें रसातळाला नेला. फरक इतकाच, कीं " इंग्लंडांत जें संकट हळूहळू ओढवलें तें हिंदुस्थानवर एकदमच कोसळलें. हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल १८३४–३५ च्या आपल्या अहवालांत लिहितो, कीं " इंग्लंडच्या व्यापारवाढीच्या इतिहासांत हिंदी लोकांच्या हालअपेष्टांना तोडच नाहीं. ब्रिटिश कापडामुळें बेकार झालेल्या कोष्टयांचीं हाडें

रानोमाळ पसरलीं आहेत व तीं उन्हांत तापून त्यांचेमुळें हिंदुस्थानचीं मैदानें भाजून निघत आहेत." हा देखील मार्क्सच्या कॅपिटल ग्रंथांतून घेतलेलाच उतारा आहे. १८१३ सालानंतर थोड्याच वर्षांचे अवधींत इंग्लंडचा हिंदुस्थानशीं असलेला व्यापार तिप्पट झाला. १८१४ सालीं हिंदुस्थानांतून १२॥ लक्ष गज कापड इंग्लंडांत आयात झालें होतें. त्याची पुढील २० वर्षांत इतकी पीछेहाट झाली, कीं १८३५ सालीं हिंदुस्थानांतलें फक्त ३ लक्ष गज कापड इंग्लंडांत आयात झालें. म्हणजे वीस वर्षांत तीनचतुर्थांश व्यापार बसला. अर्थात् ही गोष्ट केवळ यंत्रांतून निघणाऱ्या मालाच्या चांगुलपणामुळेंच घडून आली असें नव्हे. हिंदुस्थानांतून येणाऱ्या मालावर जबरदस्त जकाती बसवूनहि व्यापाराला पायबंद घालण्यांत आला. आणि हिंदुस्थानी कापडाचें उच्चाटन फक्त इंग्लंडांतूनच नव्हे, तर युरोपांतील इतर देशांतूनहि करण्यांत आलें. हें जकातीचें दांडकें राजकीय सत्ता व्यापारी वर्गाचे हातीं आली असल्याकारणानें हवें तितक्या जोरानें हिंदुस्थानच्या माथीं मारतां येत असे. लिओनार्ड बार्नेस या ग्रंथकारानें उपरोधानें म्हटलें आहे, कीं इंग्लंडचा व्यापार वाढवण्याच्या आणि हिंदुस्थानच्या व्यापारास जमीनदोस्त करण्याच्या कामीं वाफेच्या शक्तीचा जसा उपयोग झाला तसाच या 'जकात-शक्ती'-चाहि झाला.

इकडे हिंदुस्थानचा व्यापार बसत खचत जात असतां तिकडे इंग्रज़ी मालाचा पूर हिंदुस्थानवर लोटत होता. ट्विस्टचें म्हणजे पिळाचें सूत येथील बाजारांत आणून इंग्रजांनीं येथील लाखों कोट्यवधि चरखे बंद पाडले. १८१८ सालानंतरच्या अठरा वर्षांत इंग्लंडांतून हिंदुस्थानांत येणारें सूत ५२०० पटींनीं वाढलें! हाच प्रकार कापडाचे बाबतींत घडल्याचें नमूद आहे. १८२४ ते

१८३७ च्या दरम्यान इंग्रजी कापडाची आयात १० लाख गजांपासून चढतांचढतां ६ कोटि ४० लाख गजांपर्यंत जाऊन थडकली. या व्यापारी घडामोडींचा परिणाम असा झाला, कीं कापडासाठीं जगामध्यें गाजलेलें असें जें डाक्का शहर, त्याची लोकसंख्या १५०००० वरून २०००० वर येऊन ठेपली. डाक्का शहर हें एक उदाहरण म्हणून दिलें. आपल्या महाष्ट्रांतल्या येवलें वगैरे शहरांची अशीच धूळधाण उडाली आहे. हे आंकडे पाहिले आणि त्यांच्याच भरीला किती रंगारी, किती सुतार, किती लोहार ह्या कोष्टयांच्या बरोबरच घरेंदारें सोडून बाहेर पडले असतील याचें गणित डोळ्यांपुढें उभें केलें म्हणजे यांत्रिक युगाचा तडाखा पूर्वकालीन आर्थिक आणि सामाजिक पद्धतींचा कसा चक्काचूर उडवतो तें समजून येईल आणि १८३४ सालचें हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलनें रेखाटलेलें भेसूर चित्र किती सत्य आहे त्याची खात्री पटेल.

सध्यां आपणास घडलेल्या प्रसंगांतील क्रौर्याचा अथवा अंमगळपणाचा विचार करावयाचा नाहीं. कारण विषयाचें ज्ञान होण्याच्या दृष्टीनें आपल्या हर्ष-खेदाचा कांहीं उपयोग नाहीं. सोळाव्या आणि सतराव्या शतकांत इंग्रज, डच वगैरे लोक हिंदुस्थानाशीं व पौर्वात्य प्रदेशांशीं व्यापार करूं लागले त्याच वेळीं त्यांचे दुसरे भाईबंद अमेरिका, पश्चिम आफ्रिका वगैरे देशांशींहि व्यापार करीत होते. फरक इतकाच कीं, इंग्रजी, फ्रेंच, आणि डच जहाजें हिंदुस्थान, सीलोन, जावा आणि सुमात्रा यांतून कापड, जवाहिर, खोबरें, मिरीं, दालचिनी, लवंगा वगैरे पदार्थ नेत असलीं तर त्यांचे अटलांटिक महासागरावर गलबतें चालवणारे भाईबंद पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील तरुण पुरुष व स्त्रियांना पकडून अमेरिकेंतल्या कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना नेऊन विकीत असत. आपण हिंदुस्थानांतले लोक येथील

विणकर वर्गावर कोसळलेल्या आपत्ति पाहून विकल होऊन जातों. पण ह्या निर्बूज इंग्रज व्यापाऱ्यांनीं ज्या निर्दयपणानें नीग्रो लोकांचा 'माल' गलबतांवर भरला आणि विकला त्याला इतिहासांत तोड तरी सापडेल काय ? हिंदुस्थानाशीं व्यापार करणारी जशी ईस्ट इंडिया कंपनी होती, तशीच गुलामांचा व्यापार करणारीहि एक कंपनी होती. तिचें नांव रॉयल आफ्रिकन कंपनी. तिनें स्पॅनिश लोकांबरोबर दरवर्षी ७००० ते ८००० "नीग्रो नग" पुरवण्याचा करार केला होता. आपल्या पॉस्पेक्टस्मध्यें कंपनी लिहिते—

" हिंदी सणंगाची (गुलामांना 'हिंदी सणंग' असें नांव असे) किंमत स्त्रीपुरुषांच्या वयावरून ठरत असते. १५ ते ४५ वयाच्या माणसाला पुरा सणंग मानण्यांत येतें. ४ वर्षांखालचीं मुलें आईबरोबर मोफत देण्यांत येतात...."

पुढील परिच्छेदांत ह्या व्यापारामुळें देशाचें कसें कल्याण होणार आहे त्याचें वर्णन करण्यांत आलें आहे.

" असल्या व्यापाराला पार्लमेंटकडून ९९ वर्षांची हमी मिळाली. कीं त्यामुळें आपली अमेरिकेंतील बागाईत सुधारेल व कदाचित कॅरोलिनामध्यें खाणीहि उपसणें त्यामुळें शक्य होईल. हा व्यापार वाढला कीं खलाशाला काम मिळेल आणि जहाजांचा धंदा वाढेल. तसेंच इंग्लंडांतील व्यापार आणि कारखानेहि चांगलेच सुधारतील. गिन्या पाडण्यासाठीं खूपसें सोनें हातीं येईल, शिवाय वसाहतींतल्या उत्पन्नापासून आणि हे 'सणंग' विकल्यापासून रुपें हातांत पडेल तें निराळेंच."

'सोनें-रुपें हातांत पडेल, व्यापार-कारखाने चांगलेच सुधारतील,' किती सत्य बोलत होती ही रॉयल आफ्रिकन कंपनी ! हिंदुस्थानांतील व्यापार मारून, धंदेवाल्यांना देशोधडीला लावून ज्याप्रमाणें

त्यांनीं सोन्याची गंगा इंग्लंडच्या रोखानें वाहती केली. त्याचप्रमाणें या गुलामांच्या व्यापारानें लिव्हरपूल, साउथहाम्पटन् आणि ब्रिस्टल येथील व्यापाऱ्यांचीं तळघरें सोन्याचांदीनें कांठोकांठ भरून निघालीं. गुलामांच्या व्यापाराला त्या काळीं इतकी कांहीं तेजी चढली होती आणि गुलामाचें जीवन इतकें कांहीं सवंग झालें होतें, कीं पुसतां सोय नाहीं. १७९९ सालचा इंग्लंडांतला एक कायदा गुलामांच्या वाहतुकीबद्दल काय म्हणतो तें पहा:

"गुलामांना नैसर्गिक मृत्यु आला अथवा मारहाणीमुळें अथवा समुद्रांत फेकून दिल्यामुळें, अथवा इतर कोणत्याहि कारणांमुळें मृत्यु आला तर यापुढें कोणत्याहि प्रकारची नुकसानभरपाई मागतां येणार नाहीं."

१८ व्या शतकांत गुलामांच्या व्यापारावर मस्त झालेल्या लिव्हर-पूल बंदरांतील व्यापाऱ्यांच्या घरांवर सोन्याचीं कौलें दिसूं लागलीं होतीं. पण तेथील व्यापाऱ्यांनीं प्रचंडपणांत आपल्या पापाशीं बरोबरी करतील अशीं टोलेजंग देवळें बांधून ईश्वराला खूष करून टाकलें! सुमारें अडीचशें वर्षें हा बरकतीचा धंदा अव्याहतपणें चालू होता. तेवढ्या अवधींत ८०००००० निग्रोंना अमेरिकेंत गुलाम म्हणून विकण्यांत आलें आणि जवळजवळ त्यांच्या पांचपट म्हणजे ४ कोटि निग्रो प्रवासांत अगर धरपकडीच्या धांदलींत ठार झाले. इंग्लंडला पैसा किती मिळाला त्याचा हिशोब अद्यापि व्हावयाचा आहे!

ही सर्व माहिती आपणांस एवढ्याचसाठीं असावयास हवी, कीं इंग्लंडमध्यें भांडवलाच्या संचयास आवश्यक असा जो सोन्याचा ओघ तो कोठून निर्माण होत होता तें कळावें. हा संपत्तीचा ओघ यांत्रिक शोधाचे ओघांत मिसळल्याबरोबर घटोत्कची माया निर्माण होऊन वर सांगितलेल्या औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला. तथापि

आधुनिक अर्थानें इंग्लंडचे साम्राज्यवादी राष्ट्रांत रूपांतर व्हावयास अद्यापि अवकाश होता. प्रथम प्रथम इंग्लंडचा इतर देशांशीं जो संबंध होता तो केवळ व्यापारी दृष्टीचा होता. प्रदेशांचा सरळ कबजा घेऊन त्यावर राजकीय स्वामित्व प्रस्थापित करण्याची कल्पना जोरदार झालेली नव्हती.

भांडवलशाही जोंपर्यंत दळणवळणाच्या, उत्पादनाच्या व संरक्षणाच्या सुधारलेल्या साधनांनीं सज्ज झालेली नव्हती तोंपर्यंत फार लांबचे देश आपल्या ताब्यांत घेऊन तेथील राज्यकारभार चालवावा, तेथील स्वामित्व कायम टिकवावें, आणि आपला माल तेथील बाजारपेठेंत विकून तेथील कच्चा माल खरेदी करावा एवढी प्रचंड महत्त्वाकांक्षा इंग्लंड वगैरेसारख्या युरोपीय राष्ट्रांतील भांडवलवाल्यांच्या मनांत उद्भवत असली तरी राज्यकारभाराचें सुकाणूं हातीं घेऊन रोजचा कारभार चालवण्याची जबाबदारी ज्या मुत्सद्द्यांचे शिरावर पडत असे ते या महत्त्वाकांक्षांना वाव देण्यास फारसे उत्सुक नसत.

त्यामुळें इंग्रजांचें धोरण एलिझाबेथच्या कारकीर्दीपासून सुमारें अडीचशें वर्षेपर्यंत इतर देशांशीं व्यापारी संबंध जोडण्याचेंच राहिलें. ईस्ट इंडिया कंपनीसारख्या कंपन्या १७५० पासून हळूहळू प्रदेश काबीज करीत चालल्या असल्या तरी त्यांना सरकारचें खुषीचें पाठबळ मिळत होतेंच असें म्हणतां येणार नाहीं. व्यापारी कंपन्यांनीं व्यापार करावा, प्रदेश जिंकण्याच्या भरीस पडून मायदेशांतील सरकारला निष्कारण गोत्यांत आणूं नये असें म्हणणारा फार मोठा वर्ग इंग्लंडांत होता. डुप्ले वगैरेसारख्या महत्त्वाकांक्षी फ्रेंच गव्हर्नरांनीं हिंदुस्थानांत चालवलेलीं कारस्थानें फ्रान्समध्येंहि पसंत पडत नसत. पण बंगाल जिंकल्यानंतर इंग्रजांनीं यापुढें प्रदेश जिंकण्याच्या भानगडींत पडूं नये, हेस्टिंग्जसारख्यांच्या राजकीय धोरणामुळें

इंग्लंडची नाचक्की होते, अशा मताचे लोक इंग्लंडांत असले तरी ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारांतील गडगंज नफ्याचा वाटा खाऊन अगर तिच्या नोकरींत असतां हिंदुस्थानांत यथेच्छ चरून गबर झालेला जो नवा धनिक वर्ग इंग्लंडांत पैदा होत होता,तो प्रदेश जिंकण्याला व साम्राज्यें वाढवण्याला अनुकूल होता. तो क्रमाक्रमानें जोर करूं लागला आणि बाहेरून आंत येणाऱ्या संपत्तीच्या आणि देशांत निर्माण होणाऱ्या यांत्रिक शक्तीच्या आधारानें तो जसजसा सामर्थ्यवान होऊं लागला तसतसा संकुचित दृष्टीनें पूर्वीच्याच राजकारणाला चिकटून राहणारा वर्ग मागें हटत गेला.

तथापि साम्राज्य वाढवीत जावें असें म्हणणारांची सरशी व्हावयास बराच काळ लोटावा लागला. डिझराएलीचा पक्ष प्रबळ होईपर्यंत म्हणजे सुमारें १८६० पर्यंत साम्राज्यवादी अल्पसंख्यच होते असें म्हटलें पाहिजे. उदाहरणार्थ न्यू झीलंडमध्यें वसाहत करण्यास इंग्लंड १८४० सालीं तयार झालें नाहीं. नाताळ हा दक्षिण आफ्रिकेचा भाग जिंकून १८४३ घेण्यास तें विशेष उत्सुक नव्हतें. डिझराएलीनें जो सुवेझ-कॅनाल आपल्या ताब्यांत यावा म्हणून प्रयत्नांची शिकस्त केली तो सुवेझ-कॅनाल बांधण्याचे कामीं १८५६ सालीं इंग्लंड मदत करण्यासहि तयार होईना. दक्षिण आफ्रिकेंत सेसिल ऱ्होड्सची चढाऊ साम्राज्यवादाची नीति मान्य होईपर्यंत तेथें साम्राज्य वाढवूं नये याच मताचें प्राबल्य इंग्लंडांत होतें. ज्या बोअर लोकांशीं तुंबळ युद्ध करून पुढें त्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत आलें त्याच बोअर लोकांच्या स्वातंत्र्यास १८५२-५४ सालीं इंग्लंडनें अधिकृत मान्यता दिली होती.

त्याचप्रमाणें १८१९ सालीं सर रॅफेल्स यानें सिंगापूर बेट काबीज़ केलें तें सुद्धां वरिष्ठांचें मत चक्क धाब्यावर बसवूनच. आज

तेंच सिंगापूर हातचें जाऊं नये म्हणून इंग्लंड आपलें सर्वस्व पणाला लावण्यास तयार होईल. आणि हें वैराग्य केवळ त्या काळच्या इंग्लंडमधील राज्यकर्त्यांतच दिसून येत होतें असें नव्हे. फ्रान्स आणि जर्मनी यांचेमध्येंहि त्याच वृत्तीचा शिरकाव झाला होता. सयामचे पूर्वेस असलेला इंडोचायनासारखा मौल्यवान प्रदेश १८७१ सालीं फ्रान्सनें जर्मनीला देऊं केला. पण जर्मनी तो घेण्यासच तयार होईना! आज जर फ्रान्सनें १८७१ ची योजना पसंत आहे का, असें हिटलरला विचारलें तर हिटलर फ्रान्सच्या परराष्ट्रीय दिवाणांच्या गळ्यांत गळा घालून नाचूं लागेल.

१८६८ सालीं युरोपांतील त्या काळच्या राजकीय धोरणाचा उल्लेख बिस्मार्कनें पुढीलप्रमाणें केलेला आढळतो.

" वसाहतींपासून मातृभूमीला असा फायदा होतो आणि तसा फायदा होतो असें म्हणणें हा बहुतेक बाबतींत नुसता भ्रम ठरला आहे. वसाहती वाढवण्याचें धोरण इंग्लंड सोडून देत आहे. वसाहत म्हणजे अतिशय खर्चाची बाब आहे असें आढळून येत आहे."*

इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकला तो तसें कांहीं मनांत नसतांच जिंकला (" The British conquered India in a fit of absentmindedness.") असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे तें सकृद्दर्शनीं विपरीत दिसतें, पण १८६०–७० पर्यंतची परिस्थिति लक्षांत घेतली तर हें म्हणणें तितकेंसें विचित्र वाटणार नाहीं. अमेरिका इंग्लंडपासून अलग झाली पण त्यामुळें इंग्लंडवरची राज्यकारभाराची जबाबदारी कमी होऊन व्यापार मात्र चांगलाच

* " All the advantages claimed for the mother Country are for the most part illusions. England is abandening her colonial policy; she finds it too costly."

सावरला. अमेरिकेंतील वाढत्या उद्योगधंद्यासाठीं अमेरिकेनें जें ३० कोटि पौंड कर्ज उभारलें होतें तें सगळेंच्या सगळें इंग्लंडांतील भांडवलवाल्यांकडून घेतलें होतें. हेंच धोरण इतर देशांचे बाबतींतसुद्धां आपण ठेवावें असें म्हणणारा एक पक्ष इंग्लंडांत प्रबळ होता, आणि १८७० पर्यंत त्याच्या म्हणण्यांत बराच अर्थहि होता.

१८७० च्या सुमारास इंग्लंडची परिस्थिति कशी होती तें सांगतांना "आजचे आणि उद्यांचे नकाशे" (Atlas of Today and Tomorrow) या ग्रंथाचे कर्ते अलेक्झांडर राडौ हे म्हणतात: "औद्योगीकरणांत इंग्लंड हें इतर राष्ट्रांचे मानानें कित्येक वर्षांनीं वडील असल्यामुळें एकोणिसाव्या शतकांत जगाला माल पुरवणाऱ्या कारखान्याचा दर्जा त्याला प्राप्त झाला होता, इतकेंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाहतूक यांच्या बाबतींतहि त्याचा अधिकार बिनजोड होता. प्रत्येक समुद्राच्या किनाऱ्यावर ब्रिटिशांच्या वखारी होत्या आणि सर्व खंडांतून त्यांच्या व्यापाऱ्यांनीं मोठमोठे प्रदेश व्यापारासाठीं मिळविले होते, तेच पुढें ब्रिटिश साम्राज्यांत समाविष्ट झाले."

अर्थात् त्या वेळींसुद्धां युरोपांतील इतर देशांच्या मानानें इंग्लंडपाशीं फार मोठें साम्राज्य होतें यांत शंका नाहीं. पण सध्यां आपण ज्याला साम्राज्यशाही म्हणूं त्या अर्थानें ब्रिटिश सत्ता फक्त हिंदुस्थानांतच त्या काळांत दृढ झाली होती असें म्हणतां येईल. (सध्यांच्या साम्राज्यशाहींत अंकित देशाचें द्रव्यशोषण करणें ही गोष्ट प्रमुख मानली पाहिजे. हें द्रव्यशोषण कर बसवूनच करण्यांत येतें असें नाहीं. त्या देशांत भांडवल गुंतवून व्याजाच्या रूपानें, नफ्याचे रूपानें, अथवा व्यापार कबजांत घेऊन द्रव्यशोषण करतां येतें.)

हिंदुस्थानांत त्या वेळीं गुंतलेलें ब्रिटिश भांडवल अमेरिकेंतल्या ब्रिटिश भांडवलाइतकेंच म्हणजे ३० कोटि पौंडांचें होतें.

(२) १८७० ते १९१३

१८७० नंतर मात्र एका नव्या युगाला प्रारंभ झाला. तोंपावेतों इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, आणि बेल्जम ह्या राष्ट्रांकडे बराच-सा मुलूख होता. जगाच्या सुमारें एकतृतीयांशाइतका प्रदेश वरील राष्ट्रांकडून अंकित करण्यांत आला होता. पैकीं फक्त इंग्लंड व फ्रान्स (विशेषेंकरून इंग्लंड) या देशांतच यांत्रिक औद्योगीकरण झालें होतें व सुप्रतिष्ठित असा भांडवलदारवर्ग तयार होऊन इतर देशांना कर्ज़ाऊ देण्यासारख्या रकमा त्याच देशांतील भांडवलदारांचे हातीं होत्या.

ती स्थिति १८७० चे सुमारास पालटून जर्मनी, बेल्जम् आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका* हीं राष्ट्रें झपाझप औद्योगीकरणाच्या दिशेनें पुढें सरूं लागलीं. फ्रान्समध्यें तत्पूर्वी औद्योगिक प्रगति बरीच झाली असली तरी इंग्लंडच्या मानानें तेंसुद्धां मागेंच होतें. तेथेंहि १८७१ तल्या राज़कीय आंदोलना-नंतर स्थिरस्थावर होऊन भांडवलशाहीची झपाट्यानें वाढ होत चालली. अशा प्रकारें इंग्लंडशीं टक्कर देणारे प्रतिस्पर्धी ॲटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर निर्माण झाल्यावर इंग्रजी मालाचें व इंग्रजी भांडवलाचें युरोपियन गिऱ्हाईक व अमे-रिकन ऋणको नष्ट होऊन इंग्लंडच्या व्यापारी खोतीला पायबंद बसूं लागला, इतकेंच नव्हे तर जर्मनी, अमेरिका, फ्रान्स वगैरे राष्ट्रांज़वळ पैसा साठून तो कोठें गुंतवतां येतो का म्हणून ऋणको शोधीत त्यांचे दलाल जगभर पायपीट करीत हिंडूं लागले. आपापला माल

* १८६६ मध्यें अमेरिकेंतील यादवीचा शेवट होऊन त्यानंतरच्या काळांत त्याची औद्योगिक वाढ फार झपाट्यानें होत गेली.

घेऊन व्यापाऱ्यांनीं जहाजें हाकारलीं आणि कच्च्या मालाचा तपास करीत स्टॅन्ले, मार्शंड, आणि फ्लेगेलसारखे धाडसी प्रवासी जंगलें तुडवीत भ्रमन्ती करूं लागले.

परदेशांत भांडवल गुंतवण्याची स्पर्धा सुरू झाली याचें कारण उघड होतें. तेथें व्यापारांत चढाओढ करण्यासाठीं प्रतिस्पर्धी नसत, कच्चा माल परसांत तयार झाल्याप्रमाणें मिळे आणि मजुरांचे दर अगदीं क्षुल्लक असल्यामुळें नफ्याला भरपूर कूस राही.

ज्या वेळीं इंग्लंडला व्यापारांत अथवा वाहतुकींत जेरीला आणील असा कोणी सामनेवालाच नव्हता त्या वेळीं खुल्या[२] व्यापाराचें सोज्ज्वळ तत्त्व इंग्लंडला चांगलेंच मानवलें. त्यामुळें वसाहती कबजांत घेण्याची त्याला विशेष जरूरी भासली नाहीं. पण समुद्रावर आणि बाजारपेठांत सामनेवाले उभे राहिल्याबरोबर जो तो आपल्या मालकीचे कुणगे– व्यापार, व्याजबट्टा आणि कारखानदारी निर्वेधपणें करतां येईल अशा बिनधोक मालकीच्या जागा–मिळवण्याची खटपट करावयास लागला. त्यामुळें उरलेल्या जगाकडे सगळ्याच भांडवलदार राष्ट्रांचें लक्ष लागून साम्राज्यशाहीच्या युगास मोठ्या धडाक्यानें

१ ह्या नांवासाठीं पुढील प्रकरण पहा.

२ खुला व्यापार म्हणजे मालावर जकात असू नये हें तत्त्व. माल उत्पादन करण्यांत सन १८०० सालापासून इंग्लंड सर्वांचे पुढें असल्यामुळें व समुद्रावर सर्वांत तेंच बलिष्ठ असल्यामुळें हें तत्त्व इंग्लंडच्या फायद्याचें ठरलें. कारण या तत्त्वाचा फायदा घेऊन इंग्लंडला आपला माल प्रत्येक देशांत घुसडतां येई. इंग्लंडचा माल स्वस्त पडल्यामुळें इतर देशांतले व्यापारधंदे तग धरूं शकत नसत. युरोपांत जेव्हां जर्मनीसारखे देश स्वावलंबी बनूं लागले त्या वेळीं त्यांनीं इंग्लंडचें हें स्वार्थी तत्त्वज्ञान धुडकावून लावलें. आतां इंग्लंडांतहि ह्या तत्त्वाचा बोज राहिलेला नाहीं.

सुरुवात झाली आणि जगाचे तुकडे भराभर पडूं लागून त्यांत निरनिराळे रंग भरण्यांत येऊं लागले.

या कालखंडांत इंग्लंडनें आपल्या साम्राज्यांत ४०००००० चौरस मैलांची भर टाकली. इजिप्त, सुडान, पूर्व आफ्रिकेंतील केनया, उगांडा, झांजिबार हे देश, पश्चिम आफ्रिकेपैकीं नायगेरिया, गोल्ड कोस्ट, सिएरालिओनी व सर्वच्या सर्व दक्षिण आफ्रिका इंग्लंडनें घेतली. मात्र दक्षिण आफ्रिका ही युरोपीयनांचीच वसाहत असल्याकारणानें १९०९ सालीं (म्हणजे हिंदुस्थानाला जेव्हां मोर्ले–मिंटो सुधारणा दिल्या होत्या तेव्हां !) तिला वसाहतीचें स्वातंत्र्य देण्यांत आलें.

याशिवाय ब्रह्मदेश, उत्तर बोर्निओ, मलाया, भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांतील सायप्रस बेट व हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील भाग जिंकून घेण्यांत आले. १८५७ सालीं शिपायांचें बंड मोडल्यानंतर हिंदुस्थानांत ब्रिटिशांनीं कांहींच नवें संपादन केलें नाहीं अशी समजूत आहे. पण ती खरी नाहीं. १८६१ ते १८८१ पर्यंतच्या कालांत १९००० चौरस मैल टापू व १८८१ पासून १९०१ चे दरम्यानच्या कालांत २३३००० चौरस मैल टापू ब्रिटिश साम्राज्याला जोडण्यांत आला.

क्षेत्रफळाच्या दृष्टीनें विचार केला तर फ्रेंचांनीं आपल्या साम्राज्यांत जी भर टाकली ती अवाच्या सवाच. पूर्वी त्यांचें साम्राज्य ३५०००० चौरस मैल होतें तें ह्या काळांत ४०००००० चौरस मैलांइतकें फुगलें. आफ्रिकेच्या उत्तर, पश्चिम व विषुववृत्तानजीकच्या टापूंतील फार मोठमोठे तुकडे त्यांनीं हस्तगत केले.

त्याचप्रमाणें मादागास्कार हें हिंदी महासागरांतील प्रचंड बेट व सयामच्या पूर्वेकडील चीनचा भाग इंडोचायना हीं दोन्हीं फ्रेंचांनीं स्वाहा केलीं.

ह्या दोन राष्ट्रांचे पावलांवर पावलें ठेवून युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, जर्मनी, जपान, बेल्जम, इटली वगैरे राष्ट्रें येतच होतीं. जर्मनीनें उशीरा सुरुवात करूनहि फार थोड्या अवधींत दहा लक्ष चौरस मैलांचा टापू काबीज केला.

बेल्जम हा युरोपमधील अगदीं छोट्यापैकीं एक देश; पण त्यानेंहि कांगोसारखा ९२५००० चौरस मैलांचा प्रदेश आपल्या अमलाखालीं आणला, व इटालीनें ९७५००० चौरस मैलांचा प्रदेश आफ्रिकेच्या उत्तरेकडील अंगांतून ओरबडून घेतला.

जपाननें फोर्मोसा व साखालीन हीं बेटें व कोरिया हा आशिया खंडापैकीं चीनच्या साम्राज्यांतील भाग जिंकला आणि अमेरिकेनें हवाई, फिलिपाइन्स हीं बेटें व पनामा कालव्यासाठीं अवश्य तेवढा मध्य अमेरिकेचा तुकडा आत्मसात् केला.

अर्थात् उघड उघड जिंकून घेतलेल्या अथवा भल्याबुऱ्या कोणत्या न्या कोणत्या* तरी उपायानें गिळंकृत केलेल्या देशांची ही यादी झाली. पण दुसऱ्या राष्ट्रांना व्याजीं पैसा देण्याचें ज्या राष्ट्रापाशीं सामर्थ्य आहे अथवा शस्त्रबलानें इतरांना कक्षेंत ठेवण्याचें ज्या राष्ट्रांना सामर्थ्य आहे तीं राष्ट्रें प्रत्येक वेळीं आपला झेंडा तेथें नेऊन रोवतातच असें नाहीं. (उदाहरणार्थ, सयाम हें राष्ट्र स्वतंत्र आहे. पण त्याच्या एका कुशीला फ्रान्स आणि दुसऱ्या कुशीला इंग्लंड आहे, शिवाय जपान त्याची केव्हां धूळधाण उडवील याचा नेम

* पुढील प्रकरण पहा.

नसल्यामुळें. या तिन्ही राष्ट्रांना खूष करण्याचा प्रयत्न सयाम करीत असतें. मलायामध्यें ब्रिटिशांच्या टिनच्या खाणी आहेत. त्यांना स्पर्धा उत्पन्न होऊं नये म्हणून सयाम स्वतःच्या देशांत टिनच्या प्रचंड खाणी आहेत हें माहीत असूनसुद्धां त्या चालत्या करीत नाहीं. हेतु हा, कीं इंग्रज भांडवलदार राजी राहावे. फ्रान्सनें सरहद्दी नीट करण्याचे निमित्तानें सयामचा लचका तोडला तरी सयामनें हूं कीं चूं केलें नाहीं; आणि परवां जपाननें मंच्यूरिया खाल्ला त्या वेळीं राष्ट्रसंघांत जपानला दोषी ठरवण्याची वेळ आली असतां सयामनें 'नरो वा कुंजरो वा' करून मत देण्याचें नाकारलें!) पण याहि बाबतींत इंग्लंडचा पैसा सर्वश्रेष्ठ ठरला आहे. यामुळें इंग्लंडच्या आर्थिक जाळ्यांत अथवा कक्षेंत दक्षिण अमेरिकेंतलीं सर्व राष्ट्रें, सगळें पोर्तुगीज साम्राज्य (सर्व साम्राज्यसुद्धां दुसऱ्या एखाद्या साम्राज्याच्या अंकित असतें!) ग्रीस, दक्षिण अरबस्थान, अफगाणिस्थान व तिबेट इतके देश गवसले. जर्मनीनें ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया आणि तुर्कस्थान ह्यांच्यावर आपली छाप बसवून त्याहिपलीकडच्या तेलानें समृद्ध अशा पर्शियावर आपली नजर रोखून ठेवली. अमेरिकेनें आपल्या गरुडाचे पंख मेक्सिको आणि मध्य अमेरिकेंतील ग्वाडेमाला, साल्वाडोर, पनामा वगैरे छोट्या राष्ट्रांवर पसरले.

चीन हा एकच असा खंडतुल्य देश उरला होता, कीं ज्याच्या मानेवर कोणत्याहि एका राष्ट्राला आपलें जूं चढवणें जमले नाहीं. पण तेथेंहि इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान, फ्रान्स व जर्मनी यांनीं प्रांतानिहाय आपलें आर्थिक वर्चस्व बसवलेंच होतें.

अंकित प्रदेशांत आणि आर्थिक कक्षेंतील प्रदेशांत साम्राज्यवादी राष्ट्रांचें किती भांडवल गुंतलेलें होतें तें पाहिलें म्हणजे त्या त्या

राष्ट्राच्या आर्थिक दर्जाची कल्पना करणें सोपें होईल. इंग्लंडनें १९१३ सालीं म्हणजे (१८७५ पासून १९१३ पर्यंतच्या काळांत) ३७० कोटि पौंड भांडवल परदेशांत गुंतवलें होतें. त्यांपैकीं १७० कोटि पौंड आपल्याच साम्राज्यांत गुंतवले असून ७६ कोटि दक्षिण अमेरिकेंत व ७५ कोटि यु. स्टे. ऑफ अमेरिकेंत गुंतवलें होतें. खुद्द युरोप खंडांत इंग्लंडच्या निर्यात अथवा बाहेर पाठवलेल्या भांडवलापैकीं केवळ ५ टक्के भाग गुंतलेला होता. फ्रान्सची परिस्थिति याच्या अगदीं उलट होती. फ्रेंचांच्या १ अब्ज ६० कोटींच्या निर्यात भांडवलापैकीं ५० कोटि एकटया रशियांत व आणखी सुमारें ५० कोटि पूर्वयुरोपांत गुंतलें होतें.*

पुढील पानावरील कोष्टकाकडे दृष्टि टाकली तर १८७५ पासून १९१३ पर्यंत म्हणजे १९१४ चें महायुद्ध सुरू होण्याच्या घटकेपर्यंत साम्राज्यशाहीची कशी वाढ होत गेली आणि ती होतां होतां बाजार पेठांसाठीं, कच्च्या मालासाठीं, अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठीं सर्व जगाची वाटणी करण्यास निघालेलीं राष्ट्रं शेवटीं एकमेकांना कशीं धडका देऊं लागलीं तें लक्षांत येईल.

फ्रान्सचें भांडवल ऑस्ट्रिया-हंगेरींत १५ कोटि पौंड तर त्याच देशांत जर्मनीचें १७ कोटि पौंड; रुमानियांत १२ कोटि पौंड भांडवल फ्रान्सनें गुंतवलेलें तर जर्मनीचें ५ कोटि पौंड गुंतलेलें. फ्रान्सचे तुर्कस्थानांत १४ कोटि तर जर्मनीचें १० कोटि. ह्यावरून पूर्व युरोपांत फ्रान्स आणि जर्मनीची आर्थिक व्यवहारांतलि झटापट कशी तीव्र होत चालली होती तें लक्षांत येईल.

त्याचप्रमाणें जर्मनीनें अर्जेंटिना आणि चीन या देशांतहि भांडवल पेरण्यास सुरुवात करून इंग्लंडच्या निरपवाद वर्चस्वाला शह

---

* यासंबंधींचें कोष्टक पान ३० वर पाहा.

आंकडे दशलक्ष पौंडांचे आहेत.

धनको राष्ट्रें	निर्यात भांडवल	ऋणको देश
ग्रेट ब्रिटन	३७००	युनाटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (७५०), कॅनडा (५१०), हिंदुस्थान (३८०), ब्रिटिश दक्षिण आफ्रिका (३७०), ऑस्ट्रेलिया (३३०), अर्जेंटिना (३२०), ब्राझिल (१५०), चीन (१२०), मेक्सिको (१००), न्यू झीलंड (८०), रशिया (७०), जपान (६०), चिली (६०), ईजिप्त (४०).
फ्रान्स	१६००	रशिया (५००), ईजिप्त (१५०), फ्रेंच उत्तर आफ्रिका (१५०), तुर्कस्थान (१४०), ऑस्ट्रियाहंगेरी (१४०), रुमानिया (१२०), स्पेन (११०) सर्व्हिया (१००), यु. स्टे. ऑ. अमेरिका (८०), पोर्तुगाल (५०), चीन (४०), जर्मनी (४०).
जर्मनी	१२००	ऑस्ट्रिया-हंगेरी (१७०), यु. स्टे. ऑ. अमेरिका (१५०), तुर्कस्थान (१००), रशिया (१००), स्पेन (१००), अर्जेंटिना (६०), सर्व्हिया (६०), चीन (५०), रुमानिया (५०), जर्मन पूर्व आफ्रिका (५०), चिली (४०).
युनाटेड स्टेट्स	५००	मेक्सिको (२००) कॅनडा १५०

हें कोष्टक अलेक्झांडर राडो यांच्या पुस्तकांतून घेतलें आहे. दुसऱ्या एका पुस्तकांत १९१४ सालीं बाहेरच्या देशांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका या राष्ट्रांनीं गुंतवलेल्या रकमांचे आंकडे अनुक्रमें ४ अब्ज पौंड, ५० अब्ज फ्रँक, २८००० अब्ज मार्क व ९ अब्ज ५० कोटि डॉलर असे दिले आहेत.

देण्याचा घाट घातला होता. आणि केवळ भांडवलाच्या निर्यातींतच नव्हे तर पोलादाच्या उत्पादनांतहि जर्मनी इंग्लंडची बरोबरी करूं पाहत होता.

तेव्हां पूर्व युरोपांतील जर्मनीच्या वाढत्या वर्चस्वामुळें फ्रान्सशीं जर्मनीचें वितुष्ट व परदेशांतील वाढत्या व्यापारामुळें इंग्लंडशींहि त्याचें वितुष्ट. अशा परिस्थितींत कोणाचा तरी पाडाव झाल्याशिवाय इतर राष्ट्रांना आपला संसार पुढें चालवणें अशक्य होतें. निरनिराळ्या राष्ट्रांतील भांडवलशाह्या ह्या आपलें वर्चस्व वाढवतां वाढवतां अशा एका ठिकाणीं येऊन पोंचतात, कीं तेथें युद्धाची ठिणगी पडल्याशिवाय राहूंच नये.

१९१४ सालचें महायुद्ध हें साम्राज्यतृष्णेंतून म्हणजे भांडवलवाल्याच्या व पेढीवाल्यांच्या चढाओढींतून निर्माण झालें. मग त्याचें तात्कालिक निमित्त कांहीं असो. सध्यां सरहद्दीवर चालू आहेत तशा प्रकारच्या चकमकी तर ह्या ४०-५० वर्षांच्या काळांत अखंड चालूच होत्या. पण १९१४ पासून १९१८ पर्यंत जें महायुद्ध झालें त्यामुळें शतकानुशतकें मानवानें रचलेली विश्वसंस्कृति नामशेष होते कीं काय अशी स्थिति निर्माण झाली. मेलेल्या माणसांची गणती लाखांनीं, नष्ट झालेल्या संपत्तीची गणती अब्जांनीं करावी लागली. राज्यसत्ता ही धनिकांच्या भांडवलाची केवळ रखवालदार बनली, न्याय, संशोधन, संघटन वगैरेंत निपुण असे लोक त्याचे दास बनले आणि यांत्रिक शोधांच्या पाठबळामुळें अवघी समुद्रवलयांकित पृथ्वी भांडवलशाहीच्या चिमट्यांत सापडली. मग तिच्या अंगभूत असणारे दोष बळावल्याबरोबर सर्व पृथ्वीवरील मानवी जीवन निश्चेष्ट झाल्यास नवल तें काय ? भांडवलशाहीच्या साम्राज्यतृष्णेस मर्यादा असणेंच शक्य नाहीं. भांडवलशाही ही कांहीं व्यक्ति नाहीं. ती एक अमानुषी

शक्ति आहे. यांत्रिक उत्पादन-साधनांवरील खाजगी मालकीच्या पोटीं निर्माण झालेली ती एक पद्धति आहे. ती नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत महायुद्धासारखे विश्वसंहार करणारे प्रलय दर पिढीवर कोसळणारच.

हें मत खरें कीं खोटें याची शहानिशा करावयास लांब जावयास नको. हातच्या कंकणाला आरसा हवा कशाला ?

(३) १९१८ ते १९३६

१९१४ ते १९१८ सालचें महायुद्ध हें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी येथील विकसित भांडवलशाह्यांतल्या म्हणजेच साम्राज्यशाह्यांमधील विरोधामुळें निर्माण झालें ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असतां, त्या वेळीं इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स यांनीं स्वतःला लोकशाहीचे कैवारी म्हणून घेतलें. जर्मनीला लोकशाहीचा मारेकरी म्हणून शिव्या घातल्या आणि लोकांची दिशाभूल केली. पुढें १९१८ सालीं युद्ध बंद झाल्यावर 'लोकशाही', 'स्वयंनिर्णय' वगैरे गोंडस, सोज्ज्वळ, उदात्त शब्दांची जपमाळ लांब फेकून देऊन हीं राष्ट्रें जर्मनीचें साम्राज्य आपसांत वाटून घेण्याच्या कामीं गर्क होऊन गेलीं. १९१८ मध्यें जगाच्या नकाशाचे रंग पुन्हा एकवार पालटले व इंग्लंड आणि फ्रान्स हीं साम्राज्यें आकारानें, प्रतिष्ठेनें आणि बळानें अधिकच वाढलीं. म्हणून त्या सालीं जगाची फेरवाटणी झाली असें मानण्यांत येतें.

१९१८ मध्यें जर्मनीचा पराभव झाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्यांत १० लक्ष चौरस मैलांची आणि ८५ लक्ष प्रजाजनांची भर पडली. फ्रान्सला २५०००० चौरस मैल आणि ५५ लक्ष प्रजाजन मिळाले. बेल्जमला २०००० चौरस मैल आणि ३७ लक्ष ५० हजार

प्रजाजन व जपानला १००० चौरस मैल आणि ७० हजार प्रजाजन मिळाले.

ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, स्पेन, बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावरील राष्ट्रें आणि डच वसाहती, अरबस्थान आणि बेल्जम कांगो* एवढ्या टापूवर इंग्रजांचे आर्थिक पाश पसरले ते निराळेच! दक्षिण अमेरिकेंतील १९१४ पूर्वीच्या ब्रिटिश वर्चस्वाला मात्र खो बसून तेथें युनायटेड स्टेट्सनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें आहे. १९२८ सालपर्यंत दक्षिण अमेरिकेंतल्या दहा संस्थानांपैकीं सहा संस्थानांतून इंग्रजी वर्चस्वाची हकालपट्टी झालेली आहे.

याच काळांत फ्रान्सनें झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, रुमानिया आणि पोलंड या देशांत व त्याचप्रमाणें बेल्जममध्येंहि आपली आर्थिक सत्ता दृढ केली.

जर्मनीपाशीं बाहेर पाठविण्यास भांडवल उरलें नाहीं इतकेंच नव्हे, तर इंग्लंड आणि अमेरिका यांचा तो ऋणको बनला. त्याच्या वसाहती तर गेल्याच होत्या, त्यांत भर म्हणून कोळशांच्या व लोखंडाच्या खाणींनीं समृद्ध असे कांहीं टापू फ्रान्सनें घेतले व कांहीं झेकोस्लोव्हाकियाला देण्यांत आले. महायुद्धानंतर झालेली आर्थिक खच्ची व मानहानि ही सध्यांच्या जर्मनींतील मनःस्थितीला आणि एकंदर परिस्थितीलाहि बऱ्याच अंशीं कारणीभूत झालीं आहेत.¶

* "साम्राज्य-संपादनाचे नमुने" हें प्रकरण पहा. सध्यां कांगोमध्यें वनस्पतिजन्य तेलाचा व्यापार सन लाइट सोपचे प्रसिद्ध इंग्रज कारखानदार लेव्हर ब्रदर्स यांचे हातीं असून तेथल्या तांब्याच्या खाणीहि इंग्रजी भांडवलवाल्यांचे मदतीनें चालत आहेत.

¶ याच युद्धाच्या महायज्ञांतून रशियांचें समाजवादी सरकार निर्माण झालें. तें साम्राज्यशाहीचें कट्टर विरोधी आहे.

१९३६ सालच्या जगांतील धनको राष्ट्रें: निर्यात भांडवल कोठें व किती गुंतलें होतें तें पुढें दर्शविलें आहे. (आंकडे द.ल. पौं. आहेत.)

धनको राष्ट्र	निर्यात भांडवल	ऋणको देश
इंग्लंड	३७००	ऑस्ट्रेलिया (५७०), हिंदुस्थान (५३०), युनाटेड स्टेट्स (२८०), ब्राझील (२६०), साउथ आफ्रिका (२६०), चीन (२२०), न्यूझीलंड (१४०), मेक्सिको (१२०), मलाया (११०), चिली (९०), जर्मनी (७०), जपान (७०), पश्चिम आफ्रिका (५०), उरुग्वे (४०), क्यूबा (४०) [हिंदुस्थान, चीन, आस्ट्रेलिया येथें इंग्लंडनें कित्येक कोटींचें नवीन भांडवल गुंतवलेलें ह्यावरून दिसून येईल.]
युनायटेड स्टेट्स	२६००	कॅनडा (७००), जर्मनी (२४०), क्यूबा (१९०), चिली (१४०), अर्जेंटिना (१४०), मेक्सिको (१३०), इंग्लंड (१२०), ब्राझिल (११०), जपान (८०), ऑस्ट्रेलिया (७०), इटली (७०), फ्रान्स (७०), स्वीडन (६०), कोलंबिया (५०), व्हेनेझुएला (५०), बेल्जम् (४०), नॉर्वे (४०), पेरू (४०), चीन (३०), फिलिपाइन बेटें (३०), [अमेरिका ऋणकोचें धनको राष्ट्र झालें. फ्रान्स, इटली बेल्जम् हीं सावकार राष्ट्रेंहि अमेरिकेला सावकार करूं लागलीं. दक्षिण अमेरिकेंत अमेरिकेच्या फार मोठ्या रकमा गुंतून तेथें ब्रिटिश भांडवलशाहीशीं विरोध निर्माण झाला.]

फ्रान्स	७३०	फ्रेंच उत्तर आफ्रिका (१००), स्पेन (८०), अर्जेंटिना (९०), फ्रेंच इंडोचायना (८०), पोलंड (७०), चीन (४०) वगैरे.
जपान	२००	मँच्यूकुओ (१२०), चीन (७०), [जपानची इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स यांचेबरोबर चीनमध्यें स्पर्धा सुरू झाली.]

१९१८ च्या फेर-वाटणीनंतर जर्मनी मागें गेला व जपान हें प्रमुख राष्ट्रांच्या पंक्तींत येऊन बसलें. ब्रिटिश साम्राज्य, फ्रेंच साम्राज्य, युनायटेड स्टेट्स, इटालियन साम्राज्य व जपानी साम्राज्य ह्या पांच साम्राज्यांना प्रबळ राष्ट्रें (Great Powers) या नांवानें लोक ओळखूं लागले, व जगाचा राजकीय अगर आर्थिक व्यवहाराचा प्रश्न निघाला कीं, या राष्ट्रांच्या मतावांचून पान हालूं नये अशी परिस्थिति प्राप्त झाली.

जगामध्यें आतां शांतता नांदणार, लोकशाही नांदणार असें मुत्सद्दीवर्ग बजावून बजावून सांगूं लागला. जणूं कांहीं जर्मनीनें एकटयानेंच सर्व कांहीं कुरापती आणि उपद्याप चालवले होते. १९२८ पर्यंत कशीबशी शांतता टिकली. (तेवढ्या काळांतसुद्धां हिंदुस्थान, ईजिप्त, सीरिया, मोरोक्को वगैरे साम्राज्यशाहीच्या पाशांत सांपडलेल्या देशांत स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं जनतेनें प्रचंड चळवळी चालवल्याच. पण त्या वरील प्रबळ राष्ट्रांनीं दडपून टाकून आपलें बळ सिद्ध केलें.) १९२८ नंतर पुन्हा धरणीकंप होऊं लागले. जपाननें सर्वांसमक्ष चीनला खालीं ओढलें, इटलीनें अबिसीनिया घेतला,

जर्मनीनें ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, मेमेल पचवले; इटलीनें परवांच अल्बेनिया घशांत टाकला.

आज सगळीकडे पुनरपि युद्धाची तयारी आणि युद्धाची घोषणा चालू आहे. लष्करभरती सुरू आहे. साम्राज्यशाही युद्धाचा डोंबाळा आज भडकणार कीं, उद्यां अशा भीतीनें सर्व जगास ग्रासलें आहे. अमक्यानें कुरापत काढली आणि तमक्यानें धक्का दिला म्हणून महा-युद्ध भडकलें ही भाषा आपण यापुढें ऐकून घेतां उपयोगी नाहीं. जगांतील बाजारपेठा काबीज करण्यासाठीं हीं युद्धें होत आहेत, आणि साम्राज्यशाही--भांडवलशाही असेपर्यंत तीं होत राहणारच.

१९३० सालचीं प्रबळ साम्राज्यें

साम्राज्यवादी देशाचें नांव क्षेत्रफळ व लोकसंख्या कंसांत दर्शविली आहे

साम्राज्याचें नांव	क्षेत्रफळ (मैलांत)	लोकसंख्या
ब्रिटिश साम्राज्य (इंग्लंड)	१८१११००० (९४०००)	४८६७००००० (४६००००००)
युनायटेड स्टेट्स साम्राज्य (युनायटेड स्टेट्स)	३७३८००० (३०२७०००)	१३७०००००० (१२३००००००)
फ्रेंच साम्राज्य (फ्रान्स)	४८३२००० (२१३०००)	१०२१००००० (४२००००००)
इटालियन साम्राज्य (इटली)	९९९००० (१२००००)	४३७००००० (४३००००००)
जपानचें साम्राज्य (जपान)	२६३००० (१४९०००)	९१७००००० (६९००००००)

साम्राज्य-संपादनाचे राजमार्ग : : ३

यांत्रिक शोधामुळें समाजाच्या जीवनांत शेंड्यापासून बुंध्यापर्यंत उलटापालट घडून आली. भांडवलवाल्यांचे हातीं यंत्रसाधनें म्हणजे कारखाने, गिरण्या वगैरे राहिल्यामुळें ते समाजांत सत्ताधारी बनले, प्रचंड प्रमाणांत वस्तु तयार होऊं लागल्या. त्या परदेशांत पाठवणें, आणि परदेशांतील धान्य, कापूस, रबर, तांबें, शिसें, जस्त, तेल वगैरे माल आयात करणें आवश्यक झाल्यामुळें बाजारपेठा आणि कच्चा माल निर्माण करणारे प्रदेश ताब्यांत ठेवण्यासाठीं साम्राज्यें आवश्यक वाटूं लागलीं आणि यंत्राच्या जोरावर सैन्य, आणि शस्त्रसामुग्री यांची झपाट्यानें ने-आण करणारीं आगगाड्या, आगबोटी यांच्यासारखीं वाहतुकीचीं साधनें हाताशीं असल्यामुळें साम्राज्यांची आवश्यकता भासण्याचा अवकाश, कीं नवे नवे प्रदेश

अंकित करून घेऊन तीं प्रस्थापितहि करण्यांत आलीं. १८७० सालापर्यंत युरोपांत इंग्लंडच औद्योगिक दृष्ट्या फार पुढें गेलेलें असल्याकारणानें जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम्, रशिया वगैरे राष्ट्रांस साम्राज्याची तहान लागलेली नव्हती. पण युरोपांतील देशांत औद्योगिक क्रांतीचें पाऊल पुढें पडूं लागल्याबरोबर साम्राज्यें संपादन करण्याची जी विलक्षण स्पर्धा या युरोपीय राष्ट्रांत लागून राहिली ती अवर्णनीयच. त्यामुळें १८७० पासून १९०० सालापर्यंतच्या अवघ्या तीस वर्षांच्या काळांत या राष्ट्रांनीं पृथ्वीच्या पाठीवरील जिंकून घेतां येण्यासारखी होती-नव्हती तेवढी जमीन जिंकून तिचें वाटप करून घेतलें. १८७० पर्यंत इंग्लंडनें पुष्कळच मोठा प्रदेश जिंकला होता. पण त्यांपैकीं हिंदुस्थान वगळल्यास उरलेला भाग फारसा मोठा होता असें म्हणतां येणार नाहीं. तेथून पुढें हिंदुस्थानमुळेंच इतर देशहि इंग्रजांना आपल्या ताब्यांत घेणें क्रमप्राप्त झालें! कारण हिंदुस्थानच्या वाटेवरील आफ्रिकेसारख्या प्रदेशांत इतर राष्ट्रांना आपलें वर्चस्व वाढवूं देणें म्हणजे हिंदुस्थान गमावून बसल्यासारखेंच असल्यामुळें इंग्लंडला साम्राज्यसंपादनाच्या शर्यतींत पुन्हा जोमानें भाग घ्यावा लागला. शिवाय त्याला दुसरेंहि एक कारण होतेंच. युरोपांतील राष्ट्रें जोंपर्यंत इंग्लंडच्या मानानें यंत्र-शक्तींत मागासलेलीं होतीं तोंपर्यंत इंग्लंडचा माल फ्रान्स, जर्मनी, रशिया, ऑस्ट्रिया इत्यादि राष्ट्रांतून खपत होता आणि माल खपत होता इतकेंच नव्हे तर इंग्रजांना आपलें सांचलेलें भांडवलहि तेथें गुंतवणें शक्य होतें. पण युरोपांतील राष्ट्रें जसजशीं औद्योगिक बनूं लागलीं तसतसे तेथील भांडवलवाले इंग्लंडच्या व्यापाऱ्यांना आपली घरची बाजारपेठ न मिळेल अशी खबरदारी बाळगूं लागले. त्यांनींहि आपापल्या राष्ट्रांच्या सरहद्दींवर संरक्षक जकातीचे तट

उभारून ठेवल्यावर इंग्रजी मालाला आणि भांडवलाला अर्थात्च दुसऱ्या राष्ट्राकडे वळणें भाग पडलें. १८७० नंतरच्या साम्राज्य-संपादनाला हेंहि एक कारण घडलें आहे.

एकोणिसावें शतक संपत होतें आणि विसावें शतक जगाच्या उंबरठ्यांत पाऊल टाकीत होतें अशा वेळीं विल्यम् स्कॉवेन ब्लंट नामक एका इंग्रजानें मावळत्या शतकाचें सिंहावलोन करून ब्रिटिश साम्राज्यशाहीविषयीं जे वैतागाचे उच्चार काढले आहेत ते वाचण्याजोगे आहेत. तो लिहितो:

" जुनें शतक जवळ जवळ खलास होत आलें आहे. जग खड्ड्यांत पडलें आहे, आणि जगाच्या पाठीवर आतांपर्यंत होऊन गेलेल्या कोणत्याहि साम्राज्यानें केली नसेल इतकी बदमाषपणाची कामगिरी ब्रिटिश साम्राज्य करीत आहे. आपल्या हयातींतच कदाचित् या साम्राज्याचा अंत झालेला आपणांस दिसेल. चीनमध्यें युरोपांतील सर्व राष्ट्रें नरक निर्माण करीत आहेत. मध्ययुगांत जशा कत्तली, लूटमार, विटंबना चाले तशीच आतांहि तेथें चालवीत आहेत. जर्मन बादशहा कत्तल करण्याचा हुकूम सोडीत आहे आणि पोप महाराज कान पाडून घेऊन तटस्थ राहिले आहेत. दक्षिण आफ्रिकेंत आमचे सोजीर किचनेरच्या फतव्याअन्वयें उभीं शेतें पेटवीत आहेत आणि या कृत्याबद्दल आमच्या राणीसाहेब, आमचीं पार्लमेंटें आणि आमचे धर्मगुरु, ईश्वराचीं जाहीरपणें स्तोत्रें गात असून असल्या कृत्यांना पैसा पुरवीत आहेत. फिलिपिनो जनतेला उखडून टाकण्यासाठीं अमेरिकन सरकार प्रतिवर्षीं ५ कोट पौंड खर्चीं टाकीत आहे. बेल्जियन लोकांच्या राजानें आपला सगळा खजिना कांगोमध्यें ओतला असून आपले खिसे भरावे यासाठीं तो निग्रोंना गुरांप्रमाणें राबवीत आहे. या कसाबखान्यांत फ्रेंच आणि इटालियन लोक सध्यां

प्रामुख्यानें भाग घेत नसले तरी स्वस्थ बसण्याची त्यांना मनांतून चीड आली आहे. सर्व गोरीं राष्ट्रें आज उघडपणें हिंसेच्या खेळांत झिंगून, रंगून गेलीं आहेत—जणूं कांहीं ख्रिश्चन धर्माशीं त्यांचा काडीमात्र संबंध नाहीं. ईश्वर या सर्वांचा सत्यानाश करो! ज्या शतकांत जन्माला आल्याचा आम्हांला अभिमान वाटत होता, तें शतक हें अशा रीतीनें मावळत आहे!"

पापभीरु आणि सद्वृत्त माणसाला ब्लंटचे उद्गार यथार्थ वाटतील. पण साम्राज्यशाहीच्या विकासाचा इतिहास असाच असल्याचें आपणांस आढळून येईल. भांडवलशाही ही डोक्यापासून पायापर्यंत रक्तानें माखलेली आहे असें मार्क्सनें एके ठिकाणीं म्हटलेलें आहे. साम्राज्य-संपादनाचा इतिहास हा देखील कपट, फितुरी, लांचलुचपत, कत्तली, दडपेगिरी, असत्य, रक्तपात इत्यादि प्रकारांनीं पानोपान भरलेला आहे. साम्राज्यशाहीच्या जमान्यांत बळी तो कानपिळी हाच न्याय शिष्टमान्य झालेला आढळून येतो.

आफ्रिकेचाच इतिहास पहा. १८७० सालीं सेसिल ऱ्होड्स नांवाचा उंचाड्या आणि हाडकुळा इंग्रज दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरला. त्या वेळीं केप कॉलनी आणि नाताळ येथें ब्रिटिश आणि डच लोकांची वस्ति होती. आंतल्या भागांत बोअर लोकांचीं स्वतंत्र संस्थानें होतीं पण तेथेंहि वस्ति तुरळकच. त्यापुढच्या सर्व प्रदेशावर तद्देशीय प्रजेचें आधिराज्य होतें. पण केवळ १५ वर्षांच्या अवधींत सेसिल ऱ्होड्सच्या प्रयत्नानें बचुआनालँड्स, किंबर्ले, ट्रान्सव्हॉल एवढा प्रदेश ब्रिटिश साम्राज्यांत सामील करून घेण्यांत आला. किंबर्लेमध्यें हिऱ्याच्या आणि ट्रान्सव्हॉलमध्यें सर्व जगांत समृद्ध अशा सोन्याच्या खाणी आहेत. मनांत आलें, भूमिगत संपत्तीचा वास आला, कीं सरळ त्या प्रांतांत घुसावयाचें, फसवा-

फसवीनें अथवा वेळ पडल्यास बंदुका रोखून तेथील जमातीच्या नायकाकडून खरेदीखतें लिहून घ्यावयाचीं व त्या प्रदेशावर आपला ताबा जाहीर करावयाचा असा ह्या साम्राज्यवाद्यांचा डकाइती शिष्टाचार होता व आहे. १८८५ मध्यें बचुआनालँड्स घेतल्यावर त्याच्या उत्तरेला उत्तम हवापाण्याचा असा माताबेले आणि माशोना हे दोन प्रदेश ऱ्होड्सच्या नजरेस पडले व गोऱ्या लोकांना राहण्यास योग्य असे ते प्रदेश आहेत असें वाटल्यावरून ते ताब्यांत घेण्याचें त्यानें ठरविलें. मातावेले येथें लो बेंगुला नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या बरोबर पोर्तुगीज लोक संधान लावीत आहेत अशी कुणकुण लागल्याबरोबर ऱ्होड्सनें आपले तीन लष्करी अधिकारी राजाच्या छावणींत पाठवून राजाची एका कागदावर सही घेतली. " माझ्या राज्यांत जे कांहीं धातु अथवा खनिज द्रव्य असेल त्यांवर ऱ्होड्स याची संपूर्ण मालकी असल्याचा उल्लेख त्या कागदांत होता. ह्या सवलतीबद्दल लो बेंगुला यांना १००० मार्टिनी रायफली, १००००० बंदुकीच्या गोळ्या, आणि १०० पौंड रोकड दरमहा द्यावी असें ठरलें. आपलें एक मालकीचें जहाज असावें अशी राजाची भारी इच्छा होती, म्हणून जोडीला आणखी एक जुनी आगबोटहि त्याला बहाल करण्यांत आली. बिचारा लो बेंगुला ! कांहीं काळानें त्यानेंच खुद्द महाराणी व्हिक्टोरियाला एक अर्ज केला. त्यांत तो मोठ्या अजीजीनें म्हणतो:

" थोड्या दिवसांपूर्वीं मला भेटण्यासाठीं कांहीं लोक आले. सोनें खणण्यासाठीं जागा द्या असें म्हणाले. मोबदला म्हणून कांहीं वस्तु देण्यास तयार झाले. कागद लिहून माझ्या सहीसाठीं पुढें करण्यांत आला. यांत काय लिहिलें आहे असें विचारतां म्हणाले कीं आमचे शब्द आणि तुमचे शब्द त्यांत लिहिले आहेत. मीं सही

केली. नंतर सुमारें तीन महिन्यांनीं दुसरीकडून मला कळलें, कीं त्या कागदांत माझ्या राज्यांतल्या सगळ्या खनिज संपत्तीचा अधिकार दिल्याचें लिहिलें होतें."

या कागदावर बेंगुल्यानें सही केल्यावर थोड्याच काळानें तो सर्व प्रदेश ऱ्होडेशियाचा भाग बनला !

साम्राज्य वाढवण्याच्या कामीं भांडवलशाहीकडे नेतृत्वाची मक्तेदारी असली तरी प्रत्येक ठिकाण भांडवाल्यानेंच जाऊन प्रत्यक्ष हुडकून काढण्याचें अथवा जिंकण्याचें काम केलेलें आहे असें नाहीं. धाडसी प्रवासी, मागासलेल्या जातींना अज्ञानांतून आणि रानटी-पणांतून वर काढण्यासाठीं एका हातांत बायबल, दुसऱ्या हातांत क्रूस आणि ओठांवर येशू ख्रिस्ताचें नांव घेऊन जंगली प्रदेशांत पायपीट करणारे पाद्री, नद्यांचे उगम शोधून काढण्यासाठीं निघालेले संशोधक या सर्वांनींच या कामीं यथाशक्ति हातभार लावल्याचें आढळून येतें. अर्थात् हे संशोधक काय, प्रवासी काय अथवा पाद्री काय ते केवळ प्रारंभ करून देतात. नंतर त्या प्रदेशांतल्या संपत्तीचें शोषण करण्याचें कार्य भांडवलवाल्यांकडेच येतें. सध्यां बेल्जिअमच्या ताब्यांत असलेल्या पश्चिम आफ्रिकेंतील कांगोचेंच उदाहरण घ्या. हा देश पाश्चात्य राष्ट्रांना गुलामांच्या व्यापारामुळें ठाऊक झाला. सतराव्या आणि अठराव्या शतकांत पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील माणसें गुलाम म्हणून पकडून न्यावयाचीं व तीं अमेरिकेंत विका-वयाचीं हा किती बरकतीचा धंदा होऊन बसला होता तें आपण पाहिलेंच आहे. तथापि इंग्रजी व्यापारी आफ्रिकेंतील माणसें वेंचून टिपून नेत असले तरी प्रत्यक्ष आफ्रिकेच्या भूमीवर त्यांनीं आपले तळ ठोकले नव्हते. तयार मालासाठीं बाजारपेठा म्हणून आणि कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या वसाहती म्हणून देशच्या देश ताब्यांत

घेण्याइतकी साम्राज्यशाहीची सर्व बाजूंनीं वाढ झालेली नव्हती. ती प्रवृत्ति १८७० नंतर बळावली आणि कांगो देशाला या नवीन प्रवृत्तीचा चटका लगोलग बसला.

स्टॅन्ले नांवाच्या प्रवाशानें कांगो देशांत प्रवास करून १८७८ मध्यें Through the Dark Continent (अंधाऱ्या प्रदेशांतला प्रवास) हें पुस्तक प्रसिद्ध केलें. तो प्रदेश सुसंकृत करण्यासाठीं आणि त्याचा विकास करण्यासाठीं† इंग्लंडनें आपणांस मदत करावी म्हणून स्टॅन्लेनें खटपट केली; पण त्याला तेथें नकार मिळाल्यावर तो बेल्जमचा राजा लिओपोल्ड याचे दरबारीं गेला. लिओपोल्डनें त्याला पाठिंबा देऊन पैशाची सढळ हातानें मदत केली. कांगो इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना होऊन तिनें तेथील टोळ्यांच्या नायकांकडून ४०० तहनाम्यांवर सह्या मिळवल्या व तद्देशीय लोकांनीं असोसिएशनला रबर, हस्तिदंत सक्तीनें मिळवून द्यावा म्हणून तेथील रहिवाशांवर कर* बसवण्यांत आले.

---

† साम्राज्यवाद्यांच्या भाषेंत कांहीं सोज्ज्वळ शब्द आहेत. त्यांपैकीं विकास-करणें (To develop), सुसंकृत करणें (To civilise), आणि खुला करणें (To open up) हे शब्द महत्त्वाचे आहेत, लोकप्रिय आहेत व शिष्टसंमत आहेत. इटलीनें अबिसीनिया जिंकला तो त्यास सुसंस्कृत करण्यासाठीं, जपाननें चीनवर अत्याचार चालवले आहेत ते चीनचा विकास व्हावा म्हणूनच !

* गोरे वसाहतवाले अथवा व्यापारी ऑफ्रिकेंत गेले म्हणजे हजारों एकर जमीन आपल्या ताब्यांत घेतात, खाणी खोदतात, मळे तयार करतात. पण त्यासाठीं शेतमजुरांची जरूरी असते. तेथील रहिवासी आपल्या इकडच्या भिल्ल किंवा गोंड लोकाप्रमाणें आहेत. ते शेतीवर खपायला तयार होत नाहींत. जंगलांत हिंडून शिकार मारून उपजीविका करण्याचा वंशपरंपरा क्रम त्यांनीं काय म्हणून सोडावा ? तेव्हां त्यांस मजुरी करणें भाग पडावें म्हणून गोऱ्या लोकांनीं एक नामी युक्ति शोधून काढली आहे. ती

[पान ४४ वर चालू

पुढें १८८५ सालीं ह्या असोसिएशनचें रूपांतर होऊन " कांगो फ्री स्टेट " अस्तित्वांत आली. कांगोमधील जुलमाची कहाणी म्हणजे अंगावर शहारे आणील, रक्त गोठवून टाकील, अशा कृष्णकृत्यांची कहाणी आहे. पण त्यामुळें बेल्जममधल्या व्यापाऱ्यांचा खूप फायदा झाला यांत शंका नाहीं. १८९१ सालापासूनच्या ९ वर्षांत कांगोमधून निर्यात होणारें रबर ३ लक्ष फ्रँकपासून ३ कोटी ८९ लक्ष फ्रँक इतक्या किंमतीपर्यंत वाढलें आणि हस्तिदंत २८ लक्षांचें निर्यात होत होतें तें ५३ लक्ष फ्रँकच्या किमतीचें निर्यात होऊं लागलें. तथापि बेल्जमच्या भांडवलशाहीनें कांगोच्या बाबतींत जरा अदूरदर्शीपणाचेंच कृत्य केलें असें म्हटलें पाहिजे. कारण रोज सोन्याचें अंडें घालणारी कोंबडी मारून तिच्या पोटांतलि सगळी अंडीं एकदमच लाटावींत असा विचार करणाऱ्या माणसाप्रमाणें बेल्जममधील भांडवलशाहीनें कांगोमधील रहिवाशांना इतक्या

[पान ४३ वरून]

म्हणजे प्रत्येक रहिवाशावर वार्षिक कर बसवणें. हा औरंगजेबाच्या जिझीया कराचाच आधुनिक मासला आहे. कर भरण्यास रोख पैसा गाठीशीं नसल्यामुळें त्यांना मजुरीवर जावेंच लागतें. १९२६ सालीं दक्षिण ऱ्होडेशियातील अज्ञान मुलांसंबंधीं एक कायदा पास करण्यांत आला असून त्या कायद्याअन्वयें मुलांचा जन्म झाल्यापासून तीं विकत घेतां येतात. (जपानमध्येंहि लहान मुलें कारखानदारांना विकण्याचा प्रघात आहे.) आफ्रिकेंत १४ वर्षांखालील मुलांना– म्हणजे निग्रो मुलांना—वेताचे फटके मारण्याचा अधिकार मालकांस आहे. दक्षिण आफ्रिकेंत १५ लक्ष गोरे आणि ५० लक्ष काळे आदमी म्हणजे मूळचे रहिवाशी आहेत. १५ लक्ष गोऱ्या लोकांच्या ताब्यांत २३ कोटी एकर जमीन तर ५० लक्ष निग्रोंना २ कोटी ७० लक्ष जमीन अशी विभागणी आहे. अर्थात् गोऱ्या लोकांना उत्तम सकस जमीन मिळाली आहे हें सांगणें नकोच. सोन्याच्या खाणींतील गोऱ्या कामगारास पाळीची १८ शि. ७ पेन्स तर निग्रो कामगारास २ शि. ८ पेन्स मजुरी मिळते.

निर्दयपणानें राबवून घेतलें, कीं त्यांची लोकसंख्या ४ कोटींवरून उतरत उतरत आतां ती ८५ लक्षांवर येऊन ठेपली आहे. रबर आणि हस्तिदंताचा व्यापार जवळजवळ संपुष्टांत आला आहे. कांगोमधील मृत्युसंख्येचे आंकडे पाहिले तर तेथील लोकसंख्या इतक्या झपाट्यानें कशी घटली याचें आश्चर्य वाटणार नाहीं. न्यू फेबियन रीसर्च ब्यूरोनें प्रसिद्ध केलेल्या Protection of Colonial People या पुस्तकांतून पुढील आंकडे घेतले आहेत. कांगोमधील रुंडाउरुंडी येथील मजुरांसंबंधींचे हे आंकडे आहेत.

	साल	हजारीं मृत्यूचें प्रमाण
पुरुष	१९२९	४०·४४
	१९३०	२३·००
स्त्रिया	१९२९	५०·७४
	१९३०	३४·६०
मुलें	१९२९	२२२·५५
	१९३०	३२९·००

राष्ट्रसंघ प्रस्थापित होऊन दहा वर्षे लोटल्यानंतर कांगोंतील मृत्युसंख्येचें हें प्रमाण आहे. मग १८७० पासून १९१४ पर्यंतच्या काळांत तेथें प्रत्यक्ष यमाचा दरबारच भरत असेल यांत काय संशय ?

असो. इकडे स्टॅन्ले कांगोमध्यें बेल्जमचें साम्राज्य प्रस्थापित करीत होता त्याच वेळीं टाउबमन नांवाच्या इंग्रजानें १२५००० पौंडांच्या भांडवलावर युनायटेड आफ्रिकन कंपनी काढून नायगर नदीच्या कांठच्या प्रदेशांत व्यापार करण्याचा मक्ता ग्लॅडस्टनकडून मिळवण्याची खटपट चालवली होती. त्या सुमारास एका फ्रेंच कंपनीनेंहि त्याच नदीच्या उगमाकडच्या प्रदेशांत आपले दलाल पाठवले होते. दोनतीन वर्षें इंग्रज आणि फ्रेंच कंपन्यांत भावांची

चढाओढ चालून शेवटीं इंग्रज कंपनीनें फ्रेंच कंपनी विकत घेऊन टाकली.

एवढें होत आहे तों जर्मनीमार्फत फ्लेगेल नांवाचे एक व्यापारी त्या प्रांतांत येऊन दाखल झाले आणि उत्तर नायगेरियांतल्या सुलतानाकडून व्यापाराच्या सवलती मिळवण्यासाठीं त्यांचीं कारस्थानें सुरू झालीं. जर्मनांच्या आधीं आपलें सोवळेंभांडें सुलतानाच्या घरांत फेकून देण्यासाठीं इंग्रजांनीं जोसेफ थॉमस नांवाच्या एका तरुण गृहस्थास धाडलें. तो घाईघाईनें निघाला आणि मोठ्या मुष्किलीनें त्यानें मोका साधला. तेथील प्रमुख नायकाबरोबर तहनामे करून तो परतत होता, इतक्यांत वाटेंतच त्याला श्रीयुत फ्लेगेल भेटले. कोऱ्या तहनाम्यांची भेंडोळीं पडशींत घालून स्वारी पडावांतून चालली होती. बरोबर कांचेचे मणी, काडतुसें, कंदिलाच्या कांचा, अलार्म घड्याळें वगैरे मौल्यवान् भेटीसुद्धां होत्या. पण त्यांचे बेत फसले आणि थॉमस विजयी झाला. नंतर थोड्याच दिवसांत टाउबमननें ४०० तहनामे करून घेतले आणि १८८५ सालीं किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर इंग्रजांनीं आपली सत्ता जाहीर करून टाउबनच्या कंपनीला प्रदेश हस्तगत करून त्याचा राज्यकारभार करण्याची परवानगी दिली. सध्यां नायगेरियाच्या वसाहतीचें क्षेत्र इंग्लंडच्या तिपटीनें असून तेथील लोकसंख्या २ दोन कोटींची आहे. सरकारनें टाउबमन यांना 'सर' ही पदवी अर्पण करून त्यांचा बहुमान केला आहे. हे तहनामे घडवून आणण्याच्या कामांत भाग घेतलेले सर जॉन्स्टन नांवाचे गृहस्थ होते, त्यांनीं 'माझें जीवित' म्हणून एक ग्रंथ लिहिला असून त्यांत तहनामे कसे घडवून आणीत त्याबद्दल मजेदार हकीगत सांगितली आहे. एके प्रसंगीं ते पडावांतून जात असतां त्यांना निग्रो लोकांनीं घेरलें, व आपल्या मुख्याकडे नेलें. सणाचा दिवस

असल्यामुळें नाईक मंडळी दारू पिऊन रंगलीं होतीं. जॉन्स्टन यांनीं "बड्या गोऱ्या राणी"कडून आपण आल्याचें सांगितलें व तहनाम्याचे कागद पुढें केले. कागदावर अधिक अथवा गुणक चिन्हा-सारख्या फुल्या केल्या कीं झाली सही! तेथें ज़मलेल्या नायकांत फुल्या करण्याची चढाओढ लागून राहिली. जॉन्स्टननें त्यांना मणी आणि कापड दिलें व निग्रो लोकांनीं परतभेट म्हणून मेंढरें व बकरीं दिलीं. अशा रीतीनें कागदावर फुल्या उठवून तेथील जमातींनीं ब्रिटिश सत्तेचा अंगीकार केला!

सन १९०० मध्यें सुमारें १० लक्ष पौंड देऊन इंग्रज सरकारनें कंपनीचे हक्क आणि नायगेरियाचा प्रत्यक्ष कारभार आपल्या ताब्यांत घेतला. जर्मनीनें त्याच्याच शेजारचा कामेरूनचा प्रदेश आपणाकडे घेतला होता तो १९१८ च्या तहानंतर फ्रान्सनें बळकावला. जवळजवळ सर्व पश्चिम आफ्रिका आज फ्रान्सचें ताब्यांत आहे असें म्हणतां येईल.

दक्षिण आफ्रिकेंत आणि पश्चिम आफ्रिकेंत इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स आणि बेलजम यांनीं कसा जम बसविला तें आपण पाहिलें. आतां आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर इंग्रजांनीं काय करामती केल्या तें पाहूं. दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीपासून दोनशें सव्वादोनशें वर्षें गुलामांचा व्यापार करून इंग्लंडनें आपल्या घरीं पर्वता-सारखे संपत्तीचे डोंगर उभारले आणि नंतर गुलामांचा व्यापार इंग्लंडमध्यें बेकायदेशीर ठरून आमच्या देशाच्या किनाऱ्याला पाऊल लागलें, कीं दास्याची बेडी खळ्कन तुटून पडलीच असें समजा अशीं भावनोत्कट काव्येंहि त्या वेळच्या कवींनीं लिहिलीं. पण इंग्लंडचें दैव असें आहे, कीं त्याला पापापासून जसा पैसा मिळतो तसा पुण्यापासूनहि लाभ होतो. गुलामगिरी बेकायदा केल्यावर जेथें जेथें

ती चालत असेल तेथें तेथें ती बंद पाडण्याची जबाबदारी इंग्लंडवर आलीच. आणि जेथें ती लवकर बंद पडेना तेथें सैन्य पाठवून ती बंद करणें आणि गुलामगिरीचा हा असला रानटी प्रकार तेथें पुन्हा चालू होऊं नये म्हणून तो भाग कायमचा वहिवाटीस घेणें हेंहि क्रमप्राप्त कर्तव्य होऊन बसलें! पूर्व आफ्रिकेंत असाच प्रकार घडला.

या कामांत इंग्लंडांतील पाद्री, व्यापारी आणि सेनापति या सर्वांनींच मनापासून भाग घेतला. म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य एक झाले म्हणाना!

सुडान, केनया, युगँडा या भागांत गुलामांचा व्यापार मोठ्या धामधुमीनें चालत असे. १८७० च्या सुमारास साम्राज्याच्या वाढीला फार जोरानें सुरुवात झाली तें आपण पाहिलेंच आहे. त्याच वेळीं या प्रदेशांत मुसलमान व्यापारी गुलामांना पकडून विकतात याचा बोभाटा करण्यास मिशनऱ्यांनीं सुरुवात केली. गुलामांच्या व्यापारासंबंधींच्या भडक गोष्टी इंग्रजी वर्तमानपत्रांतून जाड ठशांत येऊं लागल्या आणि ही शरमेची गोष्ट इंग्रजी सत्ता जगांत हयात असतां व्हावी याची चीड येऊन थोर अंतःकरणाचे लोक पुढें सरसावले. त्यांत मिशनरी लोकांच्या बरोबरच ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे सूत्रधार सर विल्यम मॅकिनन हे व्यापारी गृहस्थहि होते. ईश्वरावर श्रद्धा आणि व्यापारांत बरकत यांची सांगड घालण्याची त्यांचे अंगीं विलक्षण हातोटी होती. त्यांना मदत म्हणून लॉर्ड किचनेर, लॉर्ड लुगार्ड आणि नायगेरियाचे प्रकरणामुळें आपल्या ओळखीचे झालेले सर हॅरी जॉन्स्टन हें त्रिकूट होतेंच. पैकीं सर विल्यम् हे वाहतूक कंपनीचे प्रमुख असल्याकारणानें त्यांनीं आपल्या राजकारणाची सुरुवात झांजिबार, युरोप व हिंदुस्थान या देशांना वक्तशीर टपाल नेण्याआणण्यापासून केली. या पुढचें पाऊल म्हणजे १८७७ सालीं

झांजिबारच्या सुलतानाकडून त्याच्या ताब्यांत आफ्रिकेमध्यें' जे जे प्रदेश होते त्यांचेवर अधिकार व तेथील कारभार चालवण्याची परवानगी मिळाली. हे प्रदेश म्हणजेच सध्यां केनया कॉलनी आणि टांगानिका या नांवानें ओळखले जाणारे देश होत. नंतर कांहीं वर्षांनीं ब्रिटिश ईस्ट आफ्रिका असोसिएशन स्थापन होऊन तिला उरलेसुरले सर्व हक्क सुलतानानें देऊन टाकले. या कंपनीचा बखरकार म्हणतो कीं, "अशा प्रकारें सुलतानाची फार दिवसां-पासूनची इच्छा तृप्त झाली." यावर लिओनार्ड वूल्फ यांनीं अशी खोचक टीका केली आहे कीं, "आपला प्रदेश परक्याच्या हवालीं करण्याची इच्छा फार दिवसांपासून मनांत बाळगणारा राजा ही एक इतकी अपूर्व चीज आहे, कीं त्याच्या बाबतींत अधिक चौकशीच करावयास हवी." वरील कंपनी स्थापन झाल्याबरोबर ह्या भागांत बंड उभें राहिलें. सरसाहेबांनीं ब्रिटिश प्रजेला खुलासा दिला, कीं ही गुलामांच्या व्यापाऱ्यांची कारवाई असली पाहिजे. पुंडावा मोडून काढण्यासाठीं लगेच दोन आरमारी जहाजें पाठवण्यांत आलीं. गुलामांचा व्यापार बंद करण्याच्या निमित्तानें लष्करी हालचाली चालू झाल्या व बंडें दडपून टाकून एक दोन वर्षांच्या अवधींत कंपनीचें राज्य स्थिर करण्यांत आलें.

साहाजिकच यानंतर सर विल्यमांचे डोळे नवीन मिळवलेल्या प्रदेशाच्या पश्चिमेस असलेल्या सुपीक अशा युगँडाकडे वळल्यास नवल नाहीं. तिकडेहि गुलामांचा व्यापार थांबण्यासाठीं कॅप्टन लुगार्ड (आतां हे कॅप्टनसाहेब लॉर्ड झाले आहेत) यांना सैन्यासह पाठवण्यांत आलें. या गृहस्थांना न्यासालँडमध्यें असल्या लढायांचा अनुभव आलेला होता. त्यांना युगांडामधील कांहीं रहिवासी आधींच ख्रिश्चन झाले असल्याचें आढळून आलें. याचा अर्थ असा, कीं फ्रेंच व

इंग्रज मिशनऱ्यांनीं तेथील जमीन आधींच पोखरून ठेवलेली होती. पण दोन देशांचे मिशनरी तेथें गेलेले असल्यामुळें कॅप्टन लुगार्ड यांचें कार्य थोडें बिकट होऊन बसलें.

त्याचें कारण उघड होतें. इंग्रजांना आणि फ्रेंचांना नेमका तोच प्रदेश हवा होता; आणि त्यासाठींच त्या दोन्ही थोर राष्ट्रांनीं पाद्र्यांना तेथें अगोदर धाडून दिलें होतें. युगांडाचा राजा म्वांगा हा अत्यंत निर्दय आणि अरेराव आहे असें इंग्रज म्हणत; तर फ्रेंच म्हणत कीं तो दयाळू आणि प्रगतिपर आहे. कसेंहि असो. म्वांगाच्या राज्यांत लवकरच यादवी माजली आणि ब्रिटिशांच्या यांत्रिक बंदुका म्वांगाच्या सैन्या-वर रोखल्या गेल्या. एवढ्यावरून म्वांगा काय समजावयाचें तें समजला आणि त्यानें कंपनीचें वर्चस्व मान्य केलें.

पण युगांडाबरोबर आगगाडीशिवाय व्यापार करीत राहणें किफायतीचें होत नाहीं हें कंपनीच्या डायरेक्टरांना कळून चुकलें होतें. कारण वाहतूक भलतीच महाग पडे. म्हणून १८९० सालीं सर विल्यम् यांनीं त्या दृष्टीनें हालचाल सुरू केली. कंपनीला आगगाडीमुळें फायदा होणार असला तरी आगगाडीचा रस्ता तयार करण्यांतला खरा उद्देश पूर्व आफ्रिकेंतला गुलामांचा व्यापार बंद व्हावा आणि तेथील रहिवासी सुधारावेत एवढाच आहे असें सांगण्यांत आलें.

सुधारणेचें नांव निघतांच पाद्री पुढें सरसावले. कंपनीच्या डायरेक्टरांत एक व्हिक्टोरिया महाराणीचे जांवई होते. तेव्हां आगगाडीसाठीं लागणारा पैका ट्रेझरीकडून मिळवण्यासाठीं फारसे हेलपाटे घालावे लागलेच नाहींत. दुसरे एक डायरेक्टर चर्च-मिशनरी सोसायटीचे खाजिनदार होते. त्यांनीं सोसायटीची खास सभा बोलावून सरसाहेबांच्या योजनेला केवळ नैतिकच नव्हे तर आर्थिक

पाठबळहि द्यावयाचें कबूल केलें. मग काय विचारतां, प्रॉटेस्टंट इंग्रजांकडून भराभर मदत होऊं लागली, आणि अशा प्रकारें युगँडा रेल्वेची प्रस्थापना झाली.

हा प्रकार इकडे चालू असतां न्यासालँडवर सर हॅरी जॉन्स्टन चढाई करून निघालेच होते. अर्थात् तेथेंहि गुलामांच्या व्यापाराची सबब होतीच. मध्य आफ्रिका आणि उत्तर झांबेझिआ हे टापू इंग्रजी रक्षणाखालीं आहेत अशी घोषणा आधींच करून ठेवण्यांत आली होती. पण त्या टापूची व्यवस्था अथवा आंखणी झालेली नव्हती, तें काम जॉन्स्टन यांचेकडे सोपवण्यांत आलें. तेथील गुलामांचा व्यापार अरबांचे हातीं होता व तेथल्या कांहीं निग्रो नायकांचें त्यांना पाठबळ होतें. न्यासा सरोवरांत येणाऱ्या प्रत्येक बोटीकडून कर वसूल करण्याचा अधिकार आपणाला आहे असें सांगून तेथला एक नाइक टोल वसूल करी. कांहीं बोटी व्यापाऱ्यांच्या तर कांहीं पाद्र्यांच्या असत. त्या सगळ्यांनाच जकात भरावी लागते. तेव्हां असल्या उन्मत्त नायकाचा पाडाव करावा म्हणून पाद्र्यांनीं आणि व्यापाऱ्यांनीं एका सुरानें ओरड चालवली.

जॉन्स्टननें ५० शीख शिपाई बरोबर घेऊन चढाई केली. ज़ॉन्स्टनची तुकडी त्या नायकाच्या गांवीं येऊन पोंचते इतक्यांत गुलामांची तुकडी घेऊन चाललेले व्यापारी त्याला दिसले. त्यांना अडवण्यांत आलें. जॉन्स्टनच्या तुकडीजवळ तीन डोंगरी तोफा होत्या त्या त्यांनीं मोर्चावर चढवल्या व व्यापाऱ्यांनीं शरणचिठी दिली नाहीं तर गांव जमीनदोस्त करण्याची धमकी दिली. नाईक ऐकेना. पण तोफांतून एकदोन गोळे सुटून दहा-पांच घरें खालीं आल्याबरोबर हजारों रहिवासी माफीची याचना करीत जॉन्स्टनच्या पायांशीं लोटांगण घालीत आले.

गुलामांचा व्यापार बंद करण्याचें नायकानें कबूल केलें. गढी इंग्रजांचे हवालीं झाली व तिला फोर्ट जॉन्स्टन असें नांव देण्यांत आलें. गढीच्या भोंवतालच्या प्रदेशावर इंग्रजांचें प्रभुत्व मान्य करण्यांत येऊन जकात इंग्रजांनीं वसूल करावी ही गोष्टहि नायकानें मान्य केली.

तात्पर्य, केनया, युगँडा, न्यासालँड वगैरे प्रदेश इंग्रजांच्या सर्वस्वीं आहारीं गेले. १८९४ सालीं कंपनीचा अधिकार खलास होऊन ईस्ट आफ्रिकेवर इंग्रज सरकारचा ताबा जाहीर करण्यांत आला.

नुकत्याच त्रिपुरी येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला इजिप्त-मधील राष्ट्रीय पक्ष जो वफद् त्याचे प्रतिनिधि अभिनंदनाचे संदेश घेऊन मुद्दाम इजिप्तहून आले होते. हिंदुस्थान व इजिप्त हे एकाच दुःखानें समानशील झालेले देश आहेत असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. तेव्हां इजिप्तवर इंग्रजांचें वर्चस्व कसें बसलें तें पाहूं.

१८६९ मध्यें ड लेसेप्स या फ्रेंच इंजिनिअरनें सुवेज कॅनॉलचें काम पुरें केलें. युरोपांतून हिंदुस्थान, सिलोन, सिंगापूर, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतील प्रदेशांशीं दळणवळण ठेवण्याच्या दृष्टीनें सुवेझ कॅनॉल हें एक मर्मस्थान होऊन बसलें. तो आपल्या ताब्यांत असणें आवश्यक आहे ही गोष्ट डिझराएलीसारख्या महाधूर्त साम्राज्यवाद्याचे लक्षांत येण्यास फार अवकाश लागला नाहीं. त्यानें सुवेझ कालवा आपल्या हातीं आणण्याचें ठरवलें. प्रत्यक्ष स्वारी—लढाई न करतां कर्जाच्या जोरावर देश ताब्यांत आणण्याच्या मार्गाचें अवलंबन फ्रान्स आणि इंग्लंड यांनीं केलें. १८६५ ते १८७३ च्या दरम्यान इजिप्तमधील तुर्कस्थानचा व्हाइसरॉय इस्माइलपाशा

याला या दोन देशांनीं जवळजवळ १० कोटी पौंडांचें कर्ज दिलें.* प्रजेला शक्य तितकें पिळून आपली पत वाढवण्याची त्यानें शिकस्त केली; पण त्याचा पाय चिखलांतून वर निघेचना. तेव्हां त्याचे सुवेझ कॅनालमधील शेअर इंग्लंडनें विकत घ्यावें असें ठरलें. डिझराएलीनें इस्माइलपाशाचे शेअर ३६,००,००० पौंड देऊन सन १८७५ सालीं खरेदी केलें. इतकें करून सुद्धां १८७६ सालीं इस्माइलपाशाचें दिवाळें निघावयाचें तें निघालेंच. त्याच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय कमिशन बसवण्यांत येऊन एक इंग्रज व एक फ्रेंच असे दोन दिवाण त्याला मदतनीस म्हणून दिले गेले. पण पाशा त्यांस जुमानीना. पाशाला कर्ज देणाऱ्या युरोपियन सावकारांनीं इंग्रज व फ्रेंच सरकारांवर दडपण आणून पाशाला तुर्की सरकारकडून बडतर्फ करवलें व १८७९ सालीं दुसऱ्या एका नेभळट पाशाची नेमणूक होऊन पुढील पांच वर्षें इजिप्त हा इंग्रज फ्रेंच सरकारांचे जोड अमलाखालीं राहिला.

पण इजिप्तमधील जनता या परकीय लुडबुडीचा द्वेष करूं लागली होती. अरबी पाशाचे नेतृत्वाखालीं १८८२ सालीं तिनें बंड पुकारलें. तें झोडपून काढण्याचें कार्य इंग्लंडनें आपल्या शिरावर घेतलें व इंग्रजी आरमारानें अलेक्झांड्रिया बंदरावर तोफांचा भडिमार केला. फ्रेंच आरमारानें यांत भाग घेतला नाहीं. त्या वेळीं साम्राज्यशाहीचा विरोधक म्हणून गणण्यांत येणारा ग्लॅडस्टन हा इंग्लंडचा मुख्य प्रधान होता. रॅम्से मॅक्डोनल्ड हे समाजवादी (!) गृहस्थ पंतप्रधान असतांहि हिंदुस्थानांत दडपशाहीला ऊत आला होता;

* इजिप्त वगैरे भूमध्य समुद्राच्या दक्षिण किनाऱ्याचे प्रदेश व सीरिया, पॅलेस्टाइन वगैरे पूर्व किनाऱ्यावरील भाग हे त्या काळीं तुर्कस्थानाच्या साम्राज्यांत मोडत असत.

त्याच मासल्याचें हें वरील उदाहरण आहे. इजिप्तमध्यें इंग्रजांचे जे हक्क (म्हणजे ३ कोटी पौंड भांडवल) निर्माण झाले आहेत त्यांचें केवळ संरक्षण करण्यासाठींच आपण हें कृत्य केलें असें ग्लॅडस्टनसाहेबांनीं समर्थन केलें. पण हिंदुस्थानबरोबरचें दळणवळण अबाधित राखणें हेंच मुळांतलें खरें कारण होतें व तें कांहीं लोकांनीं उघडपणें बोलूनहि दाखवलें. कारण या वेळीं इंग्रजांचा जगाशीं चालणारा जो सबंध निर्यातीचा व्यापार, त्यांपैकीं एकअष्टमांश व्यापार एकट्या सुवेझ कॅनॉलमधून चालत होता.

१८८३ सालीं म्हणजे अरबीपाशाचें बंड मोडल्यानंतर इंग्रजांनीं इजिप्तचा कारभार आपल्या हातीं संपूर्णपणें घेतला. इजिप्तसाठीं एक राज्यघटना तयार करण्यांत येऊन इंग्रज सल्लागारांचे मदतीनें तेथील कायदेमंडळें चालू लागलीं. कायरो येथें ब्रिटिशांचा कॉन्सल जनरल म्हणून एक सर्वश्रेष्ठ अधिकारी राहूं लागला. पुढें १९१४ सालीं इजिप्त हें इंग्लंडचें आश्रित राष्ट्र (Protectorate) आहे असें जाहीर करण्यांत आलें.

ज्याप्रमाणें आळींतलें एक घर घेतलें, कीं सावकार त्या घराच्या डाव्या उजव्या बाजूचीं घरें घेत घेत सगळी आळीच एक दिवस आपल्या नांवावर चढवावी अशा दृष्टीनें हालचाल करीत राहतो, त्याचप्रमाणें साम्राज्यवादी भांडवलशाहीची कृति असते. इजिप्त घेतल्यावर इजिप्तची जणूं कांहीं गंगामाईच अशी जी नाइल तिच्या उगमाच्या दिशेला तोंड करून १८८२ सालापासून इंग्रजांचीं पावलें पडूं लागलीं. या प्रकरणाच्या अगदीं सुरुवातीलाच आपली सेसिल ऱ्होड्स ह्या साम्राज्यवादी धेंडाची ओळख झालेली आहे. त्याच्या मनांत सतत वास करणारी एक मनीषा अशी होती, कीं केप ऑफ गुडहोपपासून कायरोपर्यंत म्हणजेच अटलँटिक महा-

सागरापासून भूमध्यसमुद्रापर्यंत कोठेंहि ब्रिटिश मुलखाच्या बाहेर पाऊल टाकल्याशिवाय जातां आलें पाहिजे. आफ्रिकेच्या शरीराचा माथ्यापासून थेट पायापर्यंत उभा छेद घेत ब्रिटिश सत्तेची तरवार गेली पाहिजे. सेसिल ऱ्होड्स ही व्यक्ति म्हणजे साम्राज्यशाहीचें इंगित बोलून दाखविणारा मनकवडाच होता. १८८२ सालीं सुरू केलेल्या ह्या कारस्थानास खार्टुममध्यें जनरल गॉर्डनच्या मृत्यूमुळें पायबंद बसला. पुढें १८८५ सालापासून १८८९ पर्यंत इंग्रज जेथच्या तेथें थबकून होते. या मध्यंतरीच्या काळांत इटली, जर्मनी वगैरे राष्ट्रांचा पाठिंबा आपल्या कारस्थानास मिळवण्याची त्यांची खटपट चालू होती. १८८९ सालीं अबिसीनियावर इटलीला छूः करून त्यांनीं आपल्या आक्रमणास पुन्हा सुरुवात केली.

पण इकडे फ्रान्सची कांहीं निराळीच योजना सुरू होती. उत्तरेकडून दक्षिणेकडे इंग्रज सरकत होते तर फ्रान्स पश्चिमेकडून पूर्वेकडे मजल दरमजल निघाला होता. फ्रेंच कांगोपासून सुरुवात करून आफ्रिकेचा आडवा छेद घेत घेत आपण आरबीसमुद्राच्या किनाऱ्यावर एडनच्या पश्चिमेस असलेल्या फ्रेंच सोमालीलँडला जाऊन मिळावें म्हणून फ्रेंचांचा धाडशी प्रवासी मार्शंड याचे प्रयत्न सुरू होते. अबिसीनियाला शस्त्रसामुग्री पुरवून अबिसीनियाकडूनच फ्रेंचांनीं इटलीचा कांटा परस्पर काढवला. १८९६ मध्यें अडोवा येथें इटलीचा पार नायनाट झाला. त्याबरोबर मार्शंडनें जोरानें पुढें सरकण्यास सुरुवात केली.

लॉर्ड किचनेर नाइलच्या कांठाकांठानें वरवर सरकत होता, तर फ्रेंच संशोधक मार्शंड पूर्वेकडे घुसत होता. त्याची किचनेरशीं १८९८ सालीं फाशोडा येथें गांठ पडली. सहा महिनेपर्यंत हे दोन राष्ट्रांचे प्रतिनिधि एकमेकांसमोर तळ ठोकून बसले होते आणि इंग्लंड

व फ्रान्स यांची आतां जुंपणार येथपर्यंत प्रकरण येऊन ठेपलें होतें. पण रशियानें फ्रान्सला पाठिंबा देण्याचें नाकारल्यामुळें फ्रान्सनें पड खाल्ली आणि सूडान प्रांत इंग्रजांचें ताब्यांत आला. त्या वेळीं सूडानवर इजिप्त आणि इंग्लंड यांचें जोड-वर्चस्व राहील असें जाहीर करण्यांत आलें. अर्थात् इजिप्तच जेथें इंग्रजांचे ओंजळीनें पाणी पीत होता तेथें जोड-वर्चस्व याचा अर्थ एकट्या इंग्रजांचें वर्चस्व असाच होता. त्या वेळीं झाकून ठेवलेली ही गोष्ट १९१९ सालीं इजिप्तला 'स्वातंत्र्या'चे हक्क बहाल केले तेव्हां उघडकीस आलीच. सध्यां सूडानवर इजिप्तला कोणत्याहि प्रकारचा हक्क सांगतां येत नाहीं. सूडानची जमीन उत्कृष्ट असून तेथें उंची जातीचा कापूस पिकतो. नाइलच्या कालव्यामुळें व आगगाड्यांचे सोईमुळें तेथील व्यापार गेल्या २५।३० वर्षांत तिप्पट झाला आहे. सूडानमधील कापूस उंची दर्जाचा असल्या-कारणानें सूडानला स्वातंत्र्य देणें म्हणजे त्या कापसावर जगणाऱ्या मँचेस्टर येथील गिरण्यांना दिवाळें काढण्यास सांगण्याप्रमाणें आहे. सूडानला कधीं काळीं स्वातंत्र्य मिळणार असेल तर तें स्वतःच्या बळावरच संपादन करावें लागेल.

ऱ्होड्ससारख्या साम्राज्यवादी भांडवलवाल्यानें आणि स्टॅन्ले-सारख्या साम्राज्यवादी प्रवाशानें साम्राज्यवादीला कशी मदत केली तें आपण पाहिलें. पण प्रत्येक वेळीं साम्राज्यवादी राष्ट्रें नेहमींच इतक्या आडवळणानें जातात असें नाहीं. पुष्कळदां अगदीं उघड-पणें आरमार अगर लष्कर पाठवूनहि आपणास हवे ते प्रदेश तीं हस्तगत करून घेतात, अगर आपणास सर्वस्वीं अनुकूल असे तह-नामे करून घेतात. चीनला याचा अनुभव फारच उत्तम प्रकारें आलेला आहे. प्रत्यक्ष सरकारच अशा प्रयत्नांत पडलें म्हणजे कोणत्याहि आडवळणी प्रयत्नांची आवश्यकताहि उरत नाहीं. सध्यां

अल्बेनियाला आपल्या जाळ्यांत पकडण्याचा जो प्रयत्न इटलीनें चालवलेला आहे त्यांत वरील नीतीचाच अवलंब केल्याचें दिसून येईल.*

तथापि, आपलें उद्दिष्ट तडीस नेण्यासाठीं साम्राज्यवादी राष्ट्रें काय युक्त्या योजतील तें सांगणें मुष्किलीचें आहे. जपाननें १८९४ मध्यें कोरिया जिंकला. तेव्हांपासून एक नवीनच युक्ति हस्तगत झाली. जो प्रदेश आपणाला हवा असेल तेथील लोक जर एखाद्या जुनाट अगर दुर्बळ राज्यांतले प्रजाजन असतील, तर त्यांना स्वातंत्र्य मिळवण्याचे कामीं उद्युक्त करून आपलें सैन्य व आरमार त्या प्रदेशांत घुसवायचें आणि नंतर आपणच तो प्रदेश घशांत टाकावयाचा. १९०० सालीं अमेरिकेनें याच मार्गानें फिलिपाइन बेटें मिळवलीं. पण फिलिपाइन बेटें मिळवल्यानंतर नाइलाज होऊन अमेरिकेला आणखीहि एक प्रदेश त्याच मार्गानें गिळंकृत करणें भाग पडलें. तो देश म्हणजे सध्यांच्या पनामा कालवा ज्या भागांत आहे तो पनामा देश.

फिलिपाइन बेटें सिंगापूरच्या पूर्वेस आणि जपानच्या दक्षिणेस आहेत. हीं बेटें छोटीं पण भारी मोलाचीं आहेत. त्यांच्याभोंवतीं जपान, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी (१९०० सालीं या भागांत वर्चस्व बसवण्याची जर्मनीची फार जोराची खटपट चालू होती) यांसारख्या सुसरींचा गराडा पडलेला असल्याकारणानें हें माणिक त्या केव्हां मटकावतील त्याचा नेम वाटत नव्हता. अमेरिकेच्या एका बाजूला अॅटलँटिक महासागर आणि दुसऱ्या बाजूला पॅसिफिक महासागर अशी परिस्थिति असल्याकारणानें हीं दोन्ही अंगें संभाळण्यास अमेरिकेला पुरेसें आरमार बाळगावें लागे. १९०० पर्यंत जपानखेरीज सगळींच बलाढ्य राष्ट्रें अमेरिका खंडाच्या पूर्वेला एकत्रित झालेलीं होतीं. त्यामुळें अमेरिकेचें आरमार बहुतकरून अटलँटिक महासागरांतच तळ करून असे. पण फिलिपाइन बेटें घेतल्यावर

* हें पुस्तक लिहून झाल्यानंतर इटलीनें अल्बेनिया जिंकूनहि घेतला.

मागच्या दारींसुद्धां आरमारी कुत्रीं बांधून ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. इतकेंच नव्हे, तर वेळ येईल त्याप्रमाणें या समुद्रांतलीं आरमारी जहाजें त्या समुद्रांत आणि त्या समुद्रांतलीं या समुद्रांत झपाट्यानें कशीं नाचवतां येतील याची विवंचना सुरू झाली. सुवेझ कालव्याचें उदाहरण जगाचे डोळ्यांसमोर होतेंच. इतकेंच नव्हे तर ज्या जगप्रसिद्ध फ्रेंच इंजिनियरानें–लेसेप्सनें–सुवेझ कालवा खणला त्यानें अमेरिकेला प्रत्यक्ष कृतीनें एक मार्गहि दाखवून दिला होता. सुवेझ कालवा पुरा झाल्याबरोबर हा अचाट कल्पक आणि धाडसी इंजिनिअर दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका या जुन्या खंडांना जोडणाऱ्या भूमिनाळेकडे वळला आणि त्यानें तेथें १८८१ सालीं खोदकामाला सुरुवात केली. सात वर्षें काम चाललें, ८००००००० पौंड खर्च झाले, ५०००० माणसें हिंवतापानें मेलीं, आणि लेसेप्सच्या कंपनीचें दिवाळें निघून तेथल्या जंगलांत लेसेप्सची यंत्रसामुग्री गंजत पडून राहिली.

पण १९०१ सालीं फिलिपाइन बेटांचा पुरा कबजा हातीं आल्यावर अमेरिकेची दृष्टि आपोआप या पनामा-योजनेकडे वळली. ॲटलँटिक-पॅसिफिक महासागरांना सांधणारा पनामा कालवा किती आवश्यक आहे तें जनतेला पटवून देण्यासाठीं लगेच वर्तमानपत्रांतून प्रचार सुरू झाला. त्या वेळीं थिओडोर रूझवेल्ट हा अमेरिकेचा अध्यक्ष होता. पनामा कालवा खोदला कीं अमेरिकेचें आरमारी सामर्थ्य दुप्पट वाढवल्याप्रमाणें होईल असें त्यानें जाहीर केलें. त्या वेळीं पनामाचा प्रदेश कोलंबियाच्या लोकसत्ताक राज्यांत मोडत असे. तेथील सरकारबरोबर पत्रव्यवहार सुरू झाला आणि कॅनॉलसाठीं लागणाऱ्या सहा मैल रुंदीच्या जमिनीसाठीं १ कोटी डॉलर रोख व अडीच लक्ष डॉलर दरवर्षी भाडें म्हणून द्यावयाचें ठरलें.

परंतु कोलंबिया सिनेटनें या संधीचा फायदा घेऊन जरा अधिक ताणून धरण्याचें ठरवलें. ३१ ऑक्टोबर १९०३ रोजीं या वाटाघाटी फिसकटल्या. तथापि रूझवेल्ट असल्या किरकोळ बुजगावण्यांनीं दबणारा नव्हता. त्यानें अमेरिकेच्या काँग्रेसला एक संदेश पाठवून कोलंबियाची मान्यता असो वा नसो, कॅनॉलचें काम हातीं घ्यावेंच असा सल्ला दिला. त्याच वेळीं त्यानें एका मित्राला लिहिलेल्या एका खाजगी पत्रांत तो म्हणतो,

" पनामा स्वतंत्र असतें अथवा त्याला या घटकेला स्वतंत्र करतां आलें असतें तर फार बरें झालें असतें. पण मी असें प्रकटपणें म्हणणें म्हणजे बंडाला चिथावणी दिल्यासारखें होईल, तेव्हां तसें तर म्हणतां येत नाहीं."

पण रूझवेल्टला जाहीरपणानें तसें म्हणण्याची जरूरीच नव्हती. ३१ रोजीं ऑक्टोबर वाटाघाटी फिसकटल्या आणि पनामाच्या जनतेनें बरोबर तीनच दिवसांनीं म्हणजे ३ नोव्हेंबर रोजीं कोलंबियाविरुद्ध बंड पुकारलें! काय दैवयोग पहा! झालें, लगेच स्वातंत्र्य पुकारण्यांत आलें. अमेरिकेचे दर्यासारंग पनामाच्या स्वातंत्र्यवीरांना मदत करण्यास तयार होतेच. ते किनाऱ्यावर आले आणि कोलंबिया सरकारच्या सैन्याला त्यांनीं किनाऱ्यावर उतरण्यास मज्जाव केला. पनामा फुटून स्वतंत्र बनलें. १८ नोव्हेंबर रोजीं पूर्वींच्याच अटींवर (म्हणजे एक कोटी डॉलर रोख व २॥ लक्ष डॉलर वार्षिक भाडें या अटींवर) दहा मैल रुंदीची जमीन अमेरिकेला कायम वहिवाटीसाठीं देण्यांत आली. त्या भागावर अमेरिकेनें तटबंदी करावी व सार्वभौमत्वाचे हक्क गाजवावे असेंहि ठरलें. अवघ्या १८ दिवसांच्या अवधींत एक राष्ट्र बंड करून स्वतंत्र होऊन दुसऱ्या अवाढव्य राष्ट्राच्या उदरांत गडप झालें सुद्धां!

कॅनॉलचें काम ताबडतोब सुरू झालें आणि १९१४ सालचें महायुद्ध उभें राहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं कॅनॉल वाहतुकीसाठीं खुला करण्यांत आला.

१९२१ सालीं अमेरिकेनें पनामा राष्ट्राला आणखी २ कोटि ५० लक्ष डॉलर देऊं केलें. त्याचें कारण असें सांगतात कीं, खुद्द अमेरिकेंतील तेलाच्या विहिरी आटत चालल्या असून अमेरिकेच्या दक्षिणेस असणाऱ्या प्रदेशांतील म्हणजे विशेषेंकरून मेक्सिको, वेनेझुएला, आणि कोलंबिया या राष्ट्रांतील विहिरी झपाट्यानें उपसण्यास सुरुवात केली नाहीं तर इंग्लंड तेलाचे बाबतींत लवकरच अमेरिकेवर मात करील अशी भीति अमेरिकन इंजिनिअरांनीं व्यक्त केल्यामुळें पनामाला खूष करण्याकरतां (कीं त्याच्या हातांत सोनेरी बेड्या ठेवण्याकरतां ?) ही रक्कम देऊं करण्यांत आली.

वर साम्राज्य-संपादनाचे जे मार्ग वर्णन केले आहेत त्यांवरून सध्यांचे साम्राज्यकर्ते फार क्रूर आहेत, कपटी आहेत, नीच आहेत असें जर कोणास वाटत असेल तर त्यानें तसें खुशाल म्हणावें. तथापि इतिहासाचा अभ्यास केला तर देश जिंकण्याच्या याच तऱ्हा आहेत. जाळपोळ, लुटालूट, विश्वासघात, कत्तली यांचा जो परंपरागत वडिलार्जित हक्क एकोणिसाव्या शतकांतील माणसाचे हातीं आला तोच त्यानें वापरला. फरक इतकाच कीं, एकोणिसाव्या शतकांतील माणसांचे हातीं जी यांत्रिक शक्ति एकवटली होती व (आज ती पूर्वींपेक्षां हजारपटींनीं वाढली आहे) तिच्यामुळें त्याच्या कृत्यांचे परिणाम अधिक व्यापक, अधिक भयंकर होऊं लागले. सध्यां मनुष्याचे हातीं अथवा काटेकोरपणानें बोलावयाचें तर मनुष्यसमाजांतील धनिक वर्गाचे हातीं पूर्वींपेक्षां शतपटींनीं अधिक कार्यक्षम अशीं वाहतुकीचीं, उत्पादनाचीं, मतप्रचाराचीं, व संहाराचीं साधनें

आलेली असल्यामुळें मानवी समाजाच्या शरीरावर त्या साधनांचा परिणाम शंभरपटींनीं होतो इतकेंच. पण त्यावरून पूर्वीच्या काळच्या ओबडधोबड आणि साध्यासुध्या साधनांनीं व्यवहार करणाऱ्या मनुष्यापेक्षां सध्यांचा त्याचा वंशज अधिक अनीतिमान् अथवा दुर्गुणी आहे असें समजण्याचें कारण नाहीं.

उत्पादनसाधनांच्या अंवतींभंवतीं कांहीं सामाजिक गरजा व सामाजिक संबंध निर्माण होतात, त्यांनीं मर्यादित व नियंत्रित अशा जगांत माणसें आपले व्यवहार करीत असतात व त्यांच्या व्यवहारांचे परिणाम एकंदर समाजावर सौम्यतेनें अथवा तीव्रतेनें होत राहतात.

साम्राज्यशाहीचा व्यवहार हा व्यापारी नफ्यातोट्याच्या हिशेबानें चालत असल्यामुळें तिच्या कक्षेंत सापडलेलीं माणसें मग तीं धर्मगुरु असोत, कीं सैनिक असोत; व्यापारी असोत, कीं प्रयोगशाळेंत काम करणारे शास्त्रज्ञ असोत; एकाच कायद्यानें बद्ध होऊन 'यंत्रारूढा'प्रमाणें तीं काम करीत असतात. तें यंत्रच जर बदललें तर ह्याच माणसांच्या व्यवहाराचा सामाजिक परिणाम निराळा झालेला आढळून येईल व सध्यांच्या व्यवहारांत दिसणारे लोभ, कपट, नफाळू दृष्टि, स्पर्धा वगैरे प्रवृत्तींना अर्थ राहणार नाहीं. पण हें यंत्र* जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत समाज सुधारणें शक्य नाहीं.

या बाबतींत नॉर्मन लेज यांनीं एक उदाहरण देऊन वरील म्हणणें स्पष्ट केलें आहे. गुलामांच्या व्यापाराच्या काळांतल्या समाजांतील व्यवहाराचा दाखला त्यांनीं घेतला आहे. समजा कीं अ हा जहाजाचा मालक आहे, त्यानें चांगला धनसंचय केला आहे आणि

---

* यंत्र हा शब्द येथें नेहमींच्या अर्थानें नसून मानवी संबंध, व्यवहार, व वस्तु-उत्पादनाची पद्धति नियंत्रित करणारी समाजरचना या अर्थी तो वापरला आहे.

दरवर्षी थोडाफार तो धर्मादायहि करतो. ब हा त्याच्या जहाजावरील कप्तान असून आफ्रिकेंतून अमेरिकेंत नेण्यांत येणारे गुलाम त्याचे देखरेखीखालीं नेण्यांत येतात. क हा एक निग्रोनाईक आहे. आपली जमात सधन व्हावी म्हणून या इंग्रज लोकांकडून दारूगोळा विकत घेऊन तो दुसऱ्या एका टोळीला पराभूत करतो व त्यांतील कैद्यांना गुलाम म्हणून विकतो. ड हा क पासून गुलाम विकत घेतो व ते बला विकतो. प्रश्न असा आहे कीं, यांत गुन्हेगार कोण? या चारांतील प्रत्येकजण आपल्याला पैसाअडका मिळावा म्हणून आपापले व्यवहार करीत आहे. कला किती अत्याचार करून गुलाम पकडावे लागतात हें अला माहिती नसेल. अ किती नफा उपटतो तें कला माहिती नसेल. ब जहाजावरील गुलांमाना किती निष्ठुरपणें वागवतो त्याची उठाठेव डला कशाला? पण हे चौघे एका विशिष्ट पद्धतींतील दुवे बनले आहेत हीहि गोष्ट खरीच; आणि मनांत दुष्ट हेतु नसतांहि ते इतिहासांतल्या अत्यंत दुष्ट म्हणून गणल्या गेलेल्या पद्धतीचे पुरस्कर्ते बनलेले दिसतात.

मला स्वतःला लेजू यांचें उदाहरण तितकेंसें समर्पक वाटत नाहीं. आपण दुसरें एक उदाहरण घेऊं. समजा कीं, मला माझ्या-जवळचे एक हजार रुपये कोठें तरी गुंतवावयाचे आहेत. माझ्या मित्राकडून कळलें कीं, बर्मा शेलचे शेअर फार चांगलें डिव्हिडंट देतात म्हणून मीं त्या कंपनीचे एक हजार रुपयांचे शेअर घेतले आणि कंपनीचे मॅनेजर कंपनीचा व्यवहार नीटपणें चालवून वर्ष-अखेर मला चांगलें भरपूर व्याज देतील या आशेनें वाट पाहत बसलों. मी कंपनीचा भागीदार झालों खरा, पण कंपनीच्या प्रत्यक्ष व्यवहाराशीं नफ्याची वाट पाहत बसण्यापलीकडे माझा कांहीं संबंध राहिला नाहीं.

आपण असें समजूं कीं, बर्मा शेल कंपनीची डिबोई येथें एक फार मोठी शाखा असून त्या शाखेंत १०००० मजूर– पुरुष व स्त्रिया–काम करीत आहेत. कंपनीची भरभराट व्हावी, भागीदारांना उत्तम व्याज देतां यावें या सदिच्छेनें, कंपनीचा निष्ठावान् नोकर म्हणून तेथील मॅनेजरची ख्याति आहे. तो जातीनें हिंदु आहे. पुढें तेथील मजुरांना असें वाटूं लागलें कीं, आपणांस मिळते ही मजुरी फारच थोडी आहे, तींत वाढ झाली पाहिजे. आपली मजुरी वाढवावी असा त्यांनीं मॅनेजरकडे अर्ज केला. मजुरांना वाढ द्याव-याची म्हणजे खर्च जास्त होणार, इकडे तर मुंबई सरकारनें पेट्रोलवर कर बसवलाच आहे, तिकडे रशियाचें तेल बाजारांत येण्याची धास्ती आहे. असा सारासार विचार करून मॅनेजरनें ती मागणी धुडकावून लावली व त्यानें मजुरांना सांगितलें कीं, परवडत असेल तर कामावर या नाहीं तर रस्ता सुधारा. मजुरांनीं संप केला. कंपनीचें काम बंद पडलें. तेलाची मागणी पुरी पाडतां येईना तेव्हां गिऱ्हाईक दुसऱ्या कंपनीकडे जाऊं लागलें. मॅनेजरनें आपलें कर्तव्य ओळखून दुसरे मजूर कामावर घेण्याचें ठरवलें. इकडे संपवाल्यांनीं दुसऱ्या मजुरांना कामावर जाऊं द्यावयाचें नाहीं असें ठरवून ते कंपनीच्या दाराशीं निरोधन करूं लागले. मॅनेजरनें पोलिसांची मदत मागितली. सरकारनें ती दिली. कोणाच्याहि कायदेशीर कामांत (कंपनी चालवणें हें कायदेशीर नव्हे काय? कर्तव्य नव्हे काय?) कोणी अडथळा केला तर त्याला संरक्षण देण्यास सरकार बांधलेलें आहे. पोलीस आले त्यांनीं नव्या मजुरास आंत जाऊं देण्यासाठीं रस्ता मोकळा करा असें फर्माविलें. संपवाले जाईनात. लाठीहल्ला झाला—गोळीबार झाला. चारदहा मेले, पांच-पंचवीस जखमी झाले. सरकारच्या कृत्याचा मीं निषेध केला. पण

वर्षाअखेर सहा टक्क्यांऐवजीं चार टक्के व्याज दिलें असतें तर कंपनीच्या व्यवस्थापकांचाहि मीं निषेध केला असता.

वास्तविक मजुरींत वाढ मागणारे मजूर, कंपनीसाठीं पोलीस मागवणारा मॅनेज़र, मजुरांवर लाठीमार करणारा पोलीस, आणि नफा घटूं नये अशी अपेक्षा करणारा मी यांत नीच कोणीच नाहीं— दुष्ट कोणीच नाहीं. पण आम्ही अशा एका सामाजिक संबंधाच्या चौकटींत वावरतों आहों, कीं तिच्या मर्यादांत वावरतांना असे प्रसंग अपरिहार्य ठरावेत. ती चौकट मोडून तिच्या पार न होतांच हे प्रसंग येऊं नयेत अशी अपेक्षा करणें अगदीं फोल आहे.

यापुढें जाऊन आपण अशी कल्पना करूं कीं, बर्मा कंपनीच्या खाणीचे शेजारींच, कांहीं अंतरावर फार मोठ्या तेलाच्या खाणी लागण्याचा संभव असून त्या खाणी चालवण्यासाठीं मुंबईंत हिंदी लोकांची कंपनी निघणार आहे अशी कुणकुण तेथील मॅनेजरांना लागली. शेजारच्या खाणी इंग्रजी भांडवलानें चाललेल्या बर्मा कंपनीला मिळाल्या तर थोड्याशा भांडवलाच्या आधारें कंपनीला दोन्ही ठिकाणच्या खाणी चालवतां येतील. एकाच मॅनेजरावर काम भागेल व नफ्याचें प्रमाण वाढून भागीदारांना अधिक व्याज देतां येईल. कंपनी इंग्रज, मध्यवर्ती सरकार इंग्रज़, मॅनेजर हिंदी, नव्या कंपनीचें भांडवल हिंदी, इंग्रज कंपनीचा मी भागीदार हिंदी. ज्या कंपनीचे शेअर्स मीं घेतले त्या कंपनीचे मॅनेजरानें अशा वेळीं काय करावें ? आपल्या इंग्रज मालकांना कळवून हमखास पदरांत पडणारें घबाड परकी कंपनीला मिळवून देऊन माझा नफा वाढवावा, कीं त्याच क्षेत्रांत एक जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण करून आपली राष्ट्रीय वृत्ति दाखवावी ? आणि समजा कीं

हिंदी कंपनी निघूंच नये म्हणून बर्मा कंपनीनें कांहीं लाख रुपये त्यांचे पदरांत टाकले व त्यांना स्वस्थ बसण्यास सांगितलें तर त्यांनीं काय करावें? हा प्रश्न अवघड वाटतो. पण त्याला अवघडपणा येण्याचें कारण कांहीं विशिष्ट समाजपद्धति आहे, म्हणजे त्या समाजपद्धतीला कारणीभूत झालेली उत्पादनपद्धति आहे.

म्हणून साम्राज्यशाहीच्या व्यवहाराचा डोलारा ज्या उत्पादन व आर्थिक व्यवहारपद्धतीवर आधारलेला आहे त्यांचें स्वरूप आपण समजून घेऊं या.

साम्राज्यशाहीचें अंतरंग * : : ४

" जवळजवळ सर्व ज़गाची फाळणी झाली आहे. उरल्या-सुरल्या जगाची वांटणी सुरू आहे. कांहीं प्रदेश जिंकले जात आहेत, कोठें वसाहती होत आहेत. रात्रीच्या वेळीं माथ्यावर दिसणाऱ्या पण दुर्लभ अशा ताऱ्यांकडे पाहून मनांत विचार येतात, कीं शक्य असतें तर हीं ग्रहनक्षत्रें पण जिंकून घेतलीं असतीं. असे विचार माझ्या मनांत वरचेवर येतात. डोळ्यांना इतकें स्पष्ट दिसणारे तारे हात न पोंचण्याइतके दूर असावेत ही किती खेदाची गोष्ट."

* ह्या विषयावर सांगोपांग माहिती हवी असेल त्यांनीं हॉब्सन, लेनिन, बुखारिन वगैरेंचीं पुस्तकें मुळांत वाचावीं. येथें आंकड्यांची गर्दी न करतां केवळ स्थूल वर्णन केलें आहे.

ता. २८ एप्रिल १९३९ रोजीं सर्व जगाचें जिकडे लक्ष लागलें होतें त्या हिटलरच्या भाषणांतील हा उतारा नव्हे. पूर्वीच्या एका प्रकरणांत आपल्या परिचयाचे झालेले विख्यात साम्राज्यवादी सेसिल र्‍होड्स यांचे हे उद्गार आहेत. अलेक्झांडर लहान होता तेव्हां त्यानें एका बेफाम घोड्याला वठणीवर आणून आपली कर्तबगारी प्रकट केली; तेव्हां त्याचा बाप म्हणाला, "मुला माझें राज्य तुला अगदीं अपुरें पडेल." अलेक्झांडरनें आपल्या ऐन तारुण्यांतच त्या वेळीं ठाऊक असलेलें बरेचसें जग जिंकलें, आणि जिंकावयास जग उरलें नाहीं म्हणून त्यानें म्हणे अश्रूहि ढाळले. हे आधुनिक 'शिकंदर' सुद्धां जिंकावयास जग उरलें नाहीं म्हणून आकाशाकडे आशाळभूत-पणानें पाहत बसले आहेत.

सेसिल र्‍होड्स किंवा जोसेफ चेंबरलेन यांच्यासारख्या साम्राज्य-वाद्यांना खरोखरच जग अपुरें वाटतें. आपल्या "साम्राज्यशाही" या ग्रंथांत लेनिननें असें म्हटलें आहे कीं, "ह्या काळाचें (१८७०-१९१३) वैशिष्ट्य जर कोणतें असेल तर तें हें कीं, जगाची फाळणी पुरी झाली आहे. यापुढें जगाची फेरवाटणी होणें अशक्य या अर्थानें वाटणी पुरी झाली असें म्हणणें नाहीं. फेरवाटणी शक्य आहे. ती व्हाव-याचें टळत नाहीं. पण भांडवलशाही राष्ट्रांची जी साम्राज्यनीति आहे तिच्यामुळें आतांपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर मोकळ्या पडलेल्या जागा वाटून घेण्याचें कार्य पूर्ण झालें आहे. जगाचे तुकडे पाडण्यांत आले ते प्रथम याच काळांत. आतां यापुढें देश एका मालकाचे हातून दुसऱ्या मालकाचे हातीं जातील इतकेंच. देशाला मालक कोणीच नव्हता तो प्रथमच मालक मिळाला असें होणार नाहीं."

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत आणि विशेषें करून शेवटच्या पंचविशींत साम्राज्यशाहीची दौड इतक्या झपाट्यानें झाली

कीं तो एक चर्चेचा विषय बनून त्यावर ग्रंथ लिहिले गेले. हॉब्सन यांचा **साम्राज्यशाही** हा ग्रंथ सर्वमान्य आहे. त्यांत ते लिहितात कीं, १८८४ पासून १९०० पर्यंत इंग्लंड, फ्रान्स, आणि जर्मनी ह्या तीन देशांनीं अनुक्रमें ३७०००००, ३६०००००, आणि १०००००० चौरस मैलांचीं साम्राज्यें कमाविलीं.

१८६० च्या पूर्वी साम्राज्यें वाढवण्याच्या नीतीला विरोध करणारे लोक इंग्लंडच्या मुत्सद्द्यांतच होतें हें आपण पाहिलेंच आहे. साम्राज्याचा गाडा आपण हाकीत बसण्यापेक्षां अंकित प्रदेशांना स्वयं-शासित करणें हें अपरिहार्यच नव्हे तर इष्ट आहे असें समजण्यांत येई. खुद्द डिझराएलीसारख्या साम्राज्यवाद्यानें १८५२ सालीं असे उद्गार काढले कीं साम्राज्य हें आपल्या "गळ्याभोंवतींचें लोढणें" आहे.

अशी कोणती गोष्ट एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत घडली कीं जिच्यामुळें इंग्लंड वगैरे सारख्या राष्ट्रांची नवे नवे प्रदेश जिंकण्यासाठीं धावपळ सुरू व्हावी!

१८७० च्या सुमाराला पाश्चात्य राष्ट्रांतील भांडवलशाहीचें जुनें रूप बदलून तिला नवें रूप प्राप्त झालें. पूर्वी भांडवलशाहीमध्यें खुल्या स्पर्धेला वाव होता तो नष्ट होऊं लागून भांडवलशाहीमध्यें ठेकेदारीचा जमाना सुरू झाला. म्हणजे समान धंद्यांतले अथवा एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या धंद्यांतले भांडवलदार एकजूट होऊं लागले आणि त्यांच्याच बरोबर पेढ्या आणि कारखाने यांच्यांतील भांडवलांत एकसूत्रीपणा येऊं लागला.

भांडवलशाहींतली स्पर्धा नष्ट कां झाली? "मालाचे दर उतरवून स्पर्धा करण्यांत येते. मालाची स्वस्ताई मजुरीच्या उत्पादनक्षमतेवर आणि त्याचबरोबर किती प्रमाणावर मालाचें उत्पादन होतें यावर अवलंबून आहे. म्हणून मोठें भांडवल लहान भांडवलांच्या धंद्यांना मारून

टाकतें. स्पर्धा सुरू झाली कीं छोटे भांडवलदार धुळीस मिळतात. पैकीं कांहींचें भांडवल बडयांच्या हातीं जातें तर कांहींचें अजीबात नाहींसेंच होतें" असें मार्क्सनें १८६८ सालीं लिहून ठेवलें आहे.

पण ही स्पर्धा जर थांबवतां आली तर दिवाळें निघेपर्यंत भाव उतरवण्याचें कारणच उरणार नाहीं. आपल्या सर्वांच्या परिचयाचें असें मोटरचें उदाहरण घेऊं. पुणें ते नगर उतारूंची ने-आण करणाऱ्या पांच कंपन्यांच्या मोटारी आहेत असें आपण समजूं. पहिली कंपनी एका लक्षाधीशाची आहे आणि त्यानें दहा मोटारी ठेवल्या आहेत. दुसरीचा मालक साधारण बऱ्यापैकीं आहे व त्याच्या पांच मोटारी आहेत. तिसऱ्याच्या चार आहेत आणि उरलेल्या दोघांच्या तीन तीन आहेत. दहा मोटरवाल्या मालकाच्या मनांत पुणें-नगर रस्त्यावरची सगळी उतारूंची वाहतूक आपल्या हातांत घ्यावयाची असली तर तो काय करील? पुण्याहून नगरचें भाडें १॥ रु. असलें तर तें १। रु. करील. मग १ करील, नंतर १२ आणे, ८ आणे करील. मोटरला लागणारा पेट्रोलखर्च अंगावर पडणार नाहीं अशा बेतानें इतकेंच नव्हे तर कांहीं दिवस तो अंगावर सोसूनहि गाड्या चालू ठेवील. चार, आणि तीन गाडयांचे मालक ऐव्हांना घरीं बसलेले असतील, आणलेल्या गाड्यांचे हप्ते चुकते केले नाहींत म्हणून कंपनीनें त्यांच्या गाड्या ओढून नेल्या असतील, अगर बारा गाडयांच्या मालकानें त्यांच्या गाडया स्वतःच विकत घेतल्या असतील. नंतर त्याची स्पर्धा उरली पांच मोटरींच्या मालकांबरोबर. ती फार वेळ चालू राहिली तर तोसुद्धां डबघाईला येईल, किंवा दहा मोटरवाल्याबरोबर त्यांचा "जॉइंट" होऊन स्पर्धा थांबेल आणि मग नगर-पुणें रस्त्यावर पुन्हा ते हवे तसे भाव चालू करतील.

असाच प्रकार फार मोठ्या प्रमाणावर इतर राष्ट्रांत चालत होता. ज्या धंद्यांत अद्यापि ठेकेदाऱ्या निर्माण झालेल्या नाहींत तेथें तो अद्यापिहि चालू असल्याचें आढळून येतें. (उदा. हिंदुस्थानांतील सीमेंट, कापड वगैरे धंदे घ्या.)

१८७० सालानंतर जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स वगैरे राष्ट्रांतील मोठमोठ्या धंद्यांतून संघ, ठेकेदाऱ्या उत्पन्न होऊं लागल्या. ज्या स्पर्धेच्या जोरावर भांडवलशाही वाढली त्याच भांडवलशाहीनें स्पर्धेच्या तत्त्वाची हकालपट्टी केली. १९१९ सालीं इंग्लंडांतील ट्रस्ट कमिटीनें सादर केलेल्या रिपोर्टांत असें मत नमूद केलें आहे कीं, बहुतेक प्रत्येक धंद्यांत ट्रस्ट अथवा संघ स्थापन करण्याची वृत्ति बळावत असून स्पर्धेला लगाम लावून भावावर नियंत्रण ठेवणें हा त्यांतला उद्देश आहे. स्पर्धेला कह्यांत कशाला आणावयाचें आणि भावांचें नियंत्रण कशाकरतां करावयाचें तें सांगण्याची जरूरी नाहीं. नफ्याचें प्रमाण वाढत जावें यासाठीं ही यातायात भांडवलवाल्यांना करावीच लागते !

आणि एकाद्या धंद्यांतील प्रमुख कारखानदारांचा संघ बनला कीं आपल्या धंद्यामध्यें दुसरा कोणीहि प्रतिस्पर्धी राहूं नये म्हणून हरतऱ्हेचे उपाय योजण्यांत येतात. लेनिननें आपल्या ग्रंथांत ठेकेदारांकडून योजण्यांत येणाऱ्या उपायांची यादी केस्टनर नांवाच्या जर्मन अर्थशास्त्रज्ञानें लिहिलेल्या एका पुस्तकांतून दिली आहे, ती अशी :

संघांत सामील न होणाऱ्या कारखानदारांस—

(१) कच्चा माल मिळूं न देणें.

(२) वाहतुकीचीं साधनें मिळूं न देणें.

(३) बाजारपेठ मिळूं नये अशी तजवीज करणें.

(४) गिऱ्हाइकांनीं संघाशींच व्यवहार करावा असा गिऱ्हाइकां-कडून करार करून घेणें.

(५) मालाचे भाव उतरवीत जाणें. कांहीं काळपर्यंत ऐन किंमतीपेक्षां कमी किंमतींत माल विकतां यावा म्हणून लक्षावधि रुपयांचा तोटा सोसणें.

(६) मजूर न मिळतील,
(७) कर्ज न मिळेल, } अशी तजवीज करणें.
(८) बहिष्कार पुकारला जाईल,

भांडवलवाल्यांच्या संघटनेला अशा प्रकारें सुरुवात झाली कीं, त्यांच्यांत आणखी एका धंद्याचे प्रतिनिधि येऊन बसतात, ते म्हणजे पेढीवाले. पेढीवाल्यांचा अथवा बँकांचा मोठ्यांतला मोठा गुण हा कीं मधमाशी ज्याप्रमाणें भोपळ्याच्या फुलापासून तों करवंदाच्या फुलापर्यंतच्या सर्व तऱ्हेच्या फुलांतील मध गोळा करून मोहोळ भरते, त्याप्रमाणें बँकांच्या द्वारा पेढीवाला देशांतील कानाकोपऱ्यांत राहणाऱ्या माणसाच्या सात पदरांतल्या गांठीचे पैसे आपल्या बँकेंत आणून साठवतो. मार्क्सनें म्हटलें आहे कीं "फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू झालें कीं एक नवीन शक्ति कार्यक्षेत्रांत वावरूं लागते. ती म्हणजे पेढ्या ही होय. स्पर्धेच्या क्षेत्रांत तिचा हत्यारासारखा उपयोग करून घेतां येतोच; पण समाजांत मोठ्या अथवा छोटया प्रमाणांत पसरलेला जो धनसंचय आहे तो अदृश्य हातांनीं एकत्र करून कांहीं वैयक्तिक अथवा संघटित झालेल्या भांडवलवाल्यांचे हातीं आणून देण्याचें कार्य त्या करतात. पेढ्या हें भांडवलाचें केंद्रीकरण करणारें यंत्र आहे."

प्रचंड प्रमाणावर उद्योगधंदे चालावयाचे म्हणजे कर्जाऊ रकमांची जरूरी लागतेच. अशा वेळीं पेढीवाल्यांचेकडे धाव घेतल्यावांचून

गत्यंतर राहत नाहीं. कारण देशांतला पैसा उद्योग–धंद्यांसाठीं हमखास कोठें मिळणार असेल तर तो बँकांकडेच.

साहजिकच पेढीवाल्यांना महत्त्व प्राप्त झालें आणि इंग्लंड वगैरे सारख्या राष्ट्रांतून प्रचंड पेढ्या स्थापन होऊं लागल्या; इतकेंच नव्हे तर त्या पेढ्यांचेंहि कारखान्यांच्या धर्तीवर संघटन होऊं लागलें. आणि हें संघटन जसजसें वाढत चाललें तसतशी त्यांच्या हातीं फार मोठी सत्ता एकवटूं लागली. शंभर पेढ्यांच्या ऐवजीं देशांत चारच मोठ्या पेढ्या व्यवहार करूं लागल्या कीं कोणत्याहि धंद्यासाठीं भांडवल लागलें म्हणजे त्या चार पेढ्यांपैकीं कोणत्या तरी एका पेढीचें उंबरठे झिजवणें प्राप्त झालें? अशा परिस्थितींत पेढ्यांचे हात अनेक प्रकारच्या कारखान्यांत शिरूं लागले. ज्या धंद्याला कर्ज दिलें असेल तो धंदा चालतो कीं नाहीं म्हणजे कर्जाऊ रक्कम देणाऱ्या पेढीच्या मनासारखा चालला आहे कीं नाहीं हें ती पेढी पाहणारच. याचाच अर्थ धंद्याच्या व्यवहारा-वर त्या पेढीचें नियंत्रण राहणार आणि तें चांगलें परिणामकारक व्हावें म्हणून आपल्या विश्वासाचे कांहीं लोक त्या धंद्यांतील डायरेक्टरांचे म्हणजे नियंत्रकांचे अथवा व्यवस्थापकांचे जागीं घुसडण्याचा प्रयत्न पेढीवाला करीत रहाणार. धंद्यावर नियंत्रण ठेवण्याचा दुसराहि एक मार्ग पेढ्यांचे खिशांत असतो. कोणताहि धंदा निघण्याचे वेळीं त्याचें भांडवल जमवण्यासाठीं भाग (शेअर) विक्रीला काढतात. ते मोठ्या प्रमाणावर खरेदी करूनहि धंद्याचें नियंत्रण आपल्या हातीं ठेवणें बँकांना शक्य असतें.

येणेप्रमाणें धंदे आणि पेढ्या यांचे परस्परसंबंध वाढत जातात ते इतके कीं पुष्कळ वेळां कारखान्यांतील डायरेक्टर आणि बँकांचे डायरेक्टर ह्या एकच व्यक्ति आहेत असें आपणांस आढळून येतें.

उद्योगधंद्यांचे जे संघ बनतात ते अनेकविध असतात. एकाच प्रकारचे धंदे एकत्र होऊन संघ बनतो. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील सीमेंटचा धंदा. पूर्वीं हिंदुस्थानांत अनेक सीमेंटचे कारखाने होते व ते अनेकांच्या मालकीचे होते. त्यांचें एकीकरण होऊन असोसिएटेड सीमेंट कंपनी नामक कंपनी स्थापन झाली आहे.* पण प्रत्येक वेळीं संघ होतात ते एकाच प्रकारच्या उद्योगधंद्यांचे होतात असें नाहीं, तर ते परस्परपूरक धंद्यांचेहि होतात. उदाहरणार्थ लोखंड, व पोलाद तयार करणारी एक फार मोठी कंपनी आहे असें मानलें तर तिला लागणारा हजारों टन कोळसा दुसऱ्या कंपनीकडून घेण्याऐवजीं ती स्वतःच कोळशांच्या खाणी चालविण्यास घेईल. अथवा फोर्ड यांचा मोटार कारखाना आहे, तेथें दरवर्षीं लाखों रबरी चाकें लागतात, तीं दुसऱ्या कारखान्यांतून न घेतां स्वतःच्याच कारखान्यांत ते तीं चाकें तयार करतील किंवा रबरी चाकें तयार करणाऱ्या कारखान्याबरोबर गट बनवतील.

समजुतीसाठीं आणखी एक काल्पनिक उदाहरण घेऊं. कॉंग्रेस सरकार देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणार आहे ही गोष्ट जाहीर झाली आहे. त्याचा फायदा घेऊन कांहीं मंडळींनीं असें ठरवलें कीं कागदाचा लगदा तयार करण्याचा एक कारखाना कारवारच्या बाजूला काढावयाचा. कारखाना तिकडे तेथें काढण्याचें कारण असें कीं तेथें लगद्यासाठीं आवश्यक असणारें कच्चें द्रव्य (बांबू) मुबलक तयार होतें, आणि सरकारकडून अत्यंत स्वस्त दरांत मिळतें. धंदा नवीन आहे, अद्यापि लोकांचा विश्वास बसलेला नाहीं, त्यामुळें भाग

* सध्यां या कंपनीला शेठ डालमिया यांची कंपनी प्रतिस्पर्धी म्हणून उभी आहे, पण कांहीं दिवसांनीं असोसिएटेड सीमेंट आणि डालमिया यांचा एक जबरदस्त गट होण्याचा संभव आहे.

विकण्यास अडचण पडत आहे असें पाहून मंडळी "कृष्णागोदावरी बँके"कडे गेलीं. बँकेनें सर्व परिस्थिति पाहिली व दहा लाखांच्या विक्रीस काढलेल्या भागांपैकीं पांच लाखांचे भाग खरेदी केले. यापुढें कंपनी निघाल्यावर तिचा धंदा बुडीत होऊं नये म्हणून कृष्णा-गोदावरी बँकेचें व्यवस्थापकमंडळ दक्ष राहणारच, व कंपनीच्या डायरेक्टरांत आपल्या डायरेक्टरांपैकीं कांहीं लोक असावे अशी खटपटहि तें करणार.

लगदा तयार करणारी कंपनी उत्तम चालू लागली असें समजूं मग लगदा तयार होतो तेथेंच कागद म्हणजे पक्का माल तयार केला तर तो स्वस्त दरांत परवडेल आणि घसघशीत नफा मिळवतां येईल अशी रास्त आशा मनांत धरून कंपनीनें "कारवार कागद कंपनी" नांवाचा कारखाना काढून कागद तयार करण्यास सुरुवात केली. कंपनी मोठी झाली. भांडवल १० लाख होतें तें एक कोटीचें झालें. कर्जाऊ रक्कम देतांना आणखी एका 'सह्याद्रि' बँकेचे डायरेक्टर या मोठ्या कंपनीच्या डायरेक्टर मंडळांत शिरले. पुढें असा बूट निघाला कीं कारवारांत नारळीचें उत्पन्न होतें त्या नारळांपासून तेल, काथ्या सुंभें वगैरे माल मोठ्या प्रमाणावर तयार केला आणि तेलापासून उत्तम साबण तयार केलें तर चांगली किफायत होईल. तेव्हां वरील दोन बँकांनीं आणखी एक "कोंकणलक्ष्मी" म्हणून कंपनी स्वतः भांडवल पुरवून काढली. तीहि ठीक चालू लागली. नंतर अशी कल्पना निघाली कीं कोल्हापूरजवळच्या फोंडा घाटांत अल्युमिनियम सापडतें पण तें तेथील दरबार काढण्यास तयार नाहीं; तीच पर्वताची ओळ कारवारास गेली आहे हें लक्षांत घेऊन आपण आपल्या भागांत अल्युमिनियम शोधण्याचा प्रयत्न कां न करावा? कल्पना येण्याचा अवकाश कीं "कृष्णा-गोदावरी" व "सह्याद्रि"

बँकांच्या प्रमुखांनीं तिकडे संशोधक पाठवले. त्यांनीं अहवाल सादर केला कीं कारवारच्या डोंगरांतहि अल्युमिनियम आहे. तेव्हां "कारवार अल्युमिनम् कंपनी" निघाली. आतां "कारवार-कागद" "कारवार लक्ष्मी" आणि "कारवार अल्युमिनम्" या कंपन्या निरनिराळ्या अंतरावर चालवावयाच्या म्हणजे जळणाचा खर्च फार येतो; तेव्हां घाटमाथ्यावरची एक नदी अडवून तिच्या पाण्यावर वीज तयार करून ती तिन्ही कंपन्यांना पुरवावी व तीच वीज वर नेऊन घाटमाथ्यावरील बेळगांव वगैरे शहरांनाहि पुरवावी म्हणजे उत्पन्नाचें आणखी एक साधन हातीं येईल असा हिशोब करून "कारवार बिजली कंपनी" स्थापन झाली.

आतां या चार कंपन्या आणि दोन बँका यांचे संबंध कसे असतील त्याची कल्पना करा. त्या सर्वांचा एक गट बनेल आणि तो चांगला सामर्थ्यवान् असा गट बनेल यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें या सहा घटकांतील प्रमुख मंडळी सामान्यपणें तीच तीच असतील हेंहि उघड आहे.

हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांचें भांडवल संघटित होत जाऊन तें कांहीं प्रमुख व्यक्तींचे हातांत कसें एकवटलें आहे तें पाहावयाचें असेल तर भाई अशोक मेहेता यांनीं 'काँग्रेस सोशॅलिस्ट' पत्राच्या १९३६ सालांतील ३६ ते ३९ अंकांत लिहिलेले लेख वाचावे. आपण त्यांनीं दिलेलीं एकदोनच उदाहरणें घेऊं.

'अँड्र्यू यूल आणि कंपनी' या व्यवस्थापक कंपनीच्या व्यवस्थेखालीं एकंदर ५४ धंदे असून त्यांत ११ ज्यूटचे, १५ चहाचे, १३ कोळशाचे, २ वाहतुकीचे, १ साखरेचा, १ विम्याचा आणि इतर ११, इतक्या धंद्यांचा अन्तर्भाव होतो. त्याचप्रमाणें मार्टिन आणि कंपनी नांवाच्या दुसऱ्या कंपनीकडे एकंदर २६ कार-

खान्यांची व्यवस्था असून त्यांत ७ कोळशाचे, ८ इलेक्ट्रिसिटीचे, १ इंजिनियरिंगचा, ८ वाहतुकीचे व इतर २ असे धंदे सामावले आहेत. अशा प्रकारें सात कंपन्यांचे हातीं २०१ कारखान्यांच्या नाड्या असल्याचें त्यांच्या लेखांवरून दिसून येईल. यांत आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, या सात कंपन्या म्हणजे इंग्लंडांतील याहिपेक्षां प्रचंड कंपन्यांचीं केवळ शेपटें आहेत. उदाहरणार्थ, ५४ धंद्यांचें नियंत्रण करणारी ही अँड्रयू यूल कंपनी लंडनमधील यूल कॅटो आणि कंपनीशीं निगडित झालेली आहे.

अँड्रयू यूल कंपनीच्या ५४ धंद्यांतील डायरेक्टरांच्या १५१ जागा ४० व्यक्तींचे हातीं आहेत. त्यांत देखील ७ जणांचे हातांत ९८ जागा असून तिघांचे हातीं १७ डायरेक्टरांच्या जागा आहेत.

आतां व्यक्तींचे दृष्टीनें विचार केला तर ई. डब्ल्यू. वॅट्स नांवाचे एक गृहस्थ ५९ धंद्यांत डायरेक्टर म्हणून काम करीत आहेत. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास हे २४ ठिकाणीं डायरेक्टर आहेत, आणि सर लल्लूभाई सामळदास हे १७ ठिकाणीं डायरेक्टरचें काम पाहात. वॅट्स् साहेबांच्या ५९ धंद्यांत १२,००,००,००० रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून सर लल्लूभाईचे हातीं १३ कोटींचें भांडवल आहे. पण सर्वांत सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांचा नंबर वर लागेल, ते एकूण ४३००००००० रुपयांच्या भांडवलाचे नियंत्रक आहेत.

ही हिंदुस्थानांतली गोष्ट सांगितली. याच आंकड्यांची दसपट, शंभरपट करा म्हणजे पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांतील फोर्ड, मॉर्गन, रॉकफेलर, स्नाइडर, व्हिकर, क्रप, मित्सुई इत्यादि भांडवलवाल्यांची व त्यांच्या संघटित भांडवलाच्या सामर्थ्याची कल्पना येईल.

आणि नेमका हाच प्रकार युरोपीय राष्ट्रांत १८७० पासून

मोठ्या जोमानें सुरू झाला.* म्हणूनच भांडवलशाहीच्या एका नव्या पर्वाला तेव्हांपासून सुरुवात झाली असें म्हणतात. भांडवलशाही नव्या स्वरूपांत अवतीर्ण झाल्यापासून दोन गोष्टी घडून आल्या. पहिली गोष्ट म्हणजे स्पर्धा नाहींशी झाली व त्यामुळें गडगंज नफा मिळूं लागून बँकांचेपाशीं रिकामें पडून राहील इतकें भांडवल जमूं लागलें. आणि दुसरी गोष्ट अशी कीं मालाचें उत्पादन अवाढव्य प्रमाणांत होऊं लागून त्याला घरचें गिऱ्हाईक पुरेसें होईना. न खपलेल्या मालाचे ढीगच्या ढीग गुदामांत आणि न गुंतवलेल्या भांडवलाच्या संदुकाच्या संदुका बँकांच्या तळघरांत पडल्या आहेत असें दृश्य दिसूं लागलें. माल आणि भांडवल या दोघांना वाट फोडून देणें आवश्यकच होतें. युरोपकडे अथवा अमेरिकेकडे वळण्याची सोय उरली नव्हती, कारण त्या देशांनीं आपल्याभोंवतीं जकातीचीं उंचच उंच कुंपणें घातलीं होतीं. शिवाय त्यांच्यापाशींहि माल आणि पैका झपाट्यानें साचूं लागला होता. ह्या संपत्तीच्या फुगत चाललेल्या पाण्यास पसरण्यासाठीं क्षेत्र मिळावें म्हणूनच या काळांत साम्राज्य वाढवण्याचें धोरण पतकरण्यांत आलें.

कांगोचा प्रवास करून आल्यावर स्टॅन्ले प्रथम इंग्रजांकडे गेला हें मागें सांगितलेंच आहे. त्यानें आपल्या प्रवासाचें वर्णन श्रोत्यांपुढें करतांना काय सांगितलें तें वाचा :

"कांगोच्या प्रवेशद्वारापलीकडे ४ कोटी लोक उभे आहेत आणि मँचेस्टरचे गिरणी-मालक त्यांना वस्त्रें लेवबण्यासाठीं आतुर झाले आहेत. त्यांना लागणारें लोखंडी सामान तयार व्हावें म्हणून बर्मिंगहॅममधील लोखंडाच्या भट्ट्या तापून लालभडक झाल्या आहेत.

* ह्याबद्दल विशेष माहितीसाठीं लेनिनच्या साम्राज्यशाही या पुस्तकांतील प्रकरणें १, २ व ३ वाचावींत.

त्यांतूनच त्यांच्या वक्षःस्थलांना शोभवणाऱ्या चिजा तयार होतील. आणि ख्रिस्ताचे सरदार जे पाद्री ते आपण या अज्ञान—सागरांत डुबलेल्या लाडक्यांना केव्हां वर काढूं या विचारानें तळमळत आहेत."

युरोपांतील कारखानदारांना साम्राज्यशाहीचा मार्ग सापडला. इतरांनींहि तोच मार्ग सुधारण्याचें ठरवलें. अमेरिकेंतला एक आमदार १८९८ सालीं म्हणतो :—

"अमेरिकन लोकांना वापरतां येणार नाहीं इतका माल अमेरिकेंतले कारखाने तयार करीत आहेत आणि खाऊन संपणार नाहीं इतकें धान्य अमेरिकन भूमींत तयार होत आहे. भवितव्यतेनें आपणांसाठीं एकच नीति आंखून ठेवली आहे. जगाचा बाजार आपल्या हातीं आला पाहिजे आणि आपल्या हातांत तो येणारच. तो कसा हस्तगत करून घ्यावा तें आपल्या आईनें (इंग्लंडनें) आपणास शिकवलेंच आहे. अमेरिकन मालाचा प्रचार करणाऱ्या वखारी आपण जगभर प्रस्थापित करूं या. आपल्या जहाजांनीं समुद्र भरून टाकूं या. आपल्या प्रतिष्ठेला साजेशीं आरमारी दलें खडीं करूं या. आणि मग आपल्या व्यापारी तळांच्या भोंवतीं आपलें निशाण फडकवणारीं स्वयंशासित वासाहतिक राष्ट्रें तयार होतील व तीं आपल्याबरोबर व्यापार करूं लागतील."

व्यापार, आरमारें, वसाहती, साम्राज्यें !

येथें असा एक प्रश्न कोणी कोणी उपस्थित करतात कीं, संघटित भांडवलशाही निर्माण झाल्यामुळें घरीं पुरेना इतकें भांडवल आणि घरच्या माणसांना संपेना इतका माल, तयार झाला म्हणतां याचा अर्थ इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी वगैरे देशांतील दारिद्र्य फिटलें असा करावयाचा कीं काय ? तर तसें नाहीं. भांडवलशाहीची हीच तर अचाट आणि विपरीत करणी आहे कीं तिच्या राजवटींत

संपत्तीच्या गाभाऱ्यांत द्रारिद्य आणि समृद्धीच्या सागरांत उपास-मारीचा वडवानल नांदू शकतो. युरोपियन देशांतल्या गरीबांच्या वस्तींत हजारों प्रकारच्या सुधारणा करतां येण्यासारख्या होत्या. पण त्यांचेकडे लक्ष देण्यास भांडवलशाहीला फुरसत नव्हती. खरें बोलावयाचें तर अशा गोष्टींकडे लक्ष पुरवणें ही भांडवलशाहीची प्रकृतिच नव्हे. इंग्लंड, फ्रान्स वगैरे राष्ट्रांच्या तिजोऱ्यांत हजारों पौंड आणि फ्रांक परदेशीं केव्हां जावयास मिळेल म्हणून तळमळत पडले होते.

कारण समाजाच्या हितासाठीं काय पाहिजे याची चौकशी भांडवलवाला कधीं करीत नाहीं. याचसाठीं रस्किननें मोठ्या तिरस्कारानें पाश्चात्य राष्ट्रांत त्या वेळीं साठलेल्या अर्थाला वेल्थ अनर्थ इल्थ असें म्हटलें आहे. भांडवलवाला एकच प्रश्न विचारतो, 'मला यावर किती नफा सुटेल?' आणि जेथें नफा तेथें भांडवल जाईल. मग तें आपपर पाहत नाहीं, मायदेश शत्रुदेश पाहत नाहीं. मांजराला आपुलकी नसते, त्याला आपलें पोट तेवढें दिसतें असें म्हणतात. तें खरें कीं खोटें कोणास ठाऊक. पण भांडवल मात्र नफ्याशिवाय दुसरी गोष्ट ओळखीत नाहीं. एवढें खरें समाजहित ओळखून भांडवल वागूं लागलें तर त्याला भांडवल म्हणतांच येणार नाहीं.

यासंबंधीं लेनिननें आपले विचार पुढीलप्रमाणें मांडले आहेत. "सर्व देशांतून मागसलेल्या स्थितींत आढळून येणारी शेती सुधारावयाची असें भांडवलशाहीनें ठरवलें, जनतेच्या राहणीचें मान सुधारण्याची तिनें खटपट केली........तर फाजील भांडवल झालें आहे असें म्हणण्याची पाळीच कधीं येणार नाहीं. पण मग भांडवलशाहीला भांडवलशाही म्हणतां येणार नाहीं. पण तिचें स्वरूप

जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत जनतेच्या राहणीचा दर्जा सुधारण्या-साठीं फाजील वाढलेल्या भांडवलाचा उपयोग कधींच करून घेण्यांत येणार नाहीं. कारण मग नफ्यास काट मारावा लागेल. त्याऐवजीं बाहेरच्या देशांत भांडवल पाठवून नफा अधिक मिळवण्यांत येईल. धनिक आपलें भांडवल मागासलेल्या देशांत पाठवतील. असल्या देशांत नफा चांगला मिळतो. कारण तेथें भांडवल मिळणें मुष्किलीचें असतें, जमिनी स्वस्तांत पडतात, मजुरी कमी असते, आणि कच्चा मालहि सवंग मिळतो.''

तात्पर्य, संघटित भांडवलामुळें व पेढ्या आणि उद्योगधंदे यांच्या एकजुटीमुळें जो अपरंपार माल व पैका साठला होता त्या दोघांनाहि साम्राज्य-संपादनामुळें वाट मिळाली. समजा कीं इंग्लंडनें हिंदुस्थानाला एक कोटी पौंड कर्ज दिलें तर हें कर्ज इंग्लंडकडून अशाच अटीवर देण्यांत येईल कीं हिंदुस्थानाला लागणारा माल, मग ते आगगाडीचे रूळ असोत कीं इंजिनें असोत, विजेचे डायनामो असोत, रायफली असोत, कीं कापड विणण्याचीं यंत्रें असोत, हिंदुस्थानानें इंग्लंडकडूनच घेतलीं पाहिजेत. ह्या चोख व्यवस्थेमुळें कर्जावर व्याज मिळते आणि मालावर फायदाहि मिळतो ! आणि बँका आणि कारखाने मोठ्या थाटानें कालक्रमणा करूं लागतात. अर्थात्‌च बँकेंत पैसे ठेवणारा ठेवीदार आणि कारखान्यांचा भाग (शेअर) घेणारा भागीदार असल्या व्यवहारावर खूष होऊन साम्राज्यशाही हीच जगाचें खरें कल्याण करणारी शक्ति आहे असें मोठमोठ्यानें मुठी वळून सांगण्यास तयार झाले, तें साम्राज्य वाढवण्यास आणि रक्षण करण्यास तरुण वर्ग सिद्ध झाला, आणि किप्लिंगसारखा कवि साम्राज्याचे पवाडे मोठ्या गुर्मीनें गाऊं लागला तर नवल कसलें ? या दृष्टीनें

जगाच्या आर्थिक इतकेंच नव्हे तर सामाजिक जीवनाचें नियंत्रण करण्याची प्रचंड शक्ति पेढ्या–कारखान्यांचे हातीं आली आहे. म्हणूनच १८७० पासून अद्यापपर्यंत चालू असलेल्या युगाला पेढ्या-कारखान्यांचें युग म्हणजेच साम्राज्यशाहीचें युग असें म्हणतात.

ही परिस्थिति ध्यानांत धरूनच हॉब्सननें १९०२ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या पुस्तकांत साम्राज्यशाहीची व्याख्या अशी केली कीं,

"स्वतःच्या देशांत जो माल आणि जें भांडवल खपवतां येईनासें होतें त्या फाजील साठलेल्या भांडवलाला परदेशांतील बाजार-पेठा आणि उद्योगधंदे यांच्या द्वारा वाट करून देण्यासाठीं उद्योग-धंद्यांचें नियंत्रण करणाऱ्यांनीं केलेला प्रयत्न म्हणजेच साम्राज्यशाही."

हे प्रयत्न सुरू झाले कीं भांडवलवाल्यांचे बरोबर सैन्य द्यावें लागतेंच. कारण प्रचंड प्रमाणांत चालणाऱ्या कारखान्यांना जो पर्वतप्राय कच्च्या मालाचा ढीग लागतो तो आणण्याचें काम एकट्या व्यापाऱ्या-कडून होणें शक्य असत नाहीं. कच्च्या मालांचे देश मागासलेले असले तरी स्वाभिमानी लोक तेथेंहि आढळतात. त्यांना नव्या युगाची शिकवण बंदुकी–तोफाशिवाय नीट देतां येत नाहीं. १९३५ सालीं इटलीनें ॲबिसीनियावर चाल करून जाण्याचें ठरवलें तेव्हां ८ ऑगस्ट १९३५ च्या न्यूयॉर्क टाइम्समध्यें पुढीलप्रमाणें मजकूर आला होता.

इटली ॲबिसीनियांत कापूस पिकवणार.

त्या उत्पन्नांतून लढाईचा खर्च भरून निघेल.

कापसाची प्रचंड प्रमाणावर आयात. सोनें, लोखंड, प्लॅटिनम तांबें, वगैरे धातु मिळोत अगर न मिळोत, सध्यां खर्च होत असलेले अब्जावधि लिरां एकट्या कापसाच्या उत्पन्नामुळें भरून निघतील, असा इटलीला विश्वास वाटतो.

प्रतिवर्षी इटली सुमारें ७४००००,००० लिरांच्या किंमतीचा कापूस अमेरिकेंतून खरेदी करतो. तो पैसा जवळ जवळ सगळा अमेरिकेंत जातो. त्याचप्रमाणें कॉफीच्या खरेदीचा पैसाहि— १८५०००००० लिरा, अमेरिकेलाच मिळतो. हे दोन पदार्थ मिळून इटलीच्या एकंदर आयातीपैकीं १३.५ टक्के आयात होते.

साम्राज्यें मिळवावयाचीं तीं यासाठीं.

संघटित भांडवलशाही आपल्या व्यापारी मोहिमेवर निघाली कीं त्या त्या राष्ट्रांतील राजकीय शक्ति तिच्या मागोमाग पाठराखणीप्रमाणें जात असते याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. भांडवलशाहीच्याच आधारावर सध्यांचीं राष्ट्रें विद्यमान् वैभवाला आणि प्रतिष्ठेला पोंचलेलीं आहेत. तेव्हां आपल्या पोशिंद्या भांडवलशाहीचा बचाव सर्वस्व पणाला लावून करणें हें आपला स्वतःचा बचाव करण्याप्रमाणेंच सरकारला वाटल्यास नवल काय? शिवाय सरकारवर लोकमताचें दडपण आणण्याचें कार्यहि भांडवलवाले हां हां म्हणतां करून दाखवतात.

कारण एक तर मोठमोठ्या उद्योगधंद्यांत पुष्कळसें भांडवल गुंतवलेले लोक मंत्रिमंडळांत असतात, राजघराण्यांत असतात, फडणिशींत असतात; त्यामुळें सरकारी यंत्राचीं चक्रें हवीं तशीं फिरवणें आणि तेथें वशिले लावणें फार सोपें होतें. दुसरें असें कीं लोकमत तयार करण्याचें आजच्या काळांतील अत्यंत प्रभावी साधन म्हणजे जीं वर्तमानपत्रें तींहि प्रमुख भांडवलवाल्यांचे हातीं असतात. त्या वर्तमानपत्रांतून आपल्याला अनुकूल असा मतप्रचार रोजच्या रोज चालवून, लाखो, कोट्यवधि वाचकांचे डोळ्यांसमोर तींच तींच मतें मांडून त्यांना मतप्रचाराच्या जाळ्यांत गुरफटून टाकणें शक्य होतें. याच्याहि पुढें जाऊन देशांतले प्रमुख राजकीय पक्षच्या पक्ष पैशाच्या जोरावर विकत घेण्याची करामत-

सुद्धां संघटित भांडवलाला अशक्य असत नाहीं. जपान आणि अमेरिकेंत एका भांडवलवाल्या गटाच्या हातीं एक पक्ष तर दुसऱ्या गटाच्या हातीं दुसरा एक पक्ष अशी परिस्थिति आहे. जर्मनींतील नात्सी पक्षाला तेथील फार मोठ्या भांडवलवाल्यांचा पाठिंबा होता, म्हणूनच तो पक्ष वरचढ झाला. ज्या पक्षाला संघटित भांडवल पैशाचा मलिदा चारतें त्या पक्षानें संघटित भांडवलाला आवश्यक अशी साम्राज्यवादी नीति पत्करावी आणि तिचा पुरस्कार करावा यांत विपरीत असें काय आहे ? किंबहुना सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांत कारखानदार, पेढीवाले, व्यापारी, वर्तमानपत्रकार, राजकीय पुढारी व सैन्याधिकारी यांची एक जातच बनलेली आढळून येईल. ते केवळ सोईसाठीं निरनिराळीं नांवें धारण करीत असतात. पैशाच्या, रक्ताच्या, सामाजिक दर्जाच्या अशा अनेक संबंधांनीं ते एकमेकांशीं निगडित झालेले असतात. इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान बाल्डविन, परराष्ट्रमंत्री सर सम्युअल होअर, किंवा नेव्हिल चेंबरलेन वगैरे व्यक्ति घेतल्या तर त्यांचे संबंध फार मोठमोठ्या बँकांशीं आणि उद्योगधंद्यांशीं जुळलेले आहेत असें दिसून येईल. चुलतभावाची बँक, आतेभावाचा रेल्वेच्या अथवा आगबोटीच्या सामानाचा कारखाना, मामेभाऊ आरमारांतील सारंग (सरदार) आणि आपण स्वतः परराष्ट्रीय खात्यांत एक बडा अधिकारी अशीं दृश्यें अनेक राष्ट्रांत पाहावयास सापडतील. मग पेढीवाल्यानें आणि कारखानदारानें मनसुबे रचावेत, एखादा प्रदेश हेरून काढावा आणि त्यांची योजना यशस्वी करण्यासाठीं सरकारनें आरमाराची मदत त्यांना द्यावी असे देखावे कां दिसणार नाहींत ?

अमेरिकेंतील एक सैन्याधिकारी मेजर जनरल स्मेड्ले डी. बटलर यानें आपल्या नोकरीच्या काळांतील वृत्तान्त कथन केला आहे त्यावरून

सरकारला संघटित भांडवलवाल्यांसाठीं काय करावें लागतें तें स्पष्ट होईल.

"आमच्या देशाच्या सर्वांत चपळ अशा सैन्यविभागांत म्हणजे मरीन कोअरमध्यें (नाविक दलांत) मीं तेहतीस वर्षें चार महिने चाकरी केली. दुय्यम लेफ्टनंट पासून मेजर-जनरल पर्यंतच्या सर्व जागांवर मीं काम केलेलें आहे. त्या काळांतला बहुतेक वेळ मी बड्या भांडवलवाल्यांचा–वॉल स्ट्रीटचा(अमेरिकेंतील पेढ्यांच्या अड्डा)–बगलबच्चा म्हणूनच काम केलें. थोडक्यांत म्हणजे भांडवलवाल्यांतर्फें काम करणारा मी एक गुंड होतों.

१९१४ सालीं अमेरिकेंतील तेलाच्या व्यापाऱ्यांचे हितसंबंध मेक्सिकोंत आणि विशेषतः टांपिकोंत सुरक्षित राहावे म्हणून मी मदत केली. हाइटी आणि क्यूबामध्यें नॅशनल सिटी बँकेच्या नोकरांना सारावसुली बिनआयासानें करतां यावी अशी मीं तजवीज केली. १९०९ ते १२ च्या दरम्यान ब्राउन बंधूंच्या आंतरराष्ट्रीय बँकेचा व्यवहार सुरळीत चालावा म्हणून निकाराग्वांतील लोकांना "सीधे" केलें. डोमिनिकन लोकसत्ताकांत अमेरिकेच्या साखर कारखानदारांसाठीं १९१६ मध्यें मी 'संस्कृतीचा प्रसार' केला.* १९०३ मध्यें अमेरिकन बागायतदारांकरतां होंडयूरासमधील जनतेला मीं वठणीवर आणलें. १९२७ मध्यें स्टँडर्ड ऑइल कंपनीवर कोणी हात टाकूं नये म्हणून मीं चीनमध्यें देखरेख ठेवली.

वरील काळांत अगदीं मवाल्यांतल्या एखाद्या दादाप्रमाणें मी वागलों. त्याबद्दल मला मानपान, पदकें, बढत्या मिळत गेल्या.

---

* मेजर जनरल स्मेड्ले डी. बटलर हे संस्कृति वगैरे शब्द उपरोधानें वापरीत आहेत.

मला वाटतें कीं मी अल् कपोनला* सुद्धां चार हिकमती शिकवल्या असत्या. कारण शहराच्या तीन विभागांत तो आपलीं कारस्थानें चालवी एवढीच त्याची करामत. आम्ही मरीन कोअरचे लोक तर उभ्या तीन खंडांत धुमाकूळ मांडीत असूं."

वशिले, दमदाटी, कर्जाऊ रकमा वगैरे बाबतींत साम्राज्यवादी राष्ट्रांचे डावांवर डाव आणि पेचांवर पेच चालू असतात. आणि हे सर्व डाव आणि पेच संपले कीं मग प्रत्यक्ष तलवारीला हात घालावा लागतो व युद्धाला सुरुवात होते. सरतेशेवटीं केव्हां तरी लढाईची पाळी येणार ही गोष्ट नक्की असल्यामुळें प्रत्येक राष्ट्र त्या वेळीं आपण कमी पडूं नये म्हणून लढाईच्या तयारींत कसूर करीत नाहीं. आणि दुसरें राष्ट्र कमर कसून लढाईची तयारी करीत आहे असें पाहून इतर सर्वच राष्ट्रें कडेकोट बंदोबस्त ठेवूं लागतात. मग शस्त्रास्त्रांचे ढीग पडतात, तोफांची लांबी फुटाफुटानें वाढूं लागते, एकाहून एक प्रचंड आणि वेगवान् विनाशिका, पाणबुड्या वगैरे तयार होऊं लागतात, आणि अधिकांत अधिक प्राणहानि व वित्तहानि करणारे बाँबगोळे शोधून काढण्याच्या कामीं मोठमोठे शास्त्रज्ञ गढून जातात. अर्थात् ह्या सर्व तयारीचा फायदा भांडवलवाल्यांसच मिळतो. बारसें असो कीं बारावें असो भटजीची दक्षिणा जशी चुकत नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्याला जीवन पाजणारी विहीर फोडण्यासाठीं दारू हवी असो किंवा त्याला विषारी धूर पाजण्यासाठीं बाँबगोळ्याची दारू हवी असो, भांडवलवाल्याचा नफा कांहीं चुकत नाहीं. त्यामुळें साम्राज्य वाढलें तरी नफा, महायुद्ध झालें तरी नफा,

* अल कपोन : अमेरिकेमध्यें दारूबंदीच्या काळांत बेकायदा दारू गाळून व इतर बेकायदा कृत्यें करून कोट्यधीश झालेला हा जगप्रसिद्ध डाकू सध्यां तुरुंगांत असून तो ऑगस्टमध्यें सुटणार आहे.

अशी मोठी सोइस्कर भूमिका भांडवलवाल्यांना घेतां येते. गेल्या महायुद्धांत सर बेसिल झाहरॉफसारखे शस्त्रकारखानदार कोट्यधीश झाले. अमेरिकेंतल्या एका कंपनीनें शेंकडा ४५८ टक्के डिव्हिडंट दिलें आणि जे. पी. मॉर्गन नांवाच्या कारखानदारानें २०० कोटी डॉलर नफा मिळवला. आणि ही केवळ दारूगोळा करणाऱ्या एकट्या दुकट्या कारखान्याचीच गोष्ट नाहीं. लढाईत सर्वच गोष्टी महाग होतात, पण त्यांतल्या त्यांत माणुसकी ही चीज सर्वांत महाग होते, याचा प्रत्यय हिंदुस्थानांतहि आलेला आहे. त्या वेळीं आपल्याकडच्या रंग, कापड वगैरे पदार्थांच्या व्यापाऱ्यांनींहि अफाट नफा मारला ही गोष्ट सर्वांना ठाऊकच असेल.*

असो, तात्पर्य असें कीं संघटित भांडवलशाहीमुळें ज्याप्रमाणें साम्राज्यशाही अपरिहार्य होऊन बसते त्याचप्रमाणें साम्राज्यशाहीच्या राजवटींत जगाच्या पाठीवरील बाजारपेठांसाठीं व कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या मालकीच्या प्रदेशासाठीं महायुद्धेंहि अपरिहार्य होऊन बसतात. एकदां महायुद्ध होऊन युद्धाची खुमखुमी जिरली म्हणून पुन्हा युद्ध होणार नाहीं असा निर्वाळा देणेंहि शक्य नाहीं. कारण महायुद्ध संपलें म्हणून संघटित भांडवलशाही आणि साम्राज्यशाही ही दुक्कल नाहींशी झाली असें थोडेंच आहे. साम्राज्यवादी राष्ट्रांच्या बलाबलाचें प्रमाण बदललें कीं पुन्हा युद्धाचा प्रसंग येऊन ठेपतोच. आपणाला जपानचें व इटलीचें उदाहरण घेतां येईल. महायुद्धाचे वेळीं जपान व इटली इंग्लंडचे बाजूनें लढलीं. त्यामुळें व्हर्सायच्या तहानंतर त्यांना थोडाफार प्रदेशहि मिळाला. तदनंतर

---

*गेल्या सालीं इंग्लंडांत १० नवीन कोट्यधीश तयार झाले, आणि बेकारींतहि वाढ झाली अशी बातमी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे.

दहा वर्षांत त्या राष्ट्रांतील भांडवलशाही वाढत गेली आणि संघटित झाली. त्यांच्यापाशीं होतें तेवढें साम्राज्य त्यांना पुरेना. तेव्हां त्यांच्या वाढत्या भांडवलाला वाट करून देणें आवश्यक झालें व जपानला मँच्यूरिया आणि इटलीला ॲबिसीनिया मुकाट्यानें खाऊं देणें इंग्लंड, अमेरिका, आणि फ्रान्स या राष्ट्रांना भाग पडलें. अमेरिकेच्या आमदारानें म्हटल्याप्रमाणें साम्राज्यशाह्यांच्या "आईनें (इंग्लंडनें) वाट दाखवून" ठेवलेलीच होती. त्याच मार्गानें जपान गेला, इटलीहि गेला. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान होईना. जपाननें पुन्हा एकवार चीनवर हल्ला चढवला. तें युद्ध अद्यापि चालूच आहे. इटलीनें आतां कोठें डल्ला मारावा? स्पेनवर कीं बाल्कन राष्ट्रांवर? एक चिमुकलें राष्ट्र—अल्बेनिया—गुडफ्रायडेच्या मुहूर्तावर त्यानें गट्ट करून दाखवलेंच. पण लोणच्याच्या फोडीनें पोट भरतें थोडेंच. हा केवळ मासला म्हणून चाखला. इटली आपली बुभुक्षित दृष्टि सभोंवार फिरवीतच आहे. आणि शांततेच्या मार्गानें सर्व साम्राज्यांना एकत्र राहतां येईल हा सिद्धांत पुन्हा एकवार सपशेल खोटा ठरला आहे.

जो प्रकार जपान व इटलीचा तोच जर्मनीचा. महायुद्धाच्या दोषाचें खापर त्या देशाच्या माथीं मारून कोट्यवधि पौंडांचा दंड जर्मनी-कडून वसूल करावयाचा व जगांतील बाजार-पेठांतून त्या राष्ट्राला उठवून लावावयाचें असा बेत ठरवून जित राष्ट्रें वागलीं. अमेरिकेनें कोट्य-वधि डॉलरचें भांडवल जर्मनींत गुंतवलें. पण महायुद्धांपूर्वींच जर्मनींत भांडवलशाहीची प्रस्थापना फार मज़बूत रीतीनें झालेली असल्यामुळें आणि महायुद्धाच्या धुमश्चक्रींत जर्मन प्रदेशांतील कारखान्यांची नासधूस फारशी झालेली नसल्यामुळें तेथील भांडवलशाहीनें युद्ध संपल्यापासून

बारा पंधरा वर्षांत आपली घडी पुन्हा जमवली.* अर्थात् या बाबतींत इंग्लंड, फ्रान्स, इटली, जपान, आणि अमेरिका या देशांतील भांडवल्यांच्या परस्पर वैमनस्याचा त्यांना चांगलाच फायदा मिळाला आहे. तें कांहीं असो, आज जर्मन भांडवलशाही पुन्हा साम्राज्य मिळावें म्हणून सर्व राष्ट्रांना पुन्हा युद्धाच्या खाईत लोटण्यास तयार झाली आहे हें आपण पाहतोंच आहों. आणि उद्यां जर्मनीचा अथवा इटलीचा अगर जपानचा पाडाव झाला म्हणून जगावर महायुद्धासारखा प्रसंग पुन्हा कधीं येणार नाहीं असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं.

भांडवलाचें संघटन १८७० ते १९१३ पर्यंतच्या काळांत जितक्या प्रमाणांत झालें होतें त्यापेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत तें १९१८ नंतरच्या काळांत झालेलें आहे आणि त्यामुळें मानवी व्यवहाराची सर्व बाजूंनीं नाकेबंदी करण्याचें व हरतऱ्हेच्या व्यवहारांतून फायदा निर्माण करण्याचें संघटित भांडवलाचें कार्य फार प्रचंड प्रमाणांत चालू आहे. जपानांतील प्रख्यात मित्सुई गटाविषयीं एके ठिकाणीं असें वाचल्याचें आठवतें कीं, एक वेळ जपानी सरकारचा प्रतिनिधि नाहीं असा देश पृथ्वीच्या पाठीवर सापडेल पण मित्सुई कंपनीचा प्रतिनिधि नाहीं असा देश शोधूं गेलें तरी सापडणें कठीण. इतका ह्या कंपनीचा व्याप मोठा आहे.

“आधुनिक भांडवलशाही आणि खाजगी मालमत्ता” या नांवाचें एक पुस्तक ए. ए. बर्ले आणि जी. सी. मीन्स नामक

* यासंबंधींचें अधिक सविस्तर विवेचन येथें करणें शक्य नाहीं. तें विशेष बारकाईनें हवें असलें तर जॉन स्ट्रॅची यांचें “भांडवलशाहीवरील अरिष्टाचें स्वरूप” (Nature of Capitalist Crisis) ह्या पुस्तकांतील २३ वें प्रकरण वाचावें.

लेखकद्वयानें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते अशी माहिती देतात कीं अमेरिकेमध्यें बँकेच्या व्यवहाराव्यातिरिक्त व्यवहार करणाऱ्या ३००००० संस्था आहेत; त्यांपैकीं केवळ २०० संस्थांचे हातांत सर्व संस्थांचे हातीं असलेल्या संपत्तीपैकीं ५० टक्के संपत्ति साठलेली आहे. पैकीं १५ संस्था अशा आहेत कीं ज्यांचें प्रत्येकीं भांडवल एक अब्ज डॉलर आहे ! एकट्या अमेरिकन टेलिफोन आणि टेलिग्राफ कंपनीच्या हातांतलें भांडवल युनाटेड स्टेट्सपैकीं एकवीस संस्थानांच्या एकंदर संपत्तीपेक्षां अधिक भरेल.

ह्या दोनशें संस्थांपैकीं कांहीं संस्थांशीं अमेरिकेंतल्या नागरिकांचा हरघडीं आणि पदोपदीं कसा संबंध येतो तें लेखकांच्याच शब्दांत वाचूं या :

"—ह्या प्रचंड कंपन्या म्हणजे अमेरिकन धंद्यांचा जणूं कांहीं सांगाडाच आहे. त्यांचेबरोबर नागरिकांचा संबंध उठल्या बसल्या येत असतो. त्यांच्याकडूनच तो आपले सर्व कार्यभाग करून घेतो. थोडासा प्रवास करावयाचा म्हटला तरी त्याला प्रचंड अशा आगगाडी संघाला उदार आश्रय द्यावा लागतो. त्या आगगाडीचें इंजिन अमेरिकन लोकोमोटिव्ह कंपनीनें तरी बनवलेलें असेल अगर बाल्डविन लोको-मोटिव्ह वर्क्समध्यें तरी तयार झालेलें असेल. डबा अमेरिकन कार अँड फौंडरी कंपनींत अगर त्यांच्याच एकाद्या शाखेंत तयार झालेला असेल. अमेरिकेंतल्या अकरा कारखान्यांपैकीं कोणी तरी एकानें रूळ बनविले असतील हें निश्चित. कोळसा काढणाऱ्या चार कंपन्या आहेत, त्यांच्याचपैकीं कोणी तरी कोळसा पुरविलेला असणार. किंवा कदाचित् तो रेल्वे कंपनीच्या मालकीच्या खाणींतलाच असेल. समजा कोणी मोटारनेंच प्रवास केला तर? मग ती मोटर फोर्डची तरी असेल किंवा क्रायस्लरची असेल किंवा जनरल मोटर्सची अथवा स्टुड बेकरची

असेल; आणि तिच्या टायर्स त्या फायरस्टोन, गुडइयर, गुडरिच, किंवा युनाटेड स्टेट्स रबर कंपनी या चार कंपन्यांपैकीं कोणत्या तरी एका कंपनीच्या असतील....

तुम्ही म्हणाल एकादी व्यक्ति घरकोंबडी असेल, एकलकोंडी असेल. मग ह्या कंपन्यांचा हात त्या व्यक्तीपर्यंत कसा पोंचेल? पण त्याच्या घरची वीज आणि गॅस यांच्यापैकींच एकादी कंपनी पुरवीत असणार. घरांतलीं अल्युमिनमचीं भांडीं अल्युमिनम कंपनी ऑफ अमेरिका कंपनीचीं असणार. त्याचा रेफ्रिजरेटर जनरल मोटर्स कंपनीचा तरी असेल किंवा जनरल इलेक्ट्रिक अथवा वेस्टिंग हाउस इलेक्ट्रिकचा तरी असेल. त्याच्या घरच्या मोऱ्या नळ वगैरे बहुधा क्रेन कंपनीचे असावेत. अमेरिकन रेडिएटर अँड स्टँडर्ड सॅनिटरी कार्पोरेशननें त्याच्या घरच्या चुलीबंबाची सोय लावलेली असावी. त्याच्या वाणजिनसांपैकीं निदान कांहीं वस्तु तरी तो ग्रेट अॅटलांटिक आणि पॅसिफिक कंपनीकडून विकत घेत असलाच पाहिजे; आणि औषधें घेतलेलीं असणार युनायटेड ड्रग कंपनीकडून. वाणजिनसांचे डबे अमेरिकन कॅन कंपनीनें बनवलेले असणार. स्विफ्ट, आर्मर, अथवा विल्सन कंपनीकडून तो मटन घेत असला पाहिजे. बिस्किटें नॅशनल बिस्किट कंपनीकडूत घेतलेलीं असतील.....

रेडिओ लावून मनरंजन करावयाचें म्हटलें तर त्याला रेडिओ कार्पोरेशन ऑफ अमेरिकेच्या परवान्यानें तयार झालेलाच रेडिओ घ्यावयास हवा. तो चित्रपट पाहावयास गेला तर पॅरामाउंट, फॉक्स किंवा वार्नर ब्रदर्सकडे गेलें पाहिजे; (त्यांतली फिल्म बहुधा कोडॅक कंपनीची असणार) आणि सिनेमा थिएटरेंसुद्धां वर सांगितलेल्या कंपन्यांच्याच मालकीचीं आहेत. विलोभनीय जाहिराती वाचून कोणतीहि सिगरेट घ्यावयाची तो ठरवो त्याला सिगरेट तयार करणाऱ्या चार मोठ्या

कंपन्यांपैकीं एका कोणत्या तरी कंपनीची सिगरेट घ्यावीच लागणार आणि ती सुद्धां कोपऱ्यावरील युनायटेड सिगार स्टोअरच्याच दुकानांतून घेतली पाहिजे."

जगांतील बाजारपेठा, वसाहती, खाणी, मळे एवढ्यांचीच फाळणी करून संघटित भांडवलशाही थांबलेली नाहीं; पंचमहाभूतांना आपल्या सोईप्रमाणें वाटून घेऊनहि तिचें समाधान झालेलें नाहीं; तिनें माणसांचीं मतें, मनोरंजनाचीं साधनें, जीवनांतल्या हरएक गरजा यांची देखील आपसांत वाटणी करून टाकलेली आहे! आतां फक्त ग्रहनक्षत्रांची वाटणी तेवढी करावयाची राहिली आहे. इंग्लंड, जपान, इटली या देशांचे राजे जीं साम्राज्यें आज विद्यमान आहेत त्यांचे मालक नव्हत अथवा अमेरिका, फ्रान्स या देशांचे अध्यक्ष हेहि त्यांचे मालक नव्हत. साम्राज्यांचे खरे मालक त्या त्या राष्ट्रांतील भांडवलदार आहेत. ते बांधतील तें तोरण आणि आंखतील तें धोरण. तेथील सरकारें हीं भांडवलदारांच्या हुकमाची तामिली करणारीं नोकरमाणसें अथवा त्यांच्या ऋणकोंकडून व्याज वसूल करणारे पठाणी तगादेदार होत. यापलीकडे त्यांची किंमत नाहीं.

साम्राज्यशाही म्हणजे भांडवलशाहीचें ठेकेदारींत झालेलें रूपांतर असें लेनिननें म्हटलें आहे. भांडवलशाहींतील स्पर्धा संपून तिला ठेकेदारीचें स्वरूप प्राप्त झालें व तिचा आणि पेढीवाल्यांचा संबंध जडला कीं साम्राज्य-संपादनाला कसा जोर चढतो तें आपण पाहिलेंच आहे. लेनिननें साम्राज्यशाहीवरील आपल्या ग्रंथांत तिचीं पंचविध लक्षणें दिलीं आहेत तीं अशीं :

" सर्वच व्याख्या सापेक्ष असतात; त्यांत वर्ण्य विषयांची विकासाबरोबर स्पष्ट होत जाणारीं अंगें-उपांगें सांगतां येणें शक्य

होत नाहीं हें लक्षांत धरून आम्हीं साम्राज्यशाहीची पांच लक्षणांनीं युक्त अशी व्याख्या देत आहों.

(१) भांडवलाचें आणि उत्पादनशक्तीचें केंद्रीकरण अशा प्रमाणावर होत जातें कीं, त्यापासून ठेकेदाऱ्या निर्माण होऊन त्या आर्थिक जीवनाचें परिणामकारक रीतीनें नियंत्रण करूं लागतात.

(२) पेढ्यांतील भांडवलाचा कारखानदारींतील भांडवलाशीं एकजीव होत जाऊन ह्या दोन भांडवलांचे आधारें भांडवलवाल्यांचा वरिष्ठ सत्ताधारी वर्ग तयार होतो.

(३) भांडवलाची निर्यात होऊं लागते व ह्या निर्यातीला अत्यंत मोठें महत्त्व प्राप्त होतें.

(४) आन्तरराष्ट्रीय स्वरूपाच्या मक्तेदाऱ्या निर्माण होऊन त्या आपसांत जगाची फाळणी करून घेतात.

(५) प्रबळ अशा भांडवलदार राष्ट्रांकडून पृथ्वीवरील प्रदेशाची पुरी वांटणी होते.

साम्राज्यशाही म्हणजे भांडवलशाहीची अशी एक विकासावस्था कीं जिच्यांत ठेकेदारी आणि पेढी-भांडवल यांचें वर्चस्व प्रस्थापित झालेलें असतें; जिच्यांत भांडवलाच्या निर्यातीला फार मोठें महत्त्व प्राप्त होतें; जिच्यांत आन्तरराष्ट्रीय स्वरूपाच्या मोठमोठ्या कारखाना-संघांत जगाची वाटणी व्हावयास प्रारंभ होतो; जिच्यांत पृथ्वीवरील प्रदेशांची प्रबळ अशा भांडवलदार राष्ट्रांत विभागणी होऊन गेलेली असते."

ही व्याख्या दिल्यानंतर लगेच लेनिननें हेंहि स्पष्ट शब्दांत सांगून ठेवलें आहे कीं साम्राज्यवादी राष्ट्रें कृषिप्रधान देशच आपल्या ताब्यांत घेतात असें कांहीं लेखक भासवतात; पण ही त्यांची विचारसरणी चुकीची आहे. साम्राज्यशाहीला असला पंक्तिप्रपंच

ठाऊक नाहीं. जो देश आपल्या कक्षेंत ओढतां येईल त्याला आपल्या कक्षेंत ओढण्यास साम्राज्यशाही मागें पुढें पाहणार नाहीं. ती असा विचार करणार नाहीं कीं हा देश कृषिप्रधान आहे कीं उद्योगप्रधान आहे. लेनिनची विचारसरणी किती बिनचूक होती तें युरोपांत सध्यां ज्या घडामोडी चालू आहेत त्यांचेवरून कळून येईल. नुकताच जर्मनीनें चेकोस्लोव्हाकिया बळकावला तो तर युरोपांतील छोट्या राष्ट्रांत अधिकांत अधिक उद्योगप्रधान देश होता.

तात्पर्य, साम्राज्यशाहीच्या पकडींत उद्योगप्रधान देश फारसे आढळून येत नाहींत किंवा अपवादानें आढळून येतात याचें कारण ते साम्राज्यशाहीशीं बरोबरीनें दोन हात करूं शकतात, समान-शस्त्रांनीं लढूं शकतात हेंच होय. जेथें त्यांची शक्ति कमी पडते तेथें तेहि या बकासुराच्या उदरांत गडप होतातच. लहान माशाला मोठ्या माशानें गिळावें हा जो मात्स्यन्याय तोच सध्यां साम्राज्य-शाहीच्या युगांत सर्वत्र आढळून येत आहे.

उपसंहार : : ५

आज जगाचे डोक्यावर महायुद्धाचें वज्र केव्हां कोसळून पडेल याचा नेम उरलेला नाहीं. किंबहुना या घडीलासुद्धां महायुद्ध सुरू असून जगाच्या फेरवाटणीला सुरुवात झालेली आहे असें समाजवादी रशियाचा पुढारी स्टॅलिन यानें म्हटलें आहे तें सत्य आहे. साम्राज्य-वादी राष्ट्रें पृथ्वीचे पाठीवर आहेत तोंपर्यंत महायुद्धें टळणें कसें अशक्य आहे तें आपण समजून घेतलें; पण कोणी अशी शंका उपस्थित करील कीं, क्षणाक्षणाला ज्या महायुद्धाची भीति वाटत

आहे तें महायुद्ध पुन्हा जर्मनीच्या आततायीपणामुळेंच ओढवणार असें दिसतें; आणि जर्मनीमध्यें तर फॅसिस्ट* तत्त्वज्ञानावर राज्यकारभार चाललेला आहे. मग फॅसिझम हा देखील साम्राज्यवादीच असतो कीं काय? आणि फॅसिझम् जर साम्राज्यवादी असेल तर मग फॅसिझम् आणि आमच्या ओळखीची जी संघटित भांडवलशाही यांच्यांत कांहींच फरक नाहीं असें का तुमचें म्हणणें आहे?

ह्या प्रश्नांतच खरोखर त्या प्रश्नाचें उत्तरहि सामावलेलें आहे. साम्राज्य-कल्पना ही फॅसिस्ट तत्त्वज्ञानांतील मूलभूत कल्पना आहे. त्याचप्रमाणें युद्धाची आवश्यकता ही देखील फॅसिस्ट तत्त्वज्ञान मोठ्या आग्रहानें प्रतिपादीत असतें. राष्ट्रांतील हरएक व्यक्ति युद्धाला उपयोगी पडेल व युद्धाविषयीं उत्सुक असेल अशा प्रकारचें शारीरिक व मानसिक शिक्षण शाळा, व्यायामशाळा, वृत्तपत्रें आणि व्यासपीठें यांचे मार्फत नागरिकांना देण्याचें कार्य फॅसिस्ट राष्ट्रें अव्याहत करीत असतात. साम्राज्यें मिळवणें हा आमचा हक्क आहे, युद्धांत जय मिळवणें ही आमची परंपरा आहे, वगैरे प्रकारचे उद्गार ज्या ज्या वेळीं इटलीचे अथवा जर्मनीचे हुकुमशहा भाषणें करतात त्या त्या वेळीं आपणांस ऐकावयास सापडतील. फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाचें अधिकृत विवेचन करतांना मुसोलिनी लिहितो :

"आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं अखंड शांति नांदण्याची शक्यता आहे अथवा शांति अखंड नांदण्यानें कांहीं उपयोग होणार आहे हेंच फॅसिझमला मान्य नाहीं. म्हणून शांतता-वादाचा (Pacifism) आम्ही इन्कार करतों, कारण युद्ध-

* फॅसिस्ट आणि नात्सी तत्त्वज्ञानांत कांहीं एक फरक नाहीं. नात्सी पक्ष आपणास नॅशनल सोशॅलिस्ट पक्ष म्हणवतो आणि फॅसिस्टांच्या निशाणावरील लांकडाच्या जुडग्यांतील कुऱ्हाडीऐवजीं निशाणावर स्वस्तिक मिरवतो इतकेंच.

ठाऊक नाहीं. जो देश आपल्या कक्षेंत ओढतां येईल त्याला आपल्या कक्षेंत ओढण्यास साम्राज्यशाही मागें पुढें पाहणार नाहीं. ती असा विचार करणार नाहीं कीं हा देश कृषिप्रधान आहे कीं उद्योगप्रधान आहे. लेनिनची विचारसरणी किती बिनचूक होती तें युरोपांत सध्यां ज्या घडामोडी चालू आहेत त्यांचेवरून कळून येईल. नुकताच जर्मनीनें चेकोस्लोव्हाकिया बळकावला तो तर युरोपांतील छोट्या राष्ट्रांत अधिकांत अधिक उद्योगप्रधान देश होता.

तात्पर्य, साम्राज्यशाहीच्या पकडींत उद्योगप्रधान देश फारसे आढळून येत नाहींत किंवा अपवादानें आढळून येतात याचें कारण ते साम्राज्यशाहीशीं बरोबरीनें दोन हात करूं शकतात, समान-शस्त्रांनीं लढूं शकतात हेंच होय. जेथें त्यांची शक्ति कमी पडते तेथें तेहि या बकासुराच्या उदरांत गडप होतातच. लहान माशाला मोठ्या माशानें गिळावें हा जो मात्स्यन्याय तोच सध्यां साम्राज्य-शाहीच्या युगांत सर्वत्र आढळून येत आहे.

उपसंहार : : ५

आज जगाचे डोक्यावर महायुद्धाचें वज्र केव्हां कोसळून पडेल याचा नेम उरलेला नाहीं. किंबहुना या घडीलासुद्धां महायुद्ध सुरू असून जगाच्या फेरवाटणीला सुरुवात झालेली आहे असें समाजवादी रशियाचा पुढारी स्टॅलिन यानें म्हटलें आहे तें सत्य आहे. साम्राज्य-वादी राष्ट्रें पृथ्वीचे पाठीवर आहेत तोंपर्यंत महायुद्धें टळणें कसें अशक्य आहे तें आपण समजून घेतलें; पण कोणी अशी शंका उपस्थित करील कीं, क्षणाक्षणाला ज्या महायुद्धाची भीति वाटत

आहे तें महायुद्ध पुन्हा जर्मनीच्या आततायीपणामुळेंच ओढवणार असें दिसतें; आणि जर्मनीमध्यें तर फॅसिस्ट* तत्त्वज्ञानावर राज्यकारभार चाललेला आहे. मग फॅसिझम हा देखील साम्राज्यवादीच असतो कीं काय? आणि फॅसिझम् जर साम्राज्यवादी असेल तर मग फॅसिझम् आणि आमच्या ओळखीची जी संघटित भांडवलशाही यांच्यांत कांहींच फरक नाहीं असें का तुमचें म्हणणें आहे?

ह्या प्रश्नांतच खरोखर त्या प्रश्नाचें उत्तरहि सामावलेलें आहे. साम्राज्य-कल्पना ही फॅसिस्ट तत्त्वज्ञानांतील मूलभूत कल्पना आहे. त्याचप्रमाणें युद्धाची आवश्यकता ही देखील फॅसिस्ट तत्त्वज्ञान मोठ्या आग्रहानें प्रतिपादीत असतें. राष्ट्रांतील हरएक व्यक्ति युद्धाला उपयोगी पडेल व युद्धाविषयीं उत्सुक असेल अशा प्रकारचें शारीरिक व मानसिक शिक्षण शाळा, व्यायामशाळा, वृत्तपत्रें आणि व्यासपीठें यांचे मार्फत नागरिकांना देण्याचें कार्य फॅसिस्ट राष्ट्रें अव्याहत करीत असतात. साम्राज्यें मिळवणें हा आमचा हक्क आहे, युद्धांत जय मिळवणें ही आमची परंपरा आहे, वगैरे प्रकारचे उद्गार ज्या ज्या वेळीं इटलीचे अथवा जर्मनीचे हुकुमशहा भाषणें करतात त्या त्या वेळीं आपणांस ऐकावयास सापडतील. फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाचें अधिकृत विवेचन करतांना मुसोलिनी लिहितो:

"आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं अखंड शांति नांदण्याची शक्यता आहे अथवा शांति अखंड नांदण्यानें कांहीं उपयोग होणार आहे हेंच फॅसिझमला मान्य नाहीं. म्हणून शांततावादाचा (Pacifism) आम्ही इन्कार करतों, कारण युद्ध-

* फॅसिस्ट आणि नात्सी तत्त्वज्ञानांत कांहीं एक फरक नाहीं. नात्सी पक्ष आपणास नॅशनल सोशॅलिस्ट पक्ष म्हणवतो आणि फॅसिस्टांच्या निशाणावरील लांकडाच्या जुडग्यांतील कुऱ्हाडीऐवजीं निशाणावर स्वस्तिक मिरवतो इतकेंच.

पराङ्मुखतेपासून आणि स्वार्थत्यागाऐवजीं भीरुतेच्या भावनेपासून तो वाद निर्माण झालेला आहे. मानवाच्या अंगच्या कार्योत्साहाला भरती येते ती युद्धामुळेंच, आणि युद्धाचें स्वागत करण्याइतकें धैर्य ज्या राष्ट्रांच्या अंगीं असतें त्यांना गौरव प्राप्त होतो तोहि युद्धामुळेंच. शांतीच्या अनिष्ट अशा गृहीत कृत्यावर आधारलेलें जें तत्त्वज्ञान असेल त्याला फॅसिझम् शत्रूप्रमाणें मानतो."†

हें झालें युद्धासंबंधीं. आतां साम्राज्याविषयीं मुसोलिनीचे उद्गार काय आहेत तें पाहूं.

"फॅसिस्ट सरकार म्हणजे सत्ता आणि शासनाधिकार याविषयींच्या इच्छेचें प्रतीक होय. रोमन परंपरा ही कार्योन्मुख अशा शक्तीचा आदर्श आहे असें मानण्यांत येतें....फॅसिस्ट सरकार हें साम्राज्य सरकार आहे अशा दृष्टीनेंच त्याचेकडे पाहिलें पाहिजे. फॅसिस्ट राष्ट्र म्हणजे असें एक राष्ट्र कीं जें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या, एक चौरस फूट जमीन काबीज न करतां देखील इतर राष्ट्रांवर आपली छाप बसवतें.* साम्राज्यविकास म्हणजे राष्ट्राची वाढ होत जाणें. हेंच जिवन्तपणाचें प्रमुख लक्षण आहे, आणि साम्राज्य-संकोच हें अधोगतीचें लक्षण आहे असें फॅसिझम् मानतो."

वरील उताऱ्यांवरून साम्राज्य आणि युद्ध यांचे बाबतींत फॅसिझमचे विचार काय आहेत तें कळून येईल. तथापि फॅसिझम् आणि त्याचेंच जर्मन भावंड जो नात्सीझम यांचे विचार काय आहेत हें

† "फॅसिझमचें राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञान" लेखक मुसोलिनी, पान ११.

* हें विधान परिस्थितीनें मुसोलिनीला विसरावयास लावलें असावें; कारण ॲबिसीनिया, स्पेन, अल्बेनिया यांचेवर अप्रत्यक्षपणें आणि चौरसफूट जागा सुद्धां काबीज न करतां छाप पाडण्याच्या भानगडींत तो पडलेला दिसत नाहीं.

ज़ाणण्यासाठीं पुस्तकांचीं निर्जीव पानें चाळण्याचें कारणच उरलेलें नाहीं. इटली आणि जर्मनी या दोन्ही राष्ट्रांच्या दररोजच्या आचारावरून त्यांची विचारसरणी कोणासहि कळण्यासारखी आहे.

तेव्हां बाह्य लक्षणावरून तरी असें म्हणावयास हरकत नाहीं कीं फॅसिझम् आणि संघटित भांडवलशाही हीं एकसारखींच वागतात. आतां फॅसिझम्च्या राजवटींत भांडवलशाहीचें स्वरूप काय असतें तें पाहिलें पाहिजे.

" नात्सी अंमल सुरू होतांच जर्मनींतील भांडवलशाही संघटनेंत प्रचंड क्रांति (!) करण्यांत आली. १३ मार्च १९३४ रोजीं जर्मन आर्थिक जीवनाची संघटित उभारणी करणारा कायदा प्रसिद्ध करण्यांत आला; **त्या योगें चढाओढीनें खाजगी धंदेवाले जी उधळपट्टी करीत ती निरनिराळ्या धंद्यांची अफाट संघटना करून थांबवण्यांत आली.** धंदे खाजगीच राहिले तरी सर्व धंद्यांच्या चढाओढीस बंदी करण्यांत येऊन त्यांना राष्ट्राच्या एकसूत्री आर्थिक जीवनाच्या विविध अंगांचें स्वरूप देण्यांत आलें. **अर्थमंत्री कांहीं कांहीं कारखानदारांना एकेका धंद्याचे प्रतिनिधि नेमतो व त्यांना आपल्या शाखेंतील कोणते कारखाने स्वतंत्र राहूं द्यावे व कोणते लहान कारखाने दुसऱ्या मोठ्यांत सक्तीनें सामील करावें हें ठरवण्याचा अधिकार या धंदेवाल्यांच्या प्रतिनिधींना देतो.**

सर्व खाजगी धंद्यांची राष्ट्रीय दृष्टच्या संघटना करून त्यांचे १२ गट पाडण्यांत आले आहेत........जर्मनींत मालक हेच मजुरांचे पुढारी आहेत."*

* फॅसिझम्— लेखक–पां. वा. गाडगीळ, पानें ६७-६८.

साम्राज्यशाहीचें अन्तरंग ह्या प्रकरणांत १८७० पासून भांडवल वाल्यांतील स्पर्धा थांबवावी आणि किंमती नियंत्रित कराव्या या दृष्टीनें प्रयत्न सुरू होऊन त्यांतून अफाट भांडवलाच्या ठेकेदाऱ्या कशा निघाल्या तें आपण पाहिलें. तेंच सूत्र लक्षांत ठेवून वरील उतारा वाचला तर दिसून येईल कीं अमेरिकेंतल्या २०० कारखाना-संघा-ऐवजीं जर्मनींत आतां १२ संघ निर्माण करण्यांत आले आहेत; म्हणजे तेथें कोणत्याहि राष्ट्रांत सापडणार नाहीं अशी ठेकेदारी पद्धति निर्माण झाली आहे. वरील उताऱ्यावरून आणखी एक गोष्ट ठकळपणें लक्षांत येते ती ही कीं, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत जे धंदेवाल्यांचे संघ अथवा गट झाले अथवा होत आहेत ते खाजगी किंवा बिनसरकारी प्रयत्नांनीं होत आहेत. येथें तर प्रत्यक्ष राजसत्ताच त्याबाबतींत पुढाकार घेत आहे. याचा अर्थ इतकाच कीं इतर देशांमध्यें भांडवलशाही आणि सरकार यांचेमध्यें लोकशाही संकेतांचा जो कांहीं झिरझिरीत आडपडदा आहे तोसुद्धां जर्मनींत राहिलेला नसून तीं दोघें अगदीं एकरूप आणि एकजीव झालीं आहेत. भांडवलवाल्यांचा परस्पर विरोध तर राहोच, पण भांडवलवाले आणि कामगार यांच्यांतील विरोधसुद्धां भांडवलशाहीच्या प्रगतीस हानिकारक होऊं नये म्हणून सरकारनें भांडवलवाल्यांनाच मजुरांचे पुढारी नेमलें आहे! भांडवलशाहीनें सर्व राष्ट्रच्या राष्ट्र संपूर्णपणें आपल्या कबजांत घेतलें आहे असाच याचा अर्थ होय.

याचें कारण उघड आहे. जर्मनीला आणि इटलीला जगांत अजिंक्य होऊन बसलेल्या फार मोठ्या प्रचंड साम्राज्यांना वचक बसवून आपलें साम्राज्य वाढवावयाचें आहे. अशा वेळीं लोकशाही, नागरिक-स्वातंत्र्य, वगैरेसारखे आरामाच्या आणि उत्कर्षाच्या काळांत इतर भांडवलवाल्यांनीं नागरिकांना देऊं केलेले हक्क जर्मनी अथवा

इटलीच्या नागरिकांना देणें शक्य नाहीं. विरोध झोडपून काढून, स्पर्धा नष्ट करून, सर्व राष्ट्राला मुसक्या बांधून भांडवलशाहीच्या मागें खडें करणें जर्मनीला आणि इटलीला अवश्य झालें आहे; व जें जें अवश्य आहे तें तें तीं राष्ट्रें जगाची चाड न बाळगतां करीत आहेत. कारण त्यांना साम्राज्य मिळवावयाचें आहे ना? त्याशिवाय तीं जिवंत राहणें शक्य नाहीं. आणि ज्या मानानें जर्मनी-इटलीचा धाक इंग्लंड-फ्रान्स वगैरे राष्ट्रांना वाटूं लागेल, ज्या प्रमाणांत स्वतांचें साम्राज्य कसें टिकवावें याविषयींची त्यांची चिंता वाढत जाईल, त्या प्रमाणांत त्याहि देशांतून सरकार भांडवलशाहीची संघटना अधिक झपाट्यानें करीत जाईल, तिच्याशीं अधिक प्रमाणांत उत्तरोत्तर ऐक्य पावत जाईल, आणि तेथील नागरिकांच्या हक्कांची* गळचेपी अधिक बेदरकारपणें करूं लागेल.

सारांश, हिंदुस्थानासारख्या साम्राज्यशाहीच्या जबड्यांत असणाऱ्या देशानें ब्रिटिश साम्राज्य आणि जर्मन नात्सीझम् वा इटालियन फॅसिझम् यांच्यांत सरस-नीरस असे भेद करण्याचें कारण नाहीं. साम्राज्यशाही हेंच या सर्वांचें ध्येय आहे आणि युद्ध हेंच त्यांचें हातांतील अंतिम आणि सर्वश्रेष्ठ असें साधन आहे.

महायुद्धें झालीं तरी त्यांमुळें साम्राज्यशाह्या अथवा साम्राज्यवाद म्हणजे साम्राज्यें मिळवण्याची व वाढवण्याची प्रवृत्ति नष्ट होईल असा कांहीं निर्वाळा देतां येणार नाहीं. एकादें साम्राज्य अनेकांच्या हल्ल्यामुळें चीत होईल आणि त्याच्या साम्राज्याची वाटणी इतर साम्राज्यें आपसांत करून घेतील. असा क्रम अनेक वर्षेपर्यंत चालत

* नुकताच ब्रिटिश पार्लमेंटनें मंजूर केलेला सक्तीच्या लष्करभरतीचा कायदा वरील प्रवृत्तीचेंच उदाहरण आहे.

राहून मानवसमुदाय एकापेक्षां एक महाभयंकर अशा महायुद्धांत दर दहा-वीस वर्षांनीं होरपळून निघेल.

पण " सर्वनाश " हा मानवजातीच्या कपाळावर सटीनें लिहिलेला भविष्यलेख आहे असें मानून चालण्याचें कारण नाहीं. साम्राज्यशाह्यांचा अंत झाल्याशिवाय जगांत शांति, सुख, समाधान वगैरे कांहींच नांदणार नाहीं हें मात्र खरें. पण साम्राज्यशाह्या आपसांत झगडून सुंदोपसुंदांप्रमाणें आपोआपच नाश पावतील अशी दैववादी विचारसरणी पत्करून आपण स्वस्थ राहावयाचें काय ?

साम्राज्यशाह्यांचा अंत होणार कीं नाहीं तें साम्राज्यांकित प्रदेशांच्या धोरणावर अवलंबून राहील. भांडवलशाही साम्राज्यांचा विस्तार जसजसा होत गेला तसतसा त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशांत एक नवीन मनु अवतीर्ण झाला. साम्राज्यशाहीच्या आगमनानें तेथील समाजपद्धति आणि तिला पायाभूत झालेली उत्पादनपद्धति समूळ नष्ट झाली. हिंदुस्थानांतील उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहेच.

ब्रिटिश साम्राज्यशाहीनें हिंदुस्थानांत केवळ विध्वंसच केला असें सत्यप्रतिज्ञ इतिहासकाराला म्हणतां येणार नाहीं. तिच्या प्रत्येक पावलागणिक जुन्या काळची समाजस्थिति चुरडली गेली हें खरें; पण तिनें हिंदुस्थानच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत नव्या सामाजिक पद्धतीचा पाया मांडला हेंहि तितकेंच खरें. अर्थात् पूर्व-कालीन समाजव्यवस्थेचा भंग जसा तिनें स्वार्थासाठीं केला, त्याच-प्रमाणें नवीन समाजाला आधारभूत होणाऱ्या उत्पादनपद्धतीचा प्रारंभहि तिनें स्वार्थदृष्टीनेंच केला. आणि तिच्या मनांतला हेतु कांहींहि असला तरी आजचा हिंदुस्थान हा १८५७ त आणि तद-नंतर ब्रिटिश साम्राज्यशाहीनें केलेल्या राजकीय आणि सामाजिक क्रान्तींतून अवतरलेला आहे हें अमान्य करण्यांत हशील नाहीं.

"हिंदुस्थानावरील ब्रिटिश वर्चस्वाचे भावी परिणाम" ह्या १८५३ सालीं लिहिलेल्या लेखांत कार्ल मार्क्स भविष्यवाणीनें काय लिहीत आहे पहा :

"कापूस वगैरे कच्चा माल आपल्या कारखान्यांतील पक्क्या मालासाठीं स्वस्त दरानें मिळवतां यावा एवढ्याच एका हेतूनें इंग्लंडांतील कारखानदार हिंदुस्थानांत आगगाड्या चालू करणार आहेत हें मी जाणून आहें; पण देशाच्या वाहतुकीच्या साधनांत तुम्ही यंत्रांचा एकदां का शिरकाव केलांत कीं—त्या देशांत लोखंड आणि कोळसा असेल तर– त्याचे परिणाम तेथें दिसून येऊं नयेत यासाठीं केलेले तुमचे सारे प्रयत्न वायां जातील. **एवढ्या अफाट देशावर** रेल्वेच्या वाहतुकीला हमेशा आवश्यक लागणाऱ्या जिनसा उत्पन्न करण्याचे कारखाने त्या देशांत निर्माण होऊं न देतांच आपण रेल्वेचें जाळें एवढ्या अफाट देशावर पसरूं हें शक्य नाहीं. यानंतर ज्या वस्तूंचा आगगाड्यांशीं साक्षात् संबंध नाहीं त्यांच्या उत्पादनासाठीं देखील यंत्रें वापरण्याची प्रथा पडूं लागणारच. आणि येणेंप्रमाणें आगगाड्यांची योजना ही हिंदुस्थानांतील आधुनिक कारखानदारीचा श्रीगणेशा ठरणार."

हें भविष्य कसें शंभर टक्के प्रत्ययास उतरलें आहे तें प्रत्येकाला अनुभवानें पटण्यासारखें आहे. हाच प्रकार ब्रह्मदेशांत, सीलोनमध्यें व इजिप्तमध्यें झालेला आढळून येतो. साम्राज्यें हीं घरचा माल खपवण्यासाठीं, कच्चा माल मिळवण्यासाठीं, आणि तुंबून राहिलेलें भांडवल गुंतवण्याकरितां जागा मिळावी म्हणून संपादण्यांत आलीं. आणि साम्राज्यसंपादनाचा हेतु चांगल्या प्रकारें फलद्रूप व्हावा या केवळ स्वार्थी बुद्धीनेंच साम्राज्यवाद्यांना अंकित प्रदेशांत

कारखानदारीचा पाया घालावा लागला. याचा प्रत्यय अमेरिकेच्या ताब्यांतील फिलिपाइन्समध्यें आला आहे, आणि जपाननें नुकत्याच गिळंकृत केलेल्या मँच्यूरियामध्यें येऊं लागला आहे असें सुप्रसिद्ध राजकारणी लेखक नॅथानिअल पेफर या लेखकानें दाखवून दिलेलें आहे.

अंकित देशांत कारखानदारांची वाढ झाली कीं तेथें राष्ट्रीय वृत्ति वाढूं लागते. साम्राज्यवादी भांडवलवाल्यांचा आणि अंकित देशांतील नवोदित व वाढत्या भांडवलशाहीचा विरोध सुरू होतो. आणि हें प्रकरण एवढ्यावरच थांबत नाहीं. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर आणि राष्ट्रीय वृत्तीच्या विकासाबरोबर अंकित देशांतील शेतकरी-कामकरी हे श्रमजीवि वर्ग जागृत होत जातात व तेथें साम्राज्यविरोधी प्रचंड चळवळ उभी राहते. हिंदुस्थानांतील काँग्रेस ही अशा चळवळीचें उत्कृष्ट उदाहरण आहे. अर्थात् हिंदुस्थानांतील भांडवलशाहीचा विकास, राष्ट्रीय चळवळीचीं स्थित्यंतरें व वाढ, तिचें साम्राज्यविरोधी स्वरूप, श्रमजीवि वर्गाचें तिच्यांतील स्थान यांचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे.

थोडक्यांत इतकेंच सांगतां येईल, कीं जगांतील साम्राज्यशाह्या आपसांतील अन्तर्गत विरोधांत जेव्हां गुरफटून जातात तेव्हां ही साम्राज्यशाही चांगली कीं ती साम्राज्यशाही चांगली असला विषारी सापांत सरस-नीरस निवडीत बसण्याचा आचरटपणा न करतां आपल्या पायांना वेढा घालून बसलेली साम्राज्यशाही नष्ट करण्याचा आणि आपलें स्वातंत्र्य साध्य करून घेण्याचा ज्या त्या अंकित राष्ट्रानें प्रयत्न केला तर साम्राज्यशाह्या नष्ट करण्याचे कामीं फार मोठी कामगिरी बजावल्याचें पुण्य पदरांत पडेल. या बाबतींत हिंदुस्थानची जबाबदारी फार मोठी आहे. कारण आपल्याच

मानेवर जगांतील सर्वांत जबरदस्त अशा साम्राज्यशाहीचें जूं ठेवलेलें आहे.

मात्र साम्राज्यशाहीचा अंत करूं पाहणाऱ्या राष्ट्रानें साम्राज्यशाहीला कारणीभूत होणारी भांडवलशाही उत्पादनव्यवस्था आपल्या देशांतून नष्ट करण्याची तयारी ठेविली पाहिजे. नाहीं तर आपल्या डोक्यावरचें जोखड फेकून दिल्यावर तेंच राष्ट्र दुसऱ्याचे माथीं आपल्या स्वदेशी साम्राज्यशाहीचें जूं लादील.

आणि पुन्हा महाभारतांतल्या ऋषीप्रमाणें हताशपणानें म्हणावें लागेल कीं

“ अन्योन्यस्यावलिम्पन्ति सारमेया यथामिषम्
राजानो भरतश्रेष्ठ भोक्तुकामा वसुंधराम् ॥
न चापि तृप्तिः कामानां विद्यतेऽद्यापि कस्यचित् ”

वाद-विवेचन-माला, ४ थें पुष्प

कम्यूनिझम

लेखक

श्री. के. एन्. फडके

मालेंत एकंदर दहा पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. मालेच्या लेखक-वर्गांत श्री. शं. द. जावडेकर, आचार्य भागवत, कॉ. फडके, कॉ. गोरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बॅरिस्टर सावरकर, इत्यादि असून प्रत्येक पुष्पाची किंमत ८ आणे.

एका पुस्तकाकरितां १० आण्यांचीं तिकिटें पाठवावीं.

मालेची १० पुस्तकांची वर्गणी पोस्टेजसह

फक्त ४ रुपये मनीऑर्डरीनें

पुष्प १लें, सुलभ समाजवाद	(श्री. पां. वा. गाडगीळ,)	०–८–०
पुष्प २ रें फॅसिझम	(,, ,,)	०–८–०
पुष्प ३ रें साम्राज्यशाही	(श्री. ना. ग. गोरे)	०–८–०

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी,

६२३/१५ सदाशिव, पुणें २.

प्रकाशकः— यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५ सदाशिव, पुणें २.

राजगुरु प्रेस, पुणें २.